मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

»मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५
»पालघर कार्यालय
२०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८९२९६८७२५
»नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८
»वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

मुंबई | RNI No.: MAHAMAR/2016/79101 | » गुरुवार, १७ एप्रिल २०२५ | » वर्ष: ९ » अंक: ३४९ | » पाने-८ | » किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

## पायलटची खुर्ची बदललीय- शिंदे

**अमरावती, दि. १६ प्रतिनिधी**

अमरावती विमानतळाच्या उद्घाटनप्रसंगी आयोजित कार्यक्रमात एकनाथ शिंदे म्हणाले, “आमच्या आधीच्या सरकारच्या काळात अनेक प्रकल्प व योजना बंद होत्या. मात्र आम्ही (महायुती) सत्तेत आलो आणि राज्याच्या विकासाचं, कल्याणकारी योजनांचं टेकऑफ झालं. मी त्या विमानाचा पायलट (वैमानिक) होतो. त्यावेळी देवेंद्र फडणवीस व अजित पवार हे माझे को-पायलट (सह-वैमानिक) होते. आता देवेंद्र फडणवीस आमचे पायलट आहेत. मी व अजित पवार को-पायलट आहोत. केवळ आमची खुर्ची बदलली आहे. मात्र, विकासाचं विमान तेच आहे, इंजिनही तेच आहे. आता ते अधिक गतीने धावताना दिसतंय.” दरम्यान, एकनाथ शिंदे यांनी आधीच्या महाविकास आघाडी सरकारवरही यावेळी टीका केली.

## अग्राग्रलेख खरीखरी

### इंद्रपुरीतून विमान उड्डाण

आज अमरावती येथून मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या शुभहस्ते अमरावती ते मुंबई या वायू मार्गावरील विमानसेवा सुरू झालेली आहे. आतापर्यंत अमरावतीकरांना विमानाने जायचे असल्यास नागपूरला जावे लागत असे. म्हणजेच दीडशे किलोमीटरचा प्रवास केल्यावरती सात-आठ हजार ते वीस हजार पर्यंत भाडे देऊन प्रवाशांना मुंबईला जाण्यासाठी विमानात बसता येत असे. आता पुढील काही दिवस तरी अमरावती ते मुंबई विमानसेवा प्रवास भाडे फक्त २१०० /- रुपये राहणार आहे. पण हे भाडे आहे तोपर्यंत आता नागपूरच्या विमान प्रवाशांनी अमरावतीला येऊन विमान पकडले. तर त्यांचा बराच पैसा वाचेल. नागपूर ते अमरावती दीड दोन तासात पोहोचता येते. अशा प्रकारे हा नवा फंडा आणि नवीन प्रवासाचा हातखंडा प्रयोग सुरू होणार आहे. अर्थात हा नवा फंडा वापरलाही जाणार आहे. अमरावती ते मुंबई हा प्रवास जर २१०० रुपयांमध्ये होऊ शकतो. तर नागपूर ते मुंबई हा प्रवास तीन-साडेतीन हजारात का होऊ नये. या विमानतळाची उभारणी कल्पना पांडेय नामक महिला अधिकाऱ्यांनी केली आहे, असे म्हणतात. अर्थात त्यांच्या नावानेच हे काम झालेले आहे. अधिकारी फक्त हुकूम देतात. तसे हुकूम या बाईने दिले असावेत. विमानतळाचा उपयोग आतापर्यंत फक्त अति महत्त्वाच्या व्यक्ती म्हणजेच व्हीआयपींसाठी होत असे. आता ७२ प्रवाशांना घेऊन जाईल. असे मोठ्या एअरबससारखे विमान अमरावती ते मुंबई पर्यंत ये-जा करणार आहे. या विमानाचे वेळापत्रक ठरलेल्या वेळा पाळू शकेल काय. हा सुद्धा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. बऱ्याच वर्षांपूर्वी नागपूर ते अकोला किंवा अगदी नांदेड पर्यंत सुद्धा विमान सेवा सुरू झालेली होती. अर्ध्या तासात ते विमान अकोल्याहून नागपूरला पोहोचणार होते. त्याचे तिकीट आम्ही सुद्धा काढले होते. पण ते विमान ठरलेल्या वेळेनंतर चक्क साडेचार तास उशिरांनी जाणार होते. अर्ध्या तासाच्या प्रवासासाठी साडेचार तास वाट कोण पाहणार आणि मग काही दिवसातच त्या विमान प्रवासाचे परिपूर्ण बारा वाजलेले आम्ही पाहिलेले आहेत. आता बरीच प्रगती झालेली आहे, हे मान्य आहे. त्यामुळे या नवीन विमान प्रवासालाही चांगली गती येईल. प्रवाशांची अजिबात दुर्गती होणार नाही. अशी कल्पना करून आपण हे विमानतळ उभारणाऱ्या पांडेयबाईंना शुभेच्छा देऊया. याचे कारण असे की या कल्पना पांडेय बाईने सर्व श्रेय स्वतःकडे घेतलेले आहे. म्हणजे विमान उड्डाणाचे सर्व कार्य पांडेय बाईंच्या हातानेच झालेले असेल, असे समजायला काही हरकत नाही. इंद्रपुरी अमरावती कोणे एकेकाळी सिनेमा उद्योगाची राजधानी होती. आताही या नगरीतून मोठा व्यापार चालतो. फक्त वेळेचे बंधन पाळले आणि भाड्यात भरमसाठ वाढ केली नाही. तर यांचे विमान जमिनीवर येणार नाही याची खात्री आहे. अमरावतीची जनता हुशार आहे. त्याहून विमानाने जाणारे अजूनही हुशार असतात. वेळ नावाची गोष्ट असते. त्याच वेळेची काही गणिते असतात. तेव्हा या गोष्टीबाबत 'चार दिनों की चांदनी, फिर अंधेरी रात' असे होऊ नये. हीच आमची अपेक्षा आहे.

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

# सौगात ए मोदी वाटताना तुमचे हिंदुत्व कुठे गेले ? - उद्धव ठाकरे

**नाशिक, दि. १६ प्रतिनिधी**

उद्धव ठाकरे यांनी राजभवनात छत्रपती शिवाजी महाराजांचं स्मारक उभारण्याच्या उदयनराजे भोसले यांच्या मागणीला पाठिंबा दिला आहे. आपणही याआधी ही मागणी केली होती अशी आठवण करुन देताना त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपावर सडकून टीका केली. तसंच छत्रपती शिवाजी महाराजांवर खरंच श्रद्धा असेल आणि त्यांना महाराष्ट्रापुरतं मर्यादित ठेवायचं नसेल तर शिवजयंतीला देशभरात सुट्टी जाहीर करा अशी मागणी केली आहे. नाशिकमध्ये उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचं निर्धार शिबीर आयोजित करण्यात आलं आहे. त्यावेळी ते बोलत होते.

"खरोखर महाराजांबद्दल आदर असेल तर शिवजयंतीला देशभर सुट्टी जाहीर करा. मतांसाठी फक्त महाराजांचं नाव घेऊ नका,' असं उद्धव ठाकरे म्हणाले. अरबी समुद्रात शिवरायांचं भव्य स्मारक कधी होणार? जर होत नसेल तर उदयनराजे बोलले ते बरोबर आहे. महाराजांपेक्षा राज्यपाल मोठे नाहीत. राज्यपाल पदावर तर सर्वोच्च न्यायालयाने ताशेरे ओढले आहेत. राज्यपालांना कशाला थाट पाहिजे. राजभवनाच्या जागी महाराजांचा इतिहास सांगणारं स्मारक उभं करा अशी शिवसेनेची मागणी आहे. राज्यपालांचा जनतेशी संबंध असतो किंवा नसतो. एका मंत्र्याकडे दोन तीन बंगले आहेत त्यापैकी त्यांना द्या. जगाला हेवा वाटेल असं स्मारक तिथे उभं करा आमचा पाठिंबा आहे," असं उद्धव ठाकरे म्हणाले आहेत.

"गुजरात्यांबद्दल राग नाही, पण जे दोघे तिथे बसले आहेत त्यांना महाराष्ट्राची कल्पना नाही. पंडित जवाहलालनेहरु नेहमी ओपन कारमधून फिरायचे. पण महाराष्ट्रात त्यांना बंद कारमधून फिरायला लागलं होतं. कोणाची मस्ती खपवून घेणारा महाराष्ट्र नाही. शिवाजी महाराज, संभाजी महाराज यांचं नाव घेणं कोणाला शोभतं. अमित शाह रायगडावर येऊन गेले, त्यांनी सांगितलं की महाराजांना महाराष्ट्रापुरतं मर्यादित ठेवू नका. त्यांना माहिती नाही की, महाराजांच्या काळी लंडन गॅझेटमध्ये सूरत लुटीचती बातमी आली होती," असं उद्धव ठाकरेंनी सांगितलं.



अमित शाह यांनी शिवाजी महाराजांवर ५०० पानांचं पुस्तक लिहिलं आहे. ते वाचलं तर संजय राऊत यांना चक्कर येईल असं चंद्रकांत पाटील म्हणाले. पण नंतर त्यांनाच चक्कर आली असा टोला उद्धव ठाकरेंनी लगावला. त्याच कार्यक्रमात फडणवीसांनी शिवाजी महाराजांचा अपमान करणाऱ्याला टकमक टोकावरुन फेकावं असं म्हणता म्हणता थांबले, पण नंतर लोकशाहीचा दाखला दिला. छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान करणाऱ्याला शिक्षा झालीच पाहिजे. तरच महाराजांचं नाव घेऊ शकतो असंही ते म्हणाले.

"सत्ता असली की सगळे तिकडे जातात. सत्ता नसताना जे राहतात ते निष्ठावंत आणि सोबती असतात. सत्यनाराणयाची पूजा असली की तीर्थप्रसादाला सगळे जातात. पण छावे, मर्द, शिवरायाचंया मावळ्यांचे वारसादर माझ्यासोबत आहेत याचा आनंद आहे," असं उद्धव ठाकरे म्हणाले.

उद्धव ठाकरे म्हणाले की, "शिवसेनेने हिंदुत्व सोडलं अशी बोंब मारणाऱ्या भाजपने बिहारमध्ये 'सौगात ए मोदी'च्या माध्यमातून ३२ लाख मुस्लिमांना भेटीचं वाटप केलं. त्यावेळी तुमचं हिंदुत्व कुठे गेलं? म्हणजे महाराष्ट्रामध्ये बटेंगे तो कटेंगे आणि बिहारमध्ये बाटेंगे तो जितेंगे असं यांचं धोरण. मी मुख्यमंत्री असताना कसलाही भेदभाव केला नाही. मी केलेल्या कामांमुळे मुस्लिम लोक माझ्यासोबत आले आणि हे घाबरले."

भारतीय जनता पक्ष हा फेक नरेटीव्हवाला पक्ष आहे अशी टीका उद्धव ठाकरे यांनी केली. बिहारमध्ये यांनी नितीश कुमार यांच्यासोबत हे गेले. आंध्रमध्ये चंद्राबाबूसोबत हे गेले. त्यामुळे आम्ही भाजपला सोडलं आहे, हिंदुत्वाला नाही असं उद्धव ठाकरे म्हणाले.

## अमरावती विमानतळावरुन व्यावसायिक उड्डाण सुरु

**अमरावती, दि. १६ प्रतिनिधी**

अमरावतीकरांच्या बऱ्याच प्रतीक्षेनंतर, अमरावती अखेर हवाई वाहतूक नकाशावर आले आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी अमरावती विमानतळाचे उद्घाटन केले. सोबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री गिरीश महाजन, उद्घाटन समारंभाला उपस्थित होते. विमानतळ आता कार्यरत असल्याने, मुंबईहून अमरावतीला जाणारी पहिली व्यावसायिक विमानसेवा आज येणार आहे.

अमरावती विमानतळाची निर्मिती १९९२मध्ये झाली होती. तेव्हापासून हे विमानतळ फक्त व्हीआयपी व्यक्तींसाठी सुरू होते. आजपासून मात्र सर्वसामान्य लोकांना या विमानतळावरून प्रवास करता येणार आहे.

या विमानतळाच्या धाववपट्टीची लांबी १८५० मीटर असून ४५ मीटर रुंद आहे. याच विमानतळावर आशिया खंडातील सर्वात मोठ्या एअर इंडियाचे वैमानिक प्रशिक्षण केंद्र उभारले जात आहे. एकाच वेळी या विमानतळावर ATR/ 72 सीटर असे दोन विमान पार्किंग होऊ शकतात. येत्या ऑक्टोबर महिन्यामध्ये या विमानतळावरून नाईट लँडिंग सुरू होणार आहे.

पश्चिम विदर्भातील अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ आणि वाशिम जिल्ह्यातील नागरिकांना विमानाच्या माध्यमातून मुंबईत लवकर पोहोचता येईल. आधी मुंबईला विमानाने जायचे झाल्यास अमरावतीवरून नागपूरला जावे लागायचे. त्यासाठी दीडशे किलोमीटर प्रवास करावा लागायचा. परंतु आता हा प्रवास वाचणार आहे. त्यामुळे प्रवाशांचे साडेतीन तास वाचणार आहेत.

विमानसेवेमुळे अमरावतीच्या दळणवळणाला चालना मिळेल. विमान सेवेमुळे अमरावती शहराच्या औद्योगिक विकासाला तसेच कापड उद्योगाला नवीन कलाटणी मिळेल. हे विमानतळ उड्डाण योजनेअंतर्गत असल्याने तिकीट सर्वसामान्यांना परवडणारे आहे. दुरांतो एक्सप्रेसच्या फर्स्ट एसीपेक्षा कमी दर मुंबई विमान प्रवासाचा आहे. दरम्यान भविष्यात मागणीनुसार तिकिटांचे दर वाढू शकतात. हे विमानतळ उड्डाण योजनेअंतर्गत असल्याने तिकीट सर्वसामान्यांना परवडणारे आहे. हे विमान मुंबईवरून दुपारी २ वाजून १५ मिनिटांनी टेक ऑफ होईल. त्यानंतर अमरावतीवरून ४ वाजून ४० मिनिटांनी मुंबईसाठी रवाना होईल. सायंकाळी ६ वाजून २५ मिनिटांनी मुंबईत दाखल होईल.

अहवालानुसार, पहिल्या फ्लाइटच्या सर्व जागा बुक करण्यात आल्या होत्या. प्रति व्यक्ती भाडे २१०० रुपये आहे.

## एमपीएससीच्या विद्यार्थ्यांनी घेतली शरद पवारांची भेट

### पवार मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिणार

**मुंबई, दि. १६ प्रतिनिधी**

संयुक्त पूर्व परीक्षेच्या पार्श्वभूमीवर जागा वाढवण्याची मागणी करत एमपीएससीच्या विद्यार्थ्यांनी काल मुंबईत राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेतली. या विद्यार्थ्यांचं म्हणणं एकून घेतल्यानंतर मी याबाबत आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहिणार असून फोनद्वारेही त्यांच्याशी बोलणार असल्याची माहिती शरद पवार यांच्याकडून देण्यात आली आहे.

शरद पवार यांनी आपल्या एक्स पोस्टमध्ये म्हटलं आहे की, "मुंबईच्या यशवंतराव चव्हाण सेंटर येथे संयुक्त पूर्व परीक्षेच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या परीक्षेच्या जागावाढ संदर्भात काल भेट घेतली. ही परीक्षा दोन वर्षांनंतर होतेय. त्यामुळे आयोगाने घेतलेल्या वयवाढीच्या निर्णयाचा फायदा सदर विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवायचा असेल तर, ४८० जागांची म्हणजेच ही जाहिरात तुटपुंजी आहे. अशा परिस्थितीत जागावाढ करण्याची विद्यार्थ्यांची मागणी रास्त आहे. या सर्व जागा मोठ्या प्रमाणात रिक्त असल्याने शासनाला आणि आयोगाला देखील जागावाढ करण्यास कुठलीही अडचण असण्याचं कारण नाही. या संदर्भात मी स्वतः मुख्यमंत्री महोदयांना पत्र पाठवणार असून आज दूरध्वनीवर देखील संपर्क साधणार आहे," अशी माहिती पवार यांनी दिली.

"राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२४ च्या तयारीसाठी पुरेसा वेळ मिळावा, ही देखील विद्यार्थ्यांची आग्रही मागणी आहे. यासंदर्भात दोन दिवसांपूर्वी मी आयोगाच्या अध्यक्षांशी बोललो असता, आयोगाने १५ एप्रिल रोजी विद्यार्थ्यांचे शिष्टमंडळ पाठवण्यास सांगितले होते. परंतु सदरील बैठक काही कारणास्तव काल होऊ शकली नाही. ही बैठक आज होणार असल्याचे विद्यार्थ्यांनी लक्षात आणून दिले आहे. यासंदर्भात आयोगाने विद्यार्थ्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करावा; सकारात्मक निर्णय घ्यावा," अशी मागणी यावेळी शरद पवारांकडून करण्यात आली आहे.

दरम्यान, शरद पवार यांच्याकडून एमपीएससी विद्यार्थ्यांसंदर्भात करण्यात आलेल्या या मागण्यांना राज्य सरकार आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून कसा प्रतिसाद दिला जातो, हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

## हिंदू धर्माच्या संस्थेवर मुस्लिमांना संधी मिळणार का?

### सर्वोच्च न्यायालयाचा केंद्राला सवाल



**नवी दिल्ली, दि. १६ वृत्तसंस्था**

वक्फ (सुधारणा) कायद्याला आव्हान देणाऱ्या याचिकेवर आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. वक्फ कायद्यात केलेल्या अनेक तरतुदींबाबत सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला प्रश्न विचारले. वक्फ कायद्यात सुधारणा करताना वक्फ बोर्डावर बिगरमुस्लीम सदस्यांची नेमणूक करण्याबाबत तरतूद करण्यात आली आहे. आता हिंदू धर्माच्या संस्थांवर मुस्लीम व्यक्तीची नेमणूक करणार का?, असा प्रश्न सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला विचारला. सरन्यायाधीश संजीव खन्ना, न्यायाधीश संजय कुमार आणि न्यायाधीश केव्ही विश्वनाश यांच्या खंडपीठासमोर याचिकेची सुनावणी सुरू आहे.

## न्यायमूर्ती बी. आर. गवई होणार देशाचे ५२ वे सरन्यायाधीश

**नवी दिल्ली, दि. १६ वृत्तसंस्था**

सर्वोच्च न्यायालयातील सर्वात वरिष्ठ न्यायाधीश बी. आर. गवई ५२ वे सरन्यायाधीश होणार आहेत. विद्यमान सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी बुधवारी केंद्रीय कायदा मंत्रालयाकडे न्यायमूर्ती बी. आर. गवईंच्या नावाची पुढील सरन्यायाधीश म्हणून नियुक्ती करण्याची शिफारस केली आहे. न्यायमूर्ती गवई १४ मे रोजी ५२ वे सरन्यायाधीश म्हणून शपथ घेतील. कारण विद्यमान सरन्यायाधीश संजीव खन्ना १३ मे रोजी निवृत्त होणार आहेत.



२४ मे २०१९ पासून न्यायमूर्ती बी. आर. गवई सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून नियुक्ती कार्यरत आहेत. त्यांनी सरन्यायाधीश पदाची शपथ घेतल्यानंतर सहा महिने त्यांचा कार्यकाळ असेल. २३ नोव्हेंबर २०२५ रोजी ते निवृत्त होतील. न्यायमूर्ती गवई हे भारताचे सरन्यायाधीश होणारे दुसरे दलित असतील. त्यांच्यापूर्वी २००७ मध्ये दलित न्यायमूर्ती के. जी. बालकृष्णन हे देशाचे सरन्यायाधीश झाले होते.

न्यायमूर्ती बी. आर. गवई मुळचे महाराष्ट्रातील आहेत. त्यांचा जन्म अमरावती जिल्ह्यात झाला आहे. १६ मार्च १९८५ रोजी त्यांनी वकिलीला सुरुवात केली. ऑगस्ट १९९२ ते जुलै १९९३ पर्यंत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात सहाय्यक सरकारी वकील आणि अतिरिक्त सरकारी वकील म्हणून त्यांची नियुक्ती झाली. १७ जानेवारी २००० रोजी नागपूर खंडपीठात सरकारी वकील म्हणून नियुक्ती झाली. १४ नोव्हेंबर २००३ रोजी उच्च न्यायालयाचे अतिरिक्त न्यायाधीश म्हणून बढती मिळाली. १२ नोव्हेंबर २००५ रोजी मुंबई उच्च न्यायालयाचे कायमस्वरूपी न्यायाधीश झाले. नागपूर, छत्रपती संभाजीनगर आणि पणजी येथे त्यांनी न्यायाधीश म्हणून कार्य केले, अशी माहिती सर्वोच्च न्यायालयाच्या संकेतस्थळावर आहे.

## कुमार मंगलम बिर्लांना लता मंगेशकर पुरस्कार तर सचिनसह शरद पोंक्षेंना दीनानाथ मंगेशकर पुरस्कार जाहीर


**मुंबई, दि. १६ प्रतिनिधी**

यावर्षीच्या मंगेशकर पुरस्कारांची घोषणा करण्यात आली असून उद्योजक आणि पद्मविभूषण कुमार मंगलम बिर्ला यांना लता मंगेशकर पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. तर संगीत, नाटक, साहित्यासह सामाजिक क्षेत्रातील दिग्गजांना दीनानाथ मंगेशकर पुरस्कार पुरस्कार जाहीर झाला आहे. २४ एप्रिलला सरसंघचालक मोहन भागवतांच्या हस्ते या पुरस्कारांचं वितरण होणार आहे. ज्येष्ठ लेखक श्रीपाल सबनिस यांना साहित्य क्षेत्राचा तर 'असेन मी नसेन मी' या नाटकाला नाट्य श्रेत्रातील पुरस्कार घोषित करण्यात आला आहे. सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानासाठी आरंभ सोसायटी फॉर ऑटिझम या सामाजिक संस्थेलाही सन्मानित करण्यात येणार आहे. अभिनेते सचिन पिळगावकर, शरद पोंक्षे, अभिनेत्री सोनाली कुलकर्णी, श्रद्धा कपूर यांना पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. मास्टर दीनानाथ मंगेशकर स्मृती प्रतिष्ठानच्या वतीने या पुरस्काराचे आयोजन करण्यात येते.

## रॉबर्ट वाड्रा यांची सलग दुसऱ्या दिवशी ईडीकडून चौकशी

**नवी दिल्ली, दि. १६ वृत्तसंस्था**

हरियाणातील शिकोपूर कथित जमीन गैरव्यवहार प्रकरणात आज रॉबर्ट वाड्रा यांची पुन्हा चौकशी केली जात आहे. ते सलग दुसऱ्या दिवशी ईडी कार्यालयात पोहोचले आहेत. रॉबर्ट वाड्रा आज त्यांच्या पत्नी आणि काँग्रेस खासदार प्रियंका गांधी यांच्यासोबत ईडी कार्यालयात पोहोचले.



चौकशीसाठी पत्नी प्रियंका गांधी यांच्यासोबत ईडीच्या कार्यालयात हजर झालेल्या रॉबर्ट वाड्रा यांनी सूचक विधान केलं आहे. आज आम्ही भोगत आहोत. वेळ बदलेल आणि वेळ बदलेल तेव्हा कदाचित त्यांनाही भोगावं लागेल, असं रॉबर्ट वाड्रा यांनी म्हटलं आहे.

ईडीच्या चौकशीला उपस्थित राहण्यापूर्वी प्रसारमाध्यमांशी बोलताना रॉबर्ट वाड्रा म्हणाले की, आम्ही कुणालाही घाबरत नाही. आम्ही प्रासंगित आहोत, त्यामुळे आम्हाला लक्ष्य केलं जात आहे. मग राहुल गांधी यांना संसदेत रोखलं जात आहे तर मला बाहेर रोखलं जातंय. निश्चितपणे आम्ही निशाण्यावर आहोत. मात्र आम्ही सोपं सॉफ्ट टार्गेट नाही तर हार्ड टार्गेट आहोत.

रॉबर्ट वाड्रा या चौकशीवरून सूचक इशारा देताना पुढे म्हणाले की, वेळ नेहमी बदलत राहते. आज आम्ही भोगत आहोत. वेळ बदलेल तेव्हा कदाचित त्यांनाही भोगावं लागेल. मला कुठल्याही गोष्टीची भीती वाटत नाही. कुठलीही बाब लपवून ठेवलेली नाही. या प्रकरणात हरयाणाचे तत्कालीन मुख्यमंत्री मनोहरलाल खट्टर यांनी मला दोन वेळा क्लीन चिट दिलेली आहे. आता सात वर्षांनंतर मला त्याच प्रकरणाबाबत पुन्हा नव्याने का प्रश्न विचारले जात आहेत, हे मला समजत नाही आहे. मी कुठल्या ही प्रश्नाकडे दुर्लक्ष करणार नाही. मी पूर्ण, शक्तिनिशी येथे आलो आहे. मी सर्व प्रश्नांची उत्तरं देईन, असेही रॉबर्ट वाड्रा यावेळी म्हणाले.

## मुंबई-गोवा हायवेचे बांधकाम येत्या जूनपर्यंत पूर्ण होईल- गडकरी

**मुंबई, दि. १६ प्रतिनिधी**

गेली कित्येक वर्षे नितीन गडकरी केंद्रात मंत्री आहेत, ते पण रस्ते परिवाहन आणि राजमार्ग खात्याचे, तरीही त्यांना महाराष्ट्रातील मुंबई-गोवा महामार्ग काही केल्या पूर्ण करता आलेला नाहीय. आता त्यांनी हा महामार्ग पूर्ण होण्याची नवीन तारीख जाहीर केली आहे. यामुळे या महामार्गाबाबत आशा सोडलेल्या कोकणवासियांनी पुन्हा आशा करण्यास सुरुवात केली आहे.



मुंबई-गोवा हायवेचे बांधकाम येत्या जूनपर्यंत पूर्ण होईल असे गडकरी म्हणाले आहेत. जवळपास गेली १६-१७ वर्षे या महामार्गाचे कामच सुरु आहे. राजकारण्यांचे हस्तक्षेप, कोर्टात गेलेले खटले, कंत्राटदार पळून जाणे अशी अनेक विघ्ने या महामार्गावर कोसळली आहेत. कुठे एकेरी, तर कुठे दोन्ही बाजुला खड्डेच खड्डे अशी परिस्थिती या महामार्गाची आहे. ज्याला कंबरदुखी, मानदुखी असेल त्याची कंबरदुखी मानदुखी गायब होईल आणि ज्याची नाही त्याला कंबरदुखी मानदुखी सुरु होईल असा हा महामार्ग आहे.

अनेकांचे या महामार्गाने बळी घेतलेले आहेत. अनेक गावांतील कर्ते पुरुष या महामार्गाने संपविले आहेत. प्रशासन फक्त पंचनामे आणि गुन्हे यापुढे काहीही करत नाहीय, अशी कोकणातील या रस्त्याची परिस्थिती आहे. काही वर्षांपूर्वी गडकरींनीच हवाई पाहणी केली होती. आता त्यांनी या महामार्गाकडे लक्ष दिले असून येत्या जूनपर्यंत हा हायवे तयार होईल असा त्यांनी दावा केला आहे.

मुंबईतील दादर परिसरात 'अमर हिंद मंडळ'ने आयोजित केलेल्या वसंत व्याख्यानमालेत गडकरी यांनी ही घोषणा केली. केंद्र सरकार नवीन टोल धोरणावर काम करत आहे, ते लवकरच लागू केले जाणार आहे. यामुळे टोलनाके हटविले जातील, असे ते म्हणाले. पुढील दोन वर्षांत भारतातील रस्ते अमेरिकेपेक्षा चांगले होतील, असेही ते म्हणाले.

मुंबई आणि गोवा दरम्यान बांधण्यात येणाऱ्या या राष्ट्रीय महामार्गामुळे या दोन्ही ठिकाणांमधील प्रवासाचा वेळ बराच कमी होईल. हा महामार्ग पूर्ण करण्यात अनेक अडथळे आले. जमीन अधिग्रहण, न्यायालयीन खटले आणि भरपाईशी संबंधित गुंतागुंतीवरून भावांमध्ये असलेल्या अंतर्गत कलहामुळे काम अडकलेले होते. आता या सर्व समस्या सोडवल्या गेल्या आहेत आणि कामाला वेग आला आहे, असे ते म्हणाले. येत्या जूनपर्यंत हा रस्ता १०० टक्के पूर्ण होईल असे त्यांना सांगितले.

## बिहारमध्ये जुन्या मित्र पक्षाने भाजपची साथ सोडली

### मुख्यमंत्रीपदामुळे एनडीएत फूट पडणार?

**पाटणा, दि. १६ वृत्तसंस्था**

लोकसभेपाठोपाठ तीन राज्यांच्या विधानसभा निवडणुका जिंकून भाजपाने आपला राजकीय दरारा कायम ठेवला. आता पक्षाचे पुढील लक्ष्य यावर्षीच्या अखेरीस होणाऱ्या बिहारच्या निवडणुकीवर आहे. महाराष्ट्र, हरियाणा व दिल्लीमध्ये भाजपाच्या विजयामुळे निर्माण झालेल्या गतीवर स्वार होऊन, एनडीएनं बिहारमध्ये २४३ पैकी २२५ जागा जिंकण्याचं ध्येय ठेवलं आहे. मात्र, त्याआधीच राज्यात सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडीला मोठा धक्का बसला आहे. भाजपाचा जुन्या मित्रपक्षाने एनडीएमधून बाहेर पडण्याची घोषणा केली आहे.



माजी केंद्रीय मंत्री आणि राष्ट्रीय लोक जनशक्ती पक्षाचे प्रमुख पशुपती पारस यांनी राष्ट्रीय लोकशाही आघाडीशी असलेले सर्व संबंध तोडले आहेत. गेल्या वर्षीच्या लोकसभा निवडणुकीदरम्यान बिहारमधून एकही तिकीट न मिळाल्यामुळे आमच्या पक्षाचा अपमान झाला असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. भाजपाची साथ सोडल्यानंतर पशुपती पारस हे राष्ट्रीय जनता दल नेतृत्वाखालील महाआघाडीत सामील होण्याची शक्यता आहे.

राष्ट्रीय जनता दलातील एका सूत्राने इंडियन एक्स्प्रेसला सांगितले, “आगामी विधानसभा निवडणुकांमध्ये महाआघाडीकडून राष्ट्रीय लोक जनशक्ती पक्षाला काही जागा सोडल्या जाऊ शकतात. पशुपती पारस यांच्या नेतृत्वाखालील पक्षाने आतापर्यंत बिहारच्या एकाही निवडणुकीत भाग घेतलेला नाही, मात्र तरीही ते चिराग पासवान यांच्या मतदारांवर परिणाम करतील, अशी आम्हाला आशा आहे. चिराग पासवान यांच्या पक्षाचा पासवान समाजावर मोठा प्रभाव आहे. त्यांनी निवडणुकीत वेळोवेळी त्यांची उपयुक्तता सिद्ध केली आहे,” असे आरजेडीच्या एका नेत्याने सांगितले.

विधानसभा निवडणुकीपूर्वी होणारा हा संभाव्य राजकीय फेरबदल अतिशय महत्त्वाचा मानला जातो, कारण बिहारमध्ये अनुसूचित जाती समुदायातील मतदारांची एकूण संख्या १९.६५ टक्के इतकी आहे. त्यामध्ये पासवान समुदायातील ५.३ टक्के मतदार आहेत. पशुपती पारस यांना महाआघाडीत सामील करून घेण्यासाठी आरजेडी, काँग्रेस आणि डाव्या विचारसरणीचे पक्ष उत्सुक आहेत. कारण – राष्ट्रीय लोकशाही आघाडी आणि महाआघाडीतील मतांचा फरक कमी करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. २०२० च्या विधानसभा निवडणुकांमध्ये विरोधी आघाडीने २४३ पैकी ११० जागा जिंकल्या होत्या, ते केवळ १२ जागांनी बहुमतापासून दूर राहिले होते.

माजी केंद्रीय मंत्री रामविलास पासवान यांनी २००० साली लोक जनशक्ती पक्षाची स्थापना केली. त्यांनी पासवान समाजाचे एकमेव नेते म्हणून आपले स्थान निर्माण केले. २००५ च्या विधानसभा निवडणुकीत २९ जागा जिंकून त्यांनी सर्वच राजकीय पक्षांना चकित करून सोडलं. त्यावेळी लोक जनशक्ती पक्षाला निवडणुकीत १२ टक्के मतं मिळाली होती. पशुपती पारस हे रामविलास पासवान यांचे बंधू व हाजीपूरचे माजी खासदार आहेत. त्यांनी २०२१ मध्ये लोक जनशक्ती पक्षातून बंड करून राष्ट्रीय लोक जनशक्ती पक्षाची स्थापना केली. पक्षाच्या दुसऱ्या गटाचे नेतृत्व चिराग पासवान करत आहेत, ज्यांनी राजकारणात वेगळी ओळख निर्माण केली आहे.

## 'शेकाप'ला धक्का! जयंत पाटील यांचे भाऊ, भाच्याचा शेकडो कार्यकर्त्यांसह भाजपमध्ये प्रवेश

**मुंबई, दि. १६ प्रतिनिधी**

शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस माजी आमदार जयंत पाटील यांचे भाऊ माजी आमदार सुभाष तथा पंडितशेठ पाटील आणि भाचे व माजी मंत्री शेकापच्या ज्येष्ठ नेत्या मिनाक्षी पाटील यांचे चिरंजीव ॲड. आस्वाद पाटील यांनी आज शेतकरी कामगार पक्षाला अखेरचा लाल सलाम केला. त्यांनी मुंबईत झालेल्या कार्यक्रमात भाजपमध्ये प्रवेश केला.



रायगड जिल्ह्यात शेकापसाठी हा मोठा राजकीय धक्का मानला जात आहे. माझ्या पक्ष प्रवेशामुळे रायगड जिल्ह्यात भाजप एक नंबरला येणार असल्याचा दावा माजी आमदार पंडित शेठ पाटील यांनी केला. रायगड जिल्ह्यात मला मानणारा मोठा वर्ग असून त्याचा भारतीय जनता पार्टीला मोठा फायदा होईल, शिवाय आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांचा निवडणुकीत पंडितशेठ पाटील काय आहे ते इतरांना कळेल, असा इशारा त्यांनी शेकाप नेत्यांना दिला.

परिणामी, रायगड जिल्ह्यातील राजकारणात येत्या काळात ढवळून निघणार असून राजकीय समीकरणे बदलतील. विधानसभा निवडणुकीच्यावेळी माजी आमदार पंडीत पाटील यांनी पक्षाचे सरचिटणीस माजी आमदार जयंत पाटील यांच्याकडे उमेदवारी मागितली होती. शिवसेनेचे आमदार महेंद्र दळवी यांचा पराभव करण्याकरिता पंडीत पाटील हेच सक्षम उमेदवार असल्याचा दावा त्यावेळी शेकापमधील वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी केला होता. मात्र पंडीत पाटील यांना तिकीट नाकारुन ते माजी आमदार जयंत पाटील यांच्या स्नूषा चित्रलेखा पाटील यांना देण्यात आले. तिकीट नाकारल्याने पंडीत पाटील आणि पक्षांतील त्यांचे समर्थक नाराज झाले होते.

दरम्यान, विधानसभा निवडणुकीत शिवसेना आमदार महेंद्र यांनी शेकाप उमेदवार चित्रलेखा पाटील यांना पराभूत केले. त्यानंतर माजी आमदार पंडीत पाटील, आस्वाद पाटील व त्यांच्या समर्थकांनी भाजपामध्ये प्रवेश करण्याच निर्णय घेतला होता.भाजपचे कार्यकारी अध्यक्ष माजी मंत्री रविंद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत भाजप प्रदेश कार्यालयात माजी आमदार पंडीतशेठ पाटील आणि ॲड. आस्वाद पाटील यांनी आपल्या शेकडो कार्यकर्त्यांसह भाजपमध्ये प्रवेश केला. यावेळी माजी आमदार पंडीतशेठ पाटील यांच्या पत्नी भावना पाटील, खासदार धैर्यशिल पाटील, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, उरणचे आमदार महेष बालदी आणि शेकापचे विविध तालुक्यांतील प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## ट्रम्प यांनी चीनवर 245 टक्के आयात कर लागू केला

**वॉशिंग्टन, दि. १६ वृत्तसंस्था**

गेल्या १५ दिवसांत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनवर लागू केलेला आयात कर तब्बल ८ पट वाढवला आहे. व्हाईट हाऊसनं मंगळवारी उशीरा जारी केलेल्या परिपत्रकामध्ये यासंदर्भातला उल्लेख करण्यात आला आहे. चीननं डोनाल्ड ट्रम्प यांनी लागू केलेल्या रेसिप्रोकल टॅरिफला प्रत्युत्तर देण्यासाठी अमेरिकेवर १४५ टक्के आयात कर लागू केल्यानंतर त्यावर अमेरिकेकडून हे पाऊल उचलण्यात आलं आहे. त्यामुळे अमेरिका व चीन यांच्यातील या टॅरिफ वॉरमुळे दोन्ही देशांमध्ये मिळणाऱ्या वस्तू दिवसेंदिवस महाग होऊ लागल्याचे दिसत आहे.

डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाने मंगळवारी जारी केलेल्या नव्या परिपत्रकानुसार आता चीनमधून अमेरिकेत आयात होणाऱ्या उत्पादनांवर तब्बल २४५ टक्के व्यापार कर लागू असेल. “अमेरिकेत आयात होणाऱ्या चिनी वस्तूंवर २४५ टक्क्यांपर्यंत व्यापार कर लागू असेल. चीनकडून उचलण्यात येणाऱ्या उर्मट पावलांचा परिणाम म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे. डोनाल्ड ट्रम्प यांचं हे पाऊल ‘व्यापारात अमेरिकेला सर्वोच्च प्राधान्य’ धोरणाचाच एक भाग आहे”, असं या परिपत्रकात नमूद करण्यात आलं आहे.

दरम्यान, या परिस्थितीचं खापर डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाने चीनवर फोडले आहे. चीनकडून हेतुपुरस्सर तंत्रज्ञान क्षेत्रासाठीच्या अनेक महत्त्वाच्या सामग्रींच्या निर्यातीवर निर्बंध घातले आहेत. यात गॅलियम, जर्मेनियम आणि अँटिमनी अशा गोष्टींचा समावेश आहे. लष्करी साहित्य, अवकाशविषयक साहित्य व सेमीकंडक्टरच्या निर्मितीसाठी हे साहित्य अत्यावश्यक ठरते, असे अमेरिकेकडून सांगण्यात आले आहे. नुकतंच चीनने सहा प्रकारच्या दुर्मिळ खनिजांच्या निर्यातीवरदेखील अशाच प्रकारचे निर्बंध घातल्याचं ट्रम्प प्रशासनाचे म्हणणे आहे.

“या सगळ्या प्रकारातून अमेरिकेतली ऑटो उद्योजकांसाठी अत्यावश्यक ठरणाऱ्या बाबींचा पुरवठा खंडित करण्याचा चीनचा प्रयत्न आहे”, असंही या निवेदनात म्हटले आहे.

# मोखाड्यात उन्हाच्या तडाख्याने तापाच्या प्रमाणात होतेय वाढ

## व्हायरल इन्फेक्शनचा मोखाड्यात शिरकाव

**मोखाडा, दि. १६ : प्रतिनिधी**

दिवसेंदिवस सुर्य उष्णतेची आग ओकत असल्याने ऐन एप्रिल महिन्यात मोखाडाकरांना उष्णतेचा चटका सहन करावा लागत आहे.त्यात भर की काय हातपाय दुःखी,ताप येऊन आजारी पडण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे.दिवसागणिक पंधरा ते वीस मुलांसह नागरिक खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल होत आहेत.

ताप येणे हातपाय,अंग दुखणे,मळमळ होणे आदी लक्षणे असलेल्या आजाराने ग्रामीण भागातील गाव पाड्यात शिरकाव केला असून रोजच्या रोज पंधरा ते वीस लहान मुला प्रमाणे इतरही नागरिक औषधोपचार घेण्यासाठी खासगी दवाखान्याचे उंबरठे झिजवत असून दवाखान्यात गर्दी पाहायला मिळत आहे. त्यामुळे चांगले व मोफत आरोग्य पुरविण्यासाठी कटीबद्ध असलेले तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र व ग्रामीण रुग्णालयातील आरोग्य यंत्रणा सक्षम नाहीत म्हणून आजारी रुग्ण खाजगी दवाखान्याचा आधार घेत आहेत का ? असा सवाल यानिमित्ताने उपस्थित होतो.

उन्हाची तीव्रता वाढू लागली आहे त्यातच दिवसागणिक व्हायरल इन्फेक्शन सुद्धा वाढत चाललेले आहे.त्यामुळे नागरिकांनी स्वतः चा आणि आपल्या कुटुंबातील सदस्यांची काळजी घेण्याचा सल्ला वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून दिला जात आहे.

# अलिबागमध्ये प्रसूतीनंतर महिलेचा मृत्यू नातेवाइकांचा रुग्णालयाविरोधात संताप

**अलिबाग, दि. १६ : प्रतिनिधी**

लाडक्या मुलीला मुलगा झाला म्हणून आई, वडिलांसह कुटुंबीय आनंदित होते. मात्र, त्यांचा आनंद जास्त काळ टिकला नाही. या महिलेची तब्येत खालावली. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी तिचा मृत्यू झाला. शहरातील फुटाणे रुग्णालयात मंगळवारी सकाळी ही घटना घडली. मृत महिलेच्या नातेवाइकांनी डॉक्टर, परिचारिकेवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. अलिबाग पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

घोटवडे येथील सुचिता थळे (२९) हिला प्रसूती वेदना सुरू झाल्यानंतर डॉ. अनिल फुटाणे यांच्या रुग्णालयात सोमवारी दाखल केले. प्रसूतीसाठी सिझेरियन करावे लागेल, असे डॉ. फुटाणे यांनी सांगितले. त्यानुसार सिझेरियन केले. तिने बाळाला जन्म दिला.

सुचिताला मुलगा झाला म्हणून कुटुंबीय आनंदित होते. सायंकाळपर्यंत तिची तब्येत चांगली होती. रात्री छातीत जळजळ होत असल्याचे तिची जाऊ आश्लेषा थळे हिने परिचारिकांना सांगून डॉक्टरांना बोलावण्याची वारंवार विनंती केली. मात्र, सुचिताची प्रकृती अधिक बिघडली. त्यानंतर आश्लेषा यांनी याकडे लक्ष वेधण्यासाठी आरडाओरड केल्यानंतर डॉक्टर आले. त्यांनी तिला जिल्हा रुग्णालयात हलविण्यास सांगितले. मात्र, जिल्हा रुग्णालयात आणण्यापूर्वी तिचा मृत्यू झाला होता, अशी माहिती सुचिताच्या नातेवाइकांनी दिली.

या घटनेमुळे सुचिताचे नातेवाईक संतप्त झाले होते. जिल्हा रुग्णालयात त्यांनी गर्दी केली होती. अखेर पोलिसांना बोलावण्यात आले. यावेळी डॉक्टर, परिचारिकांनी उपचारात हलगर्जीपणा केल्याचा आरोप करून गुन्हा दाखल करावा, अशी मागणी नातेवाइकांनी केली.

> सुचिता थळे ही महिला प्रसूतीसाठी आली होती. तिच्या पोटातील पाणी कमी झाल्याने सिझेरियन करावे लागेल असे सांगितले. प्रकृती सकाळपर्यंत चांगली होती. दुसऱ्या दिवशी सकाळी हृदयाचे ठोके कमी पडू लागल्याने उपचार सुरू केले. जिल्हा रुग्णालयात दाखल केले. तिथेही प्रयत्न केले. मात्र, हृदयाचा रक्तपुरवठा बंद झाल्याने तिचा मृत्यू झाला.
>
> **- अनिल फुटाणे, स्त्रीरोगतज्ज्ञ**

# महापालिकेच्या शाळांमधील पाण्याच्या टाक्या अस्वच्छ

**ठाणे, दि. १६ : प्रतिनिधी**

ठाणे महापालिकेच्या शाळांना ज्या टाक्यांमधून पाणी पुरवठा केला जातो, त्या टाक्यांची स्वच्छता सहा-सहा महिन्यांनी होणे अपेक्षित असताना वर्षभर या टाक्यांची स्वच्छता होत नसल्याची गंभीर बाब समोर आली आहे.

शाळांमध्ये लावण्यात आलेल्या अनेक टाक्यांमध्ये गाळ आणि कचरा असल्याच्या तक्रारी शाळांमधूनच करण्यात आल्या आहेत. याच टाक्यांमधील पाण्याचा वापर विद्यार्थी आणि शिक्षक करत असल्याने विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी अक्षरशः खेळ सुरू असल्याचे यानिमित्ताने समोर आले आहे.

ठाणे महापालिकेच्या एकूण 64 शाळा असून या शाळांमध्ये 36 टाक्या बसवण्यात आल्या आहेत. याच टाक्यांमधील पाण्याचा वापर महापालिकेच्या शाळांमधील



विद्यार्थी आणि शिक्षक करत असून यामुळे त्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होण्याची चिन्हे आहेत. या टाक्यांची स्वच्छता आणि देखभाल दुरुस्तीची जबाबदारी ठाणे महापालिकेवरच असून सहा महिन्यांनी या टाक्यांची स्वच्छता होणे अपेक्षित आहे.

मात्र गेल्या वर्षभरापासून या टाक्यांची स्वच्छता झालीच नसल्याचे उघड झाले असून स्वतः शाळांनीच याबाबत पालिका प्रशासनाकडे तक्रारी केल्या असल्याचे उघड झाले आहे. काही शाळांनी तर पाण्याच्या टाक्यांमध्ये कचरा व गाळ असल्याच्या तक्रारी केल्या असून शिक्षण विभागाने ठाणे महापालिकेला पत्र दिले आहे.

**30 लाख 87 हजार खर्च**

शाळांच्या तक्रारीनंतर आता पालिकेच्या वतीने 36 शाळांच्या स्वच्छतेचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. जमिनीखालील आणि जमिनीवरील टाक्या या प्रस्तावानुसार स्वच्छ करण्यात येणार आहे. या टाक्यांच्या स्वच्छतेसाठी 30 लाख 87 हजारांचा खर्च अपेक्षित धरण्यात आला आहे. यासंदर्भात लवकरच निविदा मागवण्यात येणार असल्याची माहिती ही पालिका प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

# महाडमधील धरणांतील गाळ काढण्याची कामे रखडणार

**रायगड, दि. १६ : प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील जलसंपदा विभाग अंतर्गत येणाऱ्या धरणांमध्ये मागील एक ते दीड दशकांपासून निर्माण झालेल्या गाळामुळे धरणातील पाणीसाठा मध्ये होणारी घट लक्षात घेऊन या धरणातील गाळ काढला जावा याबाबत स्थानिकांकडून करण्यात आलेल्या मागणीकडे संबंधित विभागाकडून कार्यवाही न झाल्याने ही कामे चालू वर्षी देखील रखडणार असल्याचे स्पष्ट संकेत प्राप्त होत आहेत. या संदर्भात माणगाव येथील संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांकडे विचारणा केली असता त्यांनी धरण ज्या ग्रामपंचायत हद्दीमध्ये येते त्यांच्याकडून जलसंपदा विभागाला या संदर्भात शासनाच्या असलेल्या जलशिवार योजना तसेच गाळमुक्त धरण योजनेअंतर्गत कामे करण्याबाबतचे प्रस्ताव देणे अत्यावश्यक असल्याचे निदर्शनास आणले महाड मधील कोणत्याही ग्रामपंचायतीने या संदर्भात आज पावतो अधिकृतपणे याबाबत जलसंपदा विभागाकडे मागणी केली नसल्याचे खात्रीशीर वृत्त हाती आले आहे. महाड तालुक्यात चालू वर्षी एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यापासूनच ग्रामीण भागातील विविध भागांमध्ये टँकर फिरू लागले आहेत या सर्व बाबींचा विचार करता जून मध्ये सुरू झालेल्या पावसानंतर जुलै च्या मध्यावधी काळातच महाड तालुक्यातील वरंध खिंडवाडी खैरे कुर्ला कोथुर्डे धरणातील पाणी ओसंडून वाहू लागल्याचे चित्र गेल्या अनेक वर्षांपासून नागरिक अनुभवत आहेत यामुळेच त्यानंतरच्या किमान दोन महिने च्या कालावधीमध्ये झालेले पाणी हे फुकट जात असल्याने नागरिकांनी या संदर्भात जागरूकता दाखवीत संबंधित विभागाकडे धरण क्षेत्रातील गाळ काढण्याबाबत अथवा अन्य पर्यायाने येथील जलाशयाचा साठा कायम राहावा याकरिता विशेष उपाययोजना करावी अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# नैसर्गिक आपत्ती मधील पेण तालुक्यातील पंचनामे तहसील कार्यालयात सादर

**पेण, दि. १६ : प्रतिनिधी**

4 एप्रिल रोजी सायंकाळी अचानक आलेल्या वादळी वारे आणि पावसाच्या नैसर्गिक आपत्तीमुळे पेण तालुक्यातील सर्वच भागात मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्यानंतर प्रशासनाकडून तातडीने पंचनामे करण्याचे आदेश तलाठी, ग्रामसेवक, मंडळ अधिकारी, कृषी खात्याचे कर्मचारी यांना देण्यात आले होते. हे पंचनामे आता तहसील कार्यालयात सादर करण्यात येत असून आत्तापर्यंत तालुक्यातील एकूण 55 गावांमधील चारशेहून अधिक घरांचे नुकसान झाले असून अनेक ग्राम पंचायत, जिल्हा परिषदेच्या शाळा, अंगणवाड्या, सभागृह यांचे देखील मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

पेण तालुक्यात पेण, वडखळ, वाशी, हमरापूर, कामार्ली, कासु या मंडळांमध्ये या पंचनाम्यांचे काम करण्यात आले असून तालुक्यातील 55 गावांमध्ये संबंधित ग्रामसेवक, तलाठी, सर्कल, कृषी विभागाचे कर्मचारी यांनी नागरिकांच्या झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे केले आहेत. यामध्ये कच्च्या आणि पक्क्या एकूण 429 घरांचे अंशतः आणि पूर्णतः नुकसान झाले आहे. तर हमरापूर मंडळ विभागात एका गोठ्याचे देखील नुकसान झाले आहे. इतर नुकसानीचा विचार केला असता पेण मंडळ विभागातील अंगणवाडी, जिल्हा परिषद शाळा, हॉटेल, चिल्ड्रन्स फाऊंडेशन खासगी शाळा, बेलवडे येथील गोशाळा, रामराज समाजमंदिर, फॉर्म हाउस यांचे अंशतः नुकसान झाले आहे. तर कामार्ली मंडळ विभागातील जावळी अंगणवाडी, जावळी जिल्हा परिषद शाळा, ग्राम पंचायत कार्यालय, भवानीमाता मंदिर, दोरेवाडी सभामंडप, निधवली ग्राम पंचायत, सभामंडप, मानटवाडी जिल्हा परिषद शाळा, पाडले जिल्हा परिषद शाळा यांचे देखील अतोनात नुकसान झाले आहे. दरम्यान या सर्व आपत्तीचे पंचनामे करण्यात आले असून त्याचा अहवाल जिल्हा स्तरावर पाठवण्यात आला आहे.

> अचानक आलेल्या अवकाळी पाऊस आणि सोसाट्याच्या वाऱ्यामुळे पेण तालुक्यातील अनेक नागरिकांचे वेगवेगळ्या प्रकारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्याचे आम्ही तातडीने पंचनामे करून घेतले असून त्याचा अहवाल जिल्हा स्तरावर पाठवला आहे. लवकरात लवकर नुकसानग्रस्त नागरिकांना भरपाई मिळवून देण्याचे प्रशासनाचे प्रयत्न असतील.
>
> **तानाजी शेजाळ, तहसिलदार - पेण**

# पनवेल हे अवयव प्रत्यारोपणासाठी 'हब' व्हावे

## सार्वजनिक आरोग्य मंत्री मेघना बोर्डीकर

**पनवेल, दि. १६ प्रतिनिधी**

शहरातील नागरिकांसाठी आता आरोग्य सेवा अधिक सुलभ आणि सर्वसमावेशक होणार आहेत. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात डॉक्टर्स गॅलेक्सी मल्टीस्पेशालिटी क्लिनिक आणि धनवंतरी डायग्नोस्टिक्सच्या अत्याधुनिक पॅथोलॉजी लॅबची नुकतीच सुरूवात झाली आहे. राज्याच्या सार्वजनिक आरोग्य मंत्री मेघना बोर्डीकर यांनी या दोन्ही आरोग्य सुविधांचे उदघाटन केले. याप्रसंगी लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

यावेळी बोलताना आरोग्य मंत्री मेघना बोर्डीकर म्हणाल्या की, केंद्र आणि राज्य सरकार चांगल्या दर्जाच्या आरोग्य सुविधा सर्वांपर्यंत पोहोचवण्यासाठी काम करत आहे आणि जवादे कुटुंबीय देखील आरोग्य सेवेच्या माध्यमातून समाजाची सेवा करत आहेत, हे कौतुकास्पद आहे. त्यांनी पनवेल शहरात सुरु झालेल्या या आधुनिक आरोग्य सुविधांचे अभिनंदन केले. तसेच, पनवेल हे अवयव प्रत्यारोपणासाठी 'हब' व्हावे, असे प्रतिपादनही त्यांनी केले.

आमदार प्रशांत ठाकूर यांनीही जवादे कुटुंबियांचे अभिनंदन केले आणि त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. डॉक्टर्स गॅलेक्सी मल्टी स्पेशालिटी क्लिनिकमुळे परिसरातील रुग्णांना एकाच ठिकाणी विविध विशेषज्ञ डॉक्टरांचा सल्ला आणि आधुनिक निदान सुविधा उपलब्ध होणार आहेत, असे ते म्हणाले. डॉक्टर्स गॅलेक्सी मल्टीस्पेशालिटी क्लिनिकमध्ये ऑर्थोपेडिक्स, युरोलॉजी, नेफ्रोलॉजी, गायनेकोलॉजी, बालरोग, कार्डिओलॉजी, ऑर्गन ट्रान्सप्लांटेशन क्लिनिक यांसारख्या अनेक विशेषज्ञ विभागांतील तज्ज्ञ डॉक्टर नियमितपणे उपलब्ध असणार आहे. तसेच धनवंतरी डायग्नोस्टिक्सच्या अत्याधुनिक पॅथोलॉजी लॅबमध्ये विविध तपासण्यांसोबतच हिस्टोपॅथोलॉजी आणि सायटोलॉजीसारख्या विशेष निदान सेवा देखील उपलब्ध असणार आहेत. डॉक्टर कैलास जवादे आणि डॉक्टर वैशाली जवादे यांच्या प्रयत्नातून एकाच ठिकाणी मल्टीस्पेशालिटी क्लिनिक आणि अत्याधुनिक पॅथोलॉजी लॅब सुरू झाल्यामुळे पनवेल आणि आसपासच्या नागरिकांना उच्च दर्जाच्या वैद्यकीय सेवा मिळण्यास मदत होणार आहे. या उदघाटन सोहळ्याला माजी नगरसेवक राजू सोनी, माजी मुख्याध्यापक गोपीकिशन सिखवाल, प्रभाकर वाघीकर, हृदयरोगतज्ज्ञ डॉक्टर गोपाल जवादे, सुभाष देशमुख,बाधकांम व्यावसायिक मिलिंद पोटे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# उल्हासनगरात 13 जुगार खेळणाऱ्या महिलांसह पुरुषांवर पोलिसांची कारवाई

**उल्हासनगर, दि. १६ प्रतिनिधी**

उल्हासनगर शहरात जुगार मटका जोरात सुरु आहे. उल्हासनगर पोलिसानी दोन ठिकाणी छापा मारुन एकुण १३ महिला पुरुषावर कारवाई केली आहे. त्यांना जाग्यावरच बी एन एस ३५ (३) अन्वये नोटीस देवुन सोडुन देण्यात आले आहे. उल्हासनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या नेहरु चौकातील क्लासिक अपार्टमेंट मधील पाचव्या मजल्यावर काही महिला जुगार खेळत असल्याची माहीती पोलिस शिपाई सुशिल समाधान पाटील यांना मिळाली तेव्हा त्यांनी पोलिस पथकासह जावुन त्या महिलाना जुगार खेळताना रंगेहाथ पकडले आहे. अनिता नागेश कानडे (५७) रा कळवा , रितु नरेश चुग (४३) प्रिती हितेश अरोरा (५२) रानी प्रकाशराज बुधवानी (७०) रा उल्हासनगर , काजल लोटनदास कटारिया (६० काजल परमद वाधवा (५०) रा कल्याण , व विना चंदुलाल भगनानी (६०) हे जुगार खेळणाऱ्या महिलांचे नावे असुन दुसऱ्या कारवाईत सहा पुरुष जुगार खेळताना मिळुन आले आहेत. रितेश चंद्रशेखर जाधव (३४) रा . ठाणे , रवि भिकन साव (३०) अजय बाबु चौरे (२८ तेजिंदरसिंग आनंदसिंग (३९) नदीम छोटू कुरेशी (४१) जयदेव प्रकाश गवांदे(२७) ही जुगार खेळताना मिळुन आलेल्या जुगाऱ्यांची नावे असुन यांना सुध्दा पोलिसानी जाग्यावरच बी एन एस कलम ३५(३) अन्वये नोटीस देवुन सोडुन देण्यात आले आहे . दरम्यान उल्हासनगर शहरात जुगार व मटक्याचे धंदे जोरात सुरु आहेत. पोलिस मात्र थातुर मातुर कारवाई करुन यांना पाठबळ देत असल्याचा आरोप होत आहे. तर गावठी दारुचे धंदे संपुर्ण शहरात सुरु आहेत. पोलिस हे धंदे बंद करण्यात असफल झाले आहेत.

# शास्त्रीनगर रुग्णालयात वैद्यकीय सुविधांअभावी रुग्णांचे हाल मनसेचा रुग्णालयाला टाळे ठोकण्याचा इशारा

**डोंबिवली, दि. १६ : प्रतिनिधी**

कल्याण डोंबिवली पालिकेच्या डोंबिवलीतील शास्त्रीनगर रुग्णालयात वैद्यकीय सुविधांचा अभाव आहे. किरकोळ उपचारांसाठी रुग्णांना ठाणे, मुंबई येथील रुग्णांलयांत पाठविले जाते. काही औषधे बाहेरून विकत घेण्यास भाग पाडली जातात. विविध प्रकारच्या वैद्यकीय तपासण्या बाहेरून करण्यास सांगितल्या जातात. श्वान, सर्प दंशाच्या इंजेक्शनसह इतर औषधांचा रुग्णालयात नेहमीच तुटवडा असतो. शास्त्रीनगर रुग्णालयात सर्व प्रकारच्या वैद्यकीय सुविधा येत्या पंधरा दिवसात उपलब्ध करून द्या, नाहीतर रुग्णालयाला टाळे ठोकू, असा इशारा महाराष्ट्र नवनिर्माण सेना डोंबिवली विभागाच्या पदाधिकाऱ्यांनी मंगळवारी रुग्णालय प्रशासनाला दिला. मनसे जिल्हाध्यक्ष प्रकाश भोईर, माजी नगरसेविका कोमल पाटील, सुदेश चुडनाईक यांनी आपल्या मागण्यांचे निवेदन वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपा शुक्ला, शास्त्रीनगर मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. योगेश चौधरी यांना दिले. गर्भवती महिलांवर शास्त्रीनगर रुग्णालयात उपचारासाठी आली की तिची प्रकृती गंभीर आहे सांगून तिला मुंबई, ठाण्यात उपचारासाठी पाठविले जाते. श्वान, सर्प दंशाचे रुग्ण आले की त्यांना आयत्यावेळी इंजेक्शन उपलब्ध नाहीत असे सांगितले जाते. काही दिवसापूर्वी शास्त्रीनगर रुग्णालयात एक महिला प्रसूतीसाठी आली. तिला मुंबईतील रुग्णालयात नेले पाहिजे, असे शास्त्रीनगर रुग्णालयातील डॉक्टरांनी सांगितले. मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी ही माहिती वैद्यकीय विभागाच्या प्रमुखांना दिल्यावर शास्त्रीनगर रुग्णालयातील महिलेला प्रसूतीसाठी कल्याणमधील वसंत व्हॅली रुग्णालयात पाठविण्यात आले. तेथे महिलेची प्रसूती सुस्थितीत असल्याचे तेथील डॉक्टरांनी सांगितले. दिवा साबे परिसरातील साप चावलेली महिला शास्त्रीनगर रुग्णालयात उपचारासाठी आली होती. तिला मुंबईत उपचारासाठी पाठविण्याचे डॉक्टरांनी सूचित केले. त्या महिलेचा वाटेत मृत्यू झाला, अशी माहिती राहुल कामत यांनी दिली.

शास्त्रीनगर रुग्णालयातील हजेरी नोंदणी पुस्तकात एका डॉक्टरने २० एप्रिलपर्यंतच अगोदरच हजेरीच्या स्वाक्षऱ्या करून ठेवल्या होत्या, असे मनसे पदाधिकाऱ्यांच्या निदर्शनास आले. शास्त्रीनगर रुग्णालयात तज्ज्ञ डॉक्टर उपलब्ध करून देण्यासाठी मागील चार वर्षापासून प्रशासनाकडे पाठपुरावा केला जात आहे, असे पालिका डॉक्टरांनी सांगितले.

# ‘एमएमआर’ विभागाला पाणी पुरवठा करणाऱ्या कर्जत येथील शिलार धरण प्रकल्पाला मंजुरी

**कल्याण, दि. १६ : प्रतिनिधी**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील शहरे, गावांची भविष्यकालीन पाण्याची गरज भागविण्यासाठी शासनाने रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील शिलार नदीवरील शिलार धरण प्रकल्पाला मंजुरी दिली आहे. चार हजार ८६९ कोटी रूपये खर्चाचा हा प्रकल्प आहे. पोशीर नंतर शिलार धरण प्रकल्पाला शासनाने मंजुरी दिल्याने येत्या काळातील एमएमआर क्षेत्रातील वाढत्या लोकसंख्येची पाण्याची गरज भागविण्याचा प्रश्न मार्गी लागणार आहे. पोशीर, शिलार या धरण प्रकल्पांचे प्रस्ताव मागील २० वर्षापूर्वीच तयार करण्यात आले होते. परंतु, राजकीय इच्छाशक्तीचा अभाव, बदलणारी सरकारे, निधीची उपलब्धता अशा अनेक कारणांमुळे हे महत्वाचे धरण प्रकल्प रखडत होते. एमएमआर क्षेत्रातील वाढती लोकसंख्या, झपाट्याने होणारे नागरीकरण पाहून शासनाने या भागातील धरण प्रकल्प मार्गी लावण्याचा निर्णय घेतला आहे. शिलार धरण प्रकल्प खर्चाचा प्रस्ताव कोकण पाटबंधारे विकास महामंडळाच्या ठाणे विभागाचे कार्यकारी अभियंता विनोद मुंजाप्पा यांनी जलसंपदा विभागाला दोन महिन्यापूर्वी पाठवला होता. या प्रकल्पाची पुणे येथील राज्यस्तरिय तांत्रिक सल्लागार समितीने छाननी केली. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमाक प्राधिकरणाने या प्रकल्पाच्या प्रशासकीय मान्यतेला मंजुरी दिली आहे. पोशीर धरण प्रकल्पाप्रमाणे शिलार धरण प्रकल्पाला नगरविकास विभागाने निधी उपलब्ध करून द्यावा, अशी चर्चा मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत झाली आहे. शिलार धरण प्रकल्पाचे संकल्पचित्र नाशिक येथील मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेच्या माध्यमातून तयार करून घेण्यात आले आहे. प्रत्यक्ष प्रकल्पाच्या खर्चासाठी चार हजार ६५४ कोटी, इतर अनुषंगिक खर्चासाठी दोन हजार १४८ कोटी प्रस्तावित करण्यात आले आहेत, असे कोकण पाटबंधारे विकास महामंडळाच्या प्रस्तावात म्हटले आहे.

शिलार धरण प्रकल्प उल्हास खोऱ्यात येतो. रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील शिलार नदीवर १८९ दशलक्ष घनमीटर पाणी साठवणीचा हा धरण प्रकल्प आहे.

# उल्हास नदीतुन पाच हजार कांबा वासियांना विना फिल्टर दुषित पाणी पुरवठा

**उल्हासनगर, दि. १६ प्रतिनिधी**

ठाणे जिल्ह्याची तहान भागवणारी उल्हास नदी ही कल्याण मुरबाड रोड येथील रायते वरप कांबा म्हारळ गाव सिमेतुन वाहत असुन गेल्या काही वर्षात केमिकल, रसायन व सांडपाणी सोडल्या मुळे उल्हास नदी ही प्रदूषित झाली आहे. तर नदीत सर्व दुर जलपर्णी पसरली असुन नदीतील मासे, जीवजंतु मरण पावत असल्याने त्यांची दुर्गंधी उल्हास नदीतील पाण्यात पसरत चालली आहे.

गेली २५ वर्षे प्रशासना द्वारे उल्हास नदीतील पाणी फिल्टर न करता कांबा, पांचवा मैल, नवथरपाडा, वाघेरापाडा, पावशेपाडा येथील पाच गाव व पाडे येथील पाच हजार नागरिकांना दैनंदिन उपयोगा साठी पुरवठा करीत आहे. या दुषीत पाण्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असुन कुठल्याही प्रकारे फिल्टर व ट्रीटमेंट न करता उल्हास नदी चे दुषित पाणी नागरिकांना दिले जात असल्यामुळे त्वचारोग व अन्य शारीरिक व्याधी आणि गंभीर आजार होण्याची शक्यता भेड़सावत आहेत. या प्रकाराची प्रशासनाने लवकरच गंभीर दखल घेवुन पाच हजार कांबा वासियाना हक्काचे शुद्ध पाणी पिण्यासाठी मिळावे अशी मागणी ग्रामस्थ व उल्हास नदी बचाओ कृती समितीचे कार्यकर्ते निकेश पावशे यानी केली आहे. दरम्यान लवकर व्यवस्था न झाल्यास ग्रामस्थाना तीव्र आंदोलन करावे लागेल असा इशारा ही त्यांनी दिला आहे .

# उरण टपाल कार्यालयासाठी जागेची मागणी

## इच्छुकांनी 28 एप्रिल पर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन

**नवी मुंबई, दि. १६ : प्रतिनिधी**

भारत सरकारच्या टपाल विभागातर्फे उरण येथे नवीन टपाल कार्यालय स्थापन करण्यासाठी उरण परिसरात भाडे तत्वावर जागेची मागणी करण्यात आली आहे. यासाठी सुमारे 1 हजार 264 चौरस फूट चटई क्षेत्रफळ/ बांधकाम क्षेत्रफळ असलेली जागा आवश्यक असून, इच्छुकांनी दि. 28 एप्रिल पर्यंत अर्ज सादर करावे. असे आवाहन वाशी नवी मुंबई विभागाचे वरिष्ठ अधीक्षक डाकघर यांनी केले आहे.

भारताचे राष्ट्रपती यांच्या वतीने उरण परिसरात टपाल कार्यालय सुरु करण्यासाठी आवश्यक असलेली जागा भाडेतत्वावर देण्यासाठी इच्छुक व्यक्ती, संस्था किंवा बिल्डर यांनी अपेक्षित भाडे, उपलब्ध जागेचे क्षेत्रफळ, अटी व शर्ती (काही असल्यास) व जागेच्या तपशीलासह आपले अर्ज प्रवर अधीक्षक डाकघर, नवी मुंबई विभाग, वाशी – 400703 या कार्यालयाकडे दि. 28 एप्रिल 2025 असून, दुपारी 3.30 वाजेपर्यंत सिलबंद लखोटयात पाठवावेत.

जागा निवडताना तिची उपयुक्तता व दैनंदिन पोस्ट ऑफिसच्या कामकाजासाठी सुविधा उपलब्ध असणे आवश्यक आहे. सदर जागा ही इमारत किंवा इमारतीचा भाग असावा. तसेच सदर जागेचे चटई क्षेत्र/ बांधकाम क्षेत्र हे 1 हजार 264 चौरस फूट(अंदाजे) उरण टपाल कार्यालयासाठी असावे. थोडासा क्षेत्रफळात फरक असला तरी तो ग्राह्य धरला जाईल.

अर्जासोबत इमारतीचा बांधकाम आराखडा, जिल्हाधिकारी कार्यालयाची परवानगी, पंचायत परवानगी, 7/12 उताऱ्याची प्रत, वीज व पाण्याचे स्वतंत्र मीटर या संदर्भातील अर्जदाराच्या नावे असलेली आवश्यक कागदपत्रे जोडणे बंधनकारक आहे. अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख 28 एप्रिल 2025 असून, दुपारी 3.30 वाजेपर्यंत अर्ज सादर करता येतील. सर्व अर्जांची छाननी दि. 6 मे 2025 रोजी दुपारी 4.30 वाजता प्रवर अधीक्षक डाकघर, वाशी कार्यालयात अर्जदारांच्या उपस्थितीत केली जाणार आहे. अर्ज स्वीकारणे किंवा नाकारण्याचा संपूर्ण अधिकार टपाल विभागाकडे असून, कोणतेही कारण न देता अर्ज फेटाळण्याचा अधिकार विभागाने राखून ठेवलेला आहे.

अधिक माहितीसाठी प्रवर अधीक्षक डाकघर, नवी मुंबई विभाग, वाशी – 400703 (दूरध्वनी क्रमांक: 022-27666665/27663113) यांच्याशी सोमवार ते शुक्रवार सकाळी 10.00 ते संध्याकाळी 05.00 या वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन वाशी नवी मुंबई विभागाचे वरिष्ठ अधीक्षक डाकघर मुहम्मद साहिद यांनी एका प्रसिध्दी पत्रकाव्दारे केले आहे.

# रोहा तालुका बुद्धिबळ संघटनेमार्फत धाटाव येथे बुद्धीबळ स्पर्धा संपन्न




**रोहा, दि. १६ : प्रतिनिधी**

रोहा तालुका बुद्धीबळ संघटने मार्फत रविवार 13 एप्रिल रोजी रोहा तालुक्यातील खेळाडूंसाठी 15 वर्षाखालील व जिल्ह्यातील खेळाडूंसाठी खुल्या गटाची बुद्धिबळ स्पर्धा धाटाव येथील रोहा इंडस्ट्रियल असोसिएशन च्या सभागृहात घेण्यात आली. या स्पर्धेचे उद्घाटन सकाळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी युवा नेते रुपेश बामुगडे संतोष माने , दिपक जमदाडे ,मयुरेश मोंडे, मंगेश देवकर, पोलीस अधिकारी जयेंद्र पेडवी,रोहन चव्हाण उपस्थित होते. बुद्धिबळ स्पर्धेत एकूण 76 स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. सायंकाळी बक्षीस वितरण रोहा प्रेस क्लब अध्यक्ष मा. श्री सुहास खरीवले व मा. श्री अशोक मोरे उपसरपंच या मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. रोहा तालुका बुद्धिबळ संघटनेची स्थापना झाल्यानंतर प्रथमच अशी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. रोहा तालुका बुद्धीबळ संघटनेचे अध्यक्ष श्री संकेत खोत, उपाध्यक्ष श्री अमर सलागरे, सचिव श्री विक्रांत जाना, खजिनदार श्री महेश बामुगडे, श्री योगेश भगत, श्री विवेक कांबळे, श्री विवेक कानडे ,श्री हेमंत शेडगे यांनी ही स्पर्धा यशस्वी होण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. भविष्यात आशा जिल्हास्तरीय स्पर्धा आयोजित करण्यात येणार असल्याचे संघटने मार्फत सांगण्यात आले आहे. स्पर्धेसाठी RIRC रोहा, रामशेठ नाकती,अमर सलागरे, मंगेश देवकर, योगेश भगत यांच्या सहकार्याबद्दल आयोजका कडून त्यांचे विशेष आभार व्यक्त करण्यात आले.

# 40 हजार उत्तर मुंबईकरांनी घेतला आयुष्मान भारत योजनेचा लाभ

## पीयूष गोयल यांच्या प्रयत्नांना यश

मुंबई, दि. १६ : प्रतिनिधी

जगातील सर्वांत मोठी विमा योजना म्हणून आयुष्मान भारत योजनेला ओळखले जाते. देशातील ४० टक्के गरीब लोकांना दरवर्षी ५ लाख रुपयांपर्यंतच्या मोफत उपचारांची यात तरतूद आहे. उत्तर मुंबईतआयुष्मान भारत योजनेचा ४० हजाराहून अधिक नागरिकांनी लाभ घेतला. तसेच उत्तर मुंबईतून योजनेला भरभरून प्रतिसाद मिळत आहे. केंद्रीय वाणिज्य व उद्योग मंत्री आणि उत्तर मुंबईचे खासदार पीयूष गोयल यांच्या प्रयत्नांना यश आले आहे. आयुष्मान भारत योजनेचा लाभ सर्व गरीब जनतेपर्यंत पोहोचावा, यासाठी त्यांनी विशेष मोहिम हाती घेतली आहे.



उत्तर मुंबईमध्ये आयुष्मान भारत योजनेचा लाभ ४० हजाराहून अधिक नागरिकांनी घेतला असून दररोज नोंदणी देखील सुरू आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या योजनेची घोषणा केल्यानंतर उत्तर मुंबईतील गरीब जनतेला या योजनेचा पुरेपूर फायदा मिळावा, यासाठी विशेष प्रयत्न सुरू आहेत. मुंबईतील उत्तर विभागात (उदा. दहिसर, बोरीवली, कांदिवली आणि मालाड) विविध सामाजिक-आर्थिक स्तरांतील लोक राहतात. या भागांमध्ये गरीब आणि आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांची संख्या उल्लेखनीय आहे. त्यामुळे एकही गरीब माणूस हा उपचाराविना मृत्यूमुखी पडू नये. यासाठी आयुष्मान भारत योजनेचा लाभ सर्वांनी घ्यावा आणि आपले आरोग्य जपावे, असे आवाहन केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी केले.

कांदिवली पश्चिमेकडील एस.व्ही.रोड येथील लोककल्याण या त्यांच्या कार्यालयात सकाळी ९ ते सायं. ६.३० वाजेपर्यंत कधीही येऊन मोफत आयुष्मान भारत कार्ड तसेच इतर योजनांचे कार्ड बनवू शकता. आयुष्मान भारत योजनेच्या कार्डचा लाभ सगळ्यांना घ्यावा आणि गोरगरिबांचे प्राण वाचावे, यासाठी उत्तर मुंबई भाजपच्या कार्यकर्त्यांनी स्वतःला झोकून दिले. 'उत्तर मुंबईला, उत्तम मुंबई' बनवायचे असेल तर नागरिकांचे आरोग्य चांगले असले पाहिजे असे मत केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी व्यक्त केले.

**कोणती कागदपत्रे लागतात?**

आयुष्मान भारत योजनेचे कार्ड काढण्यासाठी रेशन कार्ड, आधार कार्ड लागते. त्यासोबतच आधार कार्डशी मोबाइल लिंक करणे गरजेचे आहे.

**१३५६ आजारांचा समावेश**

आयुष्मान भारत योजनेतून १३५६ प्रकारच्या आजारांवर उपचार केले जातात. या उपचारासाठी लागणारे पैसे शासन देते. सर्व गंभीर आजारांवरील उपचार या योजनेतून करण्यात येतात.

# राज्यात 22 ते 25 एप्रिल 2025 या कालावधीत पं. दीनदयाळ उपाध्याय मानव एकात्म हीरक महोत्सव

मुंबई, दि. १६ : प्रतिनिधी




समाजातल्या शेवटच्या घटकांपर्यंत विकास पोहचला पाहिजे, खऱ्या अर्थाने अंत्योदयांच्या माध्यमानेच लोकशाहीच्या उदिष्टांची पूर्ती होईल, हा मौलिक विचार पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी मांडला. त्यांच्या विचारांवर आधारित पंडित दीनदयाळ उपाध्याय एकात्म मानवदर्शन हीरक महोत्सव राज्यभरात राबवण्यात येणार आहे. 'आदर्श गाव' ही संकल्पना या महोत्सवात राबवण्यात येणार आहे शासनाच्या सर्व विभागांनी तसेच जिल्हास्तरावर हा कार्यक्रम यशस्वीपणे राबवावा असे कौशल्य विकास,उद्योजकता आणि नावीन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी निर्देश दिले.

राज्यात 22 ते 25 एप्रिल2025 या कालावधीत पंडित दीनदयाळ उपाध्याय एकात्म मानवदर्शन हीरक महोत्सव राबवण्यात येणार आहे याबाबत मंत्रालयात मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्या दालनात बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा बोलत होते. यावेळी मुख्य सचिव सुजाता सौनिक, कौशल्य विकास विभागाच्या अपर सचिव मनीषा वर्मा, दिव्यांग कल्याण विभागाचे अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर, पर्यटन विभागाचे प्रधान सचिव अतुल पाटणे, शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल, महिला व बाल विकास विभागाचे सचिव अनुप कुमार यादव, आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे, दीनदयाळ संशोधन संस्थेचे सचिव अतुल जैन उपस्थित होते. दूरदृश्यप्रणालीद्वारे राज्यातील सर्व जिल्हाधिकारी या बैठकीत सहभागी झाले होते. या महोत्सावासाठी शासनाने पंडित दीनदयाळ उपाध्याय एकात्म मानवदर्शन महोत्सव समिती स्थापन केली असून या समितीचे कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा अध्यक्ष आहेत. मानव कल्याण यासंदर्भातील पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचे मौलिक विचार समाजात रुजावेत या उद्देशाने देशभरात पंडित दीनदयाळ उपाध्याय मानव एकात्म हीरक महोत्सव साजरा होणार आहे. देशभरात या महोत्सवाला सुरुवात करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य असल्याची माहिती कौशल्य विकास मंत्री श्री. लोढा यांनी या बैठकीत दिली.

पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचे कार्य, विचार प्रणाली, एकात्म मानवदर्शन आदि बाबतची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहचावी यासाठी प्रत्येक जिल्ह्यात पंडितजींच्या विचारांवर आधारित एक लाख पुस्तिकांचे वितरण करण्यात येणार आहे. या महोत्सवात ग्रामीण भागात बचतगट, अंगणवाड्या आणि शाळांमध्ये कौशल्य विकासावर भर देण्यात येणार आहे. तसेच गावातील स्वच्छता विषयक उपक्रम, घनकचऱ्याची विल्हेवाट लावण्याबाबत योजना तयार करण्याच्या सूचनाही जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत शासकीय योजना पोहचवण्यासाठी या महोत्सवात युद्ध पातळीवर प्रयत्न करण्याच्या सूचना मंत्री श्री. लोढा यांनी यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. या महोत्सवात महिला व बाल विकास, शालेय शिक्षण, ग्रामविकास, सांस्कृतिक कार्य, आदिवासी विकास, पर्यावरण, पर्यटन या विभागाकडूनही या महोत्सवात विविध कार्यक्रमाद्वारे योगदान दिले जाणार आहे.

मुख्य सचिव सुजाता सौनिक म्हणाल्या की, शासनाच्या मार्गदर्शक सूचनाप्रमाणे जिल्हास्तरावर समिती स्थापन करून हा महोत्सव जिल्हाधिकारी यांनी यशस्वी करावा, अशा सूचना यावेळी त्यांनी दिल्या.

# दर्गाह शरीफ शाह तजम्मुल शाह ऊर्फ पंखेवाले बाबा ट्रस्टच्या मिळकतीची फेरमोजणी करा - मंत्री दत्तात्रय भरणे

मुंबई, दि. १६ : प्रतिनिधी

घाटकोपर येथील दर्गाह शरीफ शाह तजम्मुल शाह ऊर्फ पंखेवाले बाबा ॲण्ड मस्जिद ट्रस्टच्या मिळकतीमध्ये होत असलेल्या अनधिकृत बांधकामांबाबत तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर मिळकतीची फेरमोजणी करण्याच्या सूचना अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिल्या.

मंत्रालयात दर्गाह शरीफ शाह तजम्मुल शाह अलियास पंखेवाले बाबा अँण्ड मस्जीद ट्रस्ट, घाटकोपर, मुंबई यांच्या मिळकतीमध्ये होत असलेल्या अनाधिकृत बांधकामाबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी मंत्री श्री. भरणे बोलत होते. यावेळी अल्पसंख्याक विभागाचे सचिव रुचेश जयवंशी, उपसचिव मिलिंद शेनॉय, मुख्य कार्यकारी अधिकारी जुनेद सय्यद, दर्गाह शरीफ शाह तजम्मुल शाह अलियास पंखेवाले बाबा अँण्ड मस्जीद ट्रस्टचे प्रतिनिधी उपस्थित होते. मंत्री श्री. भरणे यावेळी म्हणाले की, फेरमोजणी दरम्यान दोषी आढळणाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

# तमाशा व कलाकेंद्र कलावंतांच्या तक्रारी निवारणासाठी समिती गठीत

मुंबई, दि. १६ : प्रतिनिधी

राज्यातील तमाशा आणि कलाकेंद्र कलावंतांच्या विविध तक्रारींचे निवारण करण्यासाठी दोन स्वतंत्र समित्यांच्या गठनाचा निर्णय सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार यांनी घेतला आहे.

या समित्या तमाशा आणि कलाकेंद्र क्षेत्रातील फड मालक, कलाकार, वादक यांच्यासमोरील समस्या समजून घेऊन, पारंपरिक लोककला टिकवून ठेवण्यासाठी उपाययोजना सुचवतील, अशी माहिती मंत्री ॲड.शेलार यांनी दिली. तमाशा तक्रार निवारण समितीमध्ये सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक हे अध्यक्ष असणार असून, तमाशा फड मालक रघुवीर खेडकर, तमाशा फड मालक गोपाळ नाना शेषेराव, फड मालक संभाजी जाधव, कलाकार मंगलाताई बनसोडे, कलाकार अतांबर तात्या शिरढोणकर, अभ्यासक गणेश चंदनशिवे, अभ्यासक खंडुराज गायकवाड व सहसंचालक सदस्य म्हणून काम पाहतील.

कलाकेंद्र तक्रार निवारण समितीमध्ये संचालक सांस्कृतिक कार्य हे अध्यक्ष असणार असून, कलाकेंद्र मालक बाळासाहेब काळे, कलाकेंद्र मालक अभिजित काळे, कलाकार रेश्मा परितेकर, कलाकार सुरेखा पुणेकर, कलाकार प्रमिला लोदगेकर, कलाकार संघटनेचे धोंडीराम जावळे, अभ्यासक प्रकाश खांडगे व सहसंचालक हे सदस्य म्हणून काम पाहतील.

या समित्यांचा कार्यकाळ 30 दिवसांचा असून, आवश्यकतेनुसार या क्षेत्रातील इतर अभ्यासक, कलाकार आणि कलाकेंद्र चालक यांनाही पाचारण करण्यात येणार आहे. या समित्यांमार्फत प्राप्त होणाऱ्या शिफारसीनुसार शासनाकडून निर्णय घेतला जाणार आहे.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते 30 एप्रिलला आंबा महोत्सवाचे उद्घाटन

मुंबई, दि. १६ : प्रतिनिधी

दिल्लीच्या महाराष्ट्र सदनात आंबा महोत्सवाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते येत्या ३० एप्रिल रोजी सायंकाळी ६ संपन्न होणार आहे. मुंबई उत्तर पश्चिम लोकसभा क्षेत्राचे शिंदे सेनेचे खासदार रविंद्र वायकर यांच्या संकल्पनेतून महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

या महोत्सवाला केंद्रीय मंत्री, महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री तसेच उपमुख्यमंत्री यांच्या बरोबरच देशाच्या विविध राज्यातील खासदार व आमदारही उपस्थित राहणार आहेत. ३० एप्रिल ते १ मे (महाराष्ट्र दिन) पर्यंत आंबा महोत्सव येथे संपन्न होणार आहे. या महोत्सवात विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे ही आयोजन करण्यात येणार आहे.

कोकणातील देवगड व रत्नागिरीतील हापूस आंबा महाराष्ट्रात व देशभरात खूपच प्रसिद्ध आहे. कोकणातील शेतकऱ्यांना विविध राज्यांमध्ये थेट बाजारपेठ उपलब्ध व्हावी, त्यांना जास्तीत जास्त नफा मिळावा, आंब्याच्या निर्यातीला अधिक चालना मिळावी, या उदात्त हेतूने दिल्लीच्या महाराष्ट्र सदनात या दोन दिवसीय आंबा महोत्सवाचे आयोजन केले आहे. या महोत्सवामुळे ग्रामीण भागातील उद्योजकांना मोठ्या प्रमाणात बाजारपेठ उपलब्ध होणार असल्याची माहिती खासदार वायकर यांनी लोकमतला दिली.

या महोत्सवाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शुभ हस्ते व्हावे यासाठी त्यांची भेट घेतली होती. प्रत्येक राज्यातील जिल्ह्यात उत्पादित होणाऱ्या फळांना जास्तीत जास्त मोठ्या प्रमाणात बाजारपेठ उपलब्ध व्हावी यासाठी राज्यांनी प्राधान्य देण्याची आवश्यकता आहे, असे मत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भेटी दरम्यान व्यक्त केले होते अशी माहिती त्यांनी दिली.

# मुंबईच्या आर्द्रतेत वाढ होणार, उकाडा वाढण्याची शक्यता

मुंबई, दि. १६ : प्रतिनिधी

येत्या काही दिवसांत मुंबईकरांना उष्णतेसह वाढत्या आर्द्रतेचा तडाखा सहन करावा लागण्याची शक्यता आहे. सध्या मुंबईत तापमान ३४ ते ३६ अंश सेल्सिअसदरम्यान आहे, मात्र यासोबतच आर्द्रतेतही वाढ होण्याचा अंदाज आहे.सध्या मुंबईत उकाडा आणि उन्हाचा तडाखा सहन करावा लागत आहे. आता पुढील तीन – चार दिवस आर्द्रतेचे प्रमाण ८० ते ८५ टक्क्यांच्या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे उकाड्याची तीव्रता अधिक जाणवेल, आणि विशेषतः सकाळी व संध्याकाळी अधिक घाम येण्याची शक्यता आहे. सामान्यतः एप्रिल महिन्यात उष्णतेचा पारा चढतोच, मात्र यंदा आर्द्रतेत होणारी वाढ ही मुंबईकरांसाठी अधिक त्रासदायक ठरत आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी पुरेशी काळजी घेणे आवश्यक आहे. दरम्यान, मुंबईच्या तापमानाचा पाराही पुढील काही दिवस चढाच राहणार आहे.

यामुळे मुंबईकरांना उन्हाचा तडाखाही सहन करावा लागणार आहे. मुंबईच्या तापमानात सोमवारपासून वाढ होण्यास सुरुवात झाली आहे. मुंबईत सलग दुसऱ्या दिवशी ३६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. ही वाढ कायम राहण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. हवेची द्रोणीय स्थिती तयार होत आहे. यामुळे मुंबईच्या तापमानात वाढ झाली आहे. तापमानातील ही वाढ पुढील काही दिवस कायम राहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. दरम्यान, अचानक तापमानात वाढ झाल्यामुळे नागरिकांना त्याचा त्रास होत आहे. उकाडा आणि उन्हाचा ताप यामुळे मुंबईकर हैराण झाले आहेत.

# काँग्रेसचे आंदोलन बेगडी, मालमत्ता लुटण्याचा अधिकार नाही- रावसाहेब दानवे यांचे टीकास्त्र

मुंबई, दि. १६ : प्रतिनिधी

नॅशनल हेराल्ड प्रकरणात मालमत्ता हडपणाऱ्या काँग्रेसच्या आंदोलनाला भाजपाचा कडवा विरोध असून, हे आंदोलन बेगडी असल्याची घणाघाती टीका भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी केली. बुधवारी मुंबईतील प्रदेश कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन उपस्थित होते. दानवे म्हणाले, "काँग्रेसला आंदोलनाचा अधिकार आहे, पण कोणाचीही मालमत्ता आणि निधी लुटण्याचा अधिकार नाही." नॅशनल हेराल्ड प्रकरणाचा तपशील देताना दानवे म्हणाले, "१९३७ मध्ये ५ हजार स्वातंत्र्यसैनिकांनी उदात्त हेतूने सुरू केलेले हे वर्तमानपत्र आणि कंपनी गांधी-नेहरू कुटुंबाची जहागीर नव्हती. त्यांच्याकडे मालकी हक्काची नोंद नाही. तरीही काँग्रेसने 'यंग इंडिया' कंपनी स्थापन करून मालमत्तेचा दुरुपयोग केला." २०१२ मध्ये भाजपा नेते सुब्रमण्यम स्वामी यांनी काँग्रेसवर आर्थिक फसवणुकीचा आरोप करत याचिका दाखल केली होती. त्यात 'यंग इंडिया'ने नियमांच्या विरोधात ९० कोटी २५ लाख रुपये वसूल केल्याचा उल्लेख होता.

दानवे पुढे म्हणाले, "२००८ मध्ये आर्थिक अडचणीमुळे वर्तमानपत्र बंद पडले. तेव्हा काँग्रेसने 'असोसिएटेड जर्नल्स लिमिटेड'ला ९० कोटींचा निधी दिला, जो बेकायदेशीर आहे. कोणत्याही खासगी संस्थेला पक्षाचा निधी देणे नियमाविरुद्ध आहे." या कंपनीकडे दिल्ली, लखनऊ, भोपाळ, मुंबई, इंदौर, पटना आणि पंचकुला येथे मालमत्ता आहेत, ज्यांचा काँग्रेसने गैरवापर केल्याचा आरोप आहे. दानवे यांनी सांगितले की, कोर्टाच्या आदेशानुसार सरकारी यंत्रणेने चौकशी केली असून, पुढील कारवाई सुरू आहे. काँग्रेसने केलेला हा भ्रष्टाचार उघड झाला असून, त्यांचे आंदोलन बेगडी आहे, असा घणाघात त्यांनी केला.

# दापोली मतदारसंघासाठी योगेश कदम यांच्याकडून 150 कोटींची भरीव तरतूद! विकासकामांना गती

मुंबई, दि. १६ : प्रतिनिधी

दापोली मतदारसंघात राज्यमंत्री योगेश कदम यांनी १५० कोटींपेक्षा अधिक निधी मंजूर करून सर्वांगीण विकासाला गती दिली आहे. या निधीतून प्रशासनिक सुविधा, पर्यटन, पाटबंधारे आणि तांडा वस्ती सुधार योजनांसाठी भरीव कामे हाती घेण्यात आली आहेत. दापोलीत उपविभागीय अधिकारी आणि तहसील कार्यालयाच्या नव्या प्रशासकीय इमारतीसाठी ३०.४७ कोटी, तर मंडणगड येथील तहसील कार्यालयासाठी २३.२० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. पर्यटन विकासाला चालना देण्यासाठी कोकण पर्यटन विकास कार्यक्रमांतर्गत दापोलीतील करदे समुद्रकिनाऱ्याच्या सौंदर्यीकरणासाठी १४.२० कोटी मंजूर झाले आहेत. तसेच, मंडणगड येथील बाणकोट किल्ल्यापर्यंत ६०.५ किमी लांबीचा रोपवे प्रस्तावित असून, दापोलीतील केशवराज विष्णू मंदिर परिसरातील १.२ किमी लांबीचा रोपवे अंतिम टप्प्यात आहे. गोवा किल्ला, भुईकोट किल्ला आणि सुवर्णदुर्ग किल्ल्याच्या (हर्णे, दापोली) विकासामुळे स्थानिक पर्यटनाला चालना मिळेल. जलसिंचनासाठी मंडणगडातील पणदेरी धरण लघुपाटबंधारे प्रकल्पाच्या दुरुस्तीसाठी ६०.४१ कोटी मंजूर झाले आहेत. वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजनेतंर्गत सहा तांड्यांसाठी १ कोटी ५ लाख रुपयांचा निधी मंजूर करून विमुक्त जाती, भटक्या जमातींच्या वस्तींच्या विकासाला हातभार लावला आहे.

# भाजप मुंबईत देणार एका विधानसभेला तीन अध्यक्ष

मुंबई, दि. १६ : प्रतिनिधी

आगामी मुंबई महापालिका निवडणुकांच्या दृष्टीने मुंबई भाजपात संघटनात्मक बदलांचे वारे वाहू लागले आहेत. नव्याने पक्षात येणाऱ्यांना संधी देतानाच अधिकाधिक युवांना सक्रिय कार्यकर्ते, पदाधिकारी बनविण्याचे पक्षाचे धोरण आहे. त्यासाठी विधानसभा क्षेत्रात एकाच्या जागी तीन-तीन अध्यक्ष नेमण्याची प्रक्रिया सुरू आहे. मात्र, त्यासाठी कमाल वय ४५ असा निकष ठरविल्याने अनेक मतदारसंघांत जुन्या कार्यकर्त्यांचा हिरमोड झाला आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या महाराष्ट्र दौऱ्यानंतर मुंबई भाजपमधील हालचालींना चांगलाच वेग आला आहे. सोमवारी सर्व आमदार, प्रमुख नेत्यांच्या तातडीच्या बैठकीनंतर मंगळवारीही प्रदेश कार्यालयात संघटनात्मक बाबींवर चर्चा झाल्याचे समजते. दुसरीकडे पक्षांतर्गत निवडणुकांचा नवा फॉर्म्युला लागू झाल्याने मोठ्या प्रमाणावर पक्षांतर्गत घुसळण सुरू आहे. संघटनात्मक फेरबदल करत अधिकारांचे विकेंद्रीकरणाचे प्रयत्न भाजपाने हाती घेतले आहेत. १०० बूथमागे एक मंडल अध्यक्ष या सूत्रानुसार मुंबईतील ३६ विधानसभांकरिता १०८ मंडल अध्यक्ष नेमले जाणार आहेत. यापूर्वी एका विधानसभा क्षेत्रासाठी केवळ एकच अध्यक्ष दिला जात होता. मात्र, आता तिघांना संधी मिळणार आहे. पन्नाप्रमुख, बूथप्रमुख, वॉर्ड अध्यक्ष, मंडल अध्यक्ष, जिल्हाध्यक्ष आणि मुंबई अध्यक्ष अशी रचना मुंबई भाजपमध्ये आहे. मात्र, गेल्या अनेक वर्षांपासून भाजपा ही केंद्र आणि राज्यातील सत्तेच्या केंद्रस्थानी असल्याने अन्य पक्षांतून भाजपात मोठ्या प्रमाणावर इनकमिंग सुरू झाले आहे. या सर्वांना सामावून घेण्यासाठी नवी रचना अवलंबली जात आहे. मुंबईतील एका लोकसभा मतदारसंघात साधारण बाराशे ते दीडहजार बूथ असतात. त्यातील १०० बूथमागे एक मंडल अध्यक्ष नेमण्याची प्रक्रिया राबविली जात आहे. त्यामुळे एकेका विधानसभेत दोन ते तीन मंडल अध्यक्षांना संधी मिळणार आहे. मात्र, या मंडल अध्यक्षांची नियुक्ती करताना ४५ वर्षांखालील कार्यकर्त्यांना संधी देण्याचे धोरण आहे. येत्या १५ मेपर्यंत मुंबई अध्यक्ष नेमायचा असल्याने, त्याआधी मंडल अध्यक्ष आणि जिल्हाध्यक्ष निवडीची प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे.

**बंद पाकिटात नावांची शिफारस**

मंडल अध्यक्ष निवडण्यासाठी प्रत्येक लोकसभा मतदारसंघात निरीक्षक पाठविले गेले. तिथे संबंधितांकडून बंद पाकिटात एका जागेसाठी तीन नावांची शिफारस घेतली गेली. लवकरात लवकर स्थानिक नियुक्त्यांची प्रक्रिया पूर्ण करण्याचा प्रयत्न असल्याचे वरिष्ठ भाजप नेत्याने सांगितले. दुसरीकडे वयाची अट सांभाळतानाच संबंधितांची क्षमताही विचारात घ्यावी लागणार आहे. अनेक ठिकाणी वर्षानुवर्षे पक्षाचे काम करणारे आता सत्ता आल्यावर बेदखल होणार नाहीत, याचाही विचार करावा लागणार असल्याचे या नेत्याने सांगितले.

# मासळी विक्रेत्यांच्या गाळ्यांवर महापालिकेचा हातोडा

मुंबई, दि. १६ : प्रतिनिधी

बेलासिस पुलालगतच्या बाजारातील सात मासळी विक्रेत्या महिलांचे महानगरपालिका प्रशासनाने ताडदेव येथील तुळशीवाडी परिसरातील महानगरपालिकेच्या मंडईत पुनर्वसन करण्यात आले. मात्र, उर्वरित महिला बेलासिस पुलालगतच्या बाजारातच व्यवसाय करत होत्या. महानगरपालिकेने या मासळी विक्रेत्यांच्या गाळ्यांवर मंगळवारी तोडक कारवाई केली. दरम्यान, महापालिकेने कोणत्याही पूर्वसूचनेविना कारवाई केली. तसेच मासळी विक्रेत्यांकडील मासे व अन्य सामान फेकून दिल्याचा आरोप मासळी विक्रेत्यांनी केला आहे.

बेलासिस पुलाच्या बांधकामात लगतच्या बाजारातील मासळी विक्रेत्या महिलांचे व्यवसाय अडथळा ठरत होते. त्यामुळे महानगरपालिकेने वैध कागदपत्रे आणि अनुज्ञापत्र असलेल्या महिलांचे पुनर्वसन करण्याचा निर्णय घेतला. पुनर्वसनाचा तिढा सोडविण्यासाठी ९ डिसेंबर २०२४ रोजी महानगरपालिकेच्या डी विभाग कार्यालयात पालिका अधिकारी आणि मासळी विक्रेत्या महिलांमध्ये बैठक झाली. अखिल महाराष्ट्र मच्छीमार कृती समितीचे सदस्य या बैठकीला उपस्थित होते. बैठकीत वैध कागदपत्रे आणि अनुज्ञापत्र सादर करण्याच्या सूचना मासळी विक्रेत्या महिलांना करण्यात आल्या. त्यांनतर २८ महिलांनी महापालिकेकडे कागदपत्रे सादर केली. पडताळणीनंतर ७ मासळी विक्रेत्या महिला पुनर्वसनासाठी पात्र असल्याचे पालिकेने स्पष्ट केले. दरम्यान, ताडदेवमधील तुळशीवाडी येथील महापालिकेच्या मंडईत त्यांचे पुनर्वसन करण्यात आले.

बृहन्मुंबई महानगरपालिका
एन वार्ड
ACN/04/OD/EN दि. 08.04.2025

उप: एन वॉर्डातील अतिक्रमण विभागासाठी एनजीओ मजूर पुरवठा करण्याच्या कामासाठी वृत्तपत्रांमध्ये सोबतची सूचना प्रसिद्ध करणे.

जाहिरात

वरिष्ठ निरीक्षक (एनक्रोचमेंट) 'एन' वॉर्डने एन वॉर्डमधील अधिकृत स्थानिक एनजीओच्या रजिस्टरमधून एन वॉर्डमधील एन्क्रोचमेंट विभागासाठी सहा महिन्यांसाठी कंत्राटी पद्धतीने कामगार उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव मागवला आहे. इच्छुक एनजीओ सर्व आवश्यक कागदपत्रांसह अर्ज शुल्क रु.३६३०+१८% जिएसटी रु.४२८४/– सह दि. १६.०४.२०२५ पासून ते २८.०४.२०२५ पर्यंत सुट्टी वगळून सकाळी १०:३० ते ०३:०० पर्यंत खाली दिलेल्या पत्त्यावर सादर करू शकतात.

हे अर्ज लॉटरी पद्धतीने सीनियर इन्स्पेक्टर (एनक्रोचमेंट) 'एन' वॉर्डमधील चेंबरमध्ये उघडले जातील.

पत्ता
वरिष्ठ निरीक्षक (एनक्रोचमेंट) 'एन' प्रभाग
घाटकोपर (पूर्व), मुंबई – ७७

वरिष्ठ निरीक्षक (एनक्रोचमेंट)
'एन' प्रभाग

PRO/130/ADV/2025-26

झाडे लावा ... झाडे जगवा ....

# देशात केवळ 8 टक्के महिला पोलीस अधिकारी; इंडिया जस्टीस रिपोर्टमधून उघड

मुंबई, दि. १६ : प्रतिनिधी

गेल्या अनेक वर्षांत पोलीस प्रशासनात महिला दाखल झाल्या असल्या तरी अधिकारी स्तरावर महिलांचे प्रतिनिधित्व कमी आहे. राष्ट्रीय पातळीवर फक्त ८ टक्के महिला पोलीस अधिकारी असल्याचे भारत न्याय अहवालातून समोर आले आहे. पोलीस, न्यायव्यवस्था, तुरुंग आणि कायदेशीर मदत असे विविध घटक विचारात घेऊन तयार करण्यात आलेल्या या अहवालाचे मंगळवारी प्रकाशन करण्यात आले. त्यानुसार पोलीस प्रशासनात महिलांची संख्या सर्वाधिक असली तरी अधिकारी स्तरावर महिलांची संख्या सर्वात कमी असल्याचे अहवालावरून स्पष्ट झाले आहे.

टाटा ट्रस्टतर्फे भारतातील पोलीस, न्यायव्यवस्थेचा आढावा घेणारा 'इंडिया जस्टिस रिपोर्ट' प्रसिद्ध करण्यात येतो. यंदा या अहवालाचे चौथे वर्ष आहे. सेंटर फॉर सोशल जस्टिस, कॉमन कॉज, कॉमनवेल्थ ह्युमन राइट्स इनिशिएटिव्ह, विधी सेंटर फॉर लीगल पॉलिसी आणि हाऊ इंडिया लिव्हस यांच्या सहकार्याने हा अहवाल प्रकाशित करण्यात येतो. या अहवालानुसार, राष्ट्रीय पातळीवर ८ टक्के महिला पोलीस अधिकारी आहेत. तर, ५२ टक्के महिला या पोलीस उपनिरीक्षक पदावर असून, २५ टक्के महिला या सहाय्यक उपनिरीक्षक म्हणून नियुक्त आहेत. तसेच कॉन्स्टेबल पदावर महिलाची संख्या १३ टक्के आहेत. आयपीएस अधिकाऱ्यांपैकी १२ टक्के महिला असल्याचे अहवालात नमूद केले आहे. न्यायव्यवस्थेच्या बाबतीतही काहीसे असेच चित्र असल्याचे अहवालातून समोर आले आहे. अहवालात नमूद केल्याप्रमाणे कनिष्ठ न्यायालयात ३८ टक्के , तर उच्च न्यायालयांमध्ये १४ टक्के न्यायधीश महिला आहेत. सर्व राज्यांमध्ये कनिष्ठ न्यायालयातील महिला न्यायधीशांची संख्या सातत्याने वाढत आहे. मात्र असली तरी उच्च न्यायालयातील महिला न्यायधीशांच्या संख्येत वाढ झालेली नाही, असे अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे. दरम्यान, इंडिया जस्टिस रिपोर्ट २०२५ नुसार, २०२२ ते २०२५ या कालावधीत राजस्थान, केरळ आणि मध्य प्रदेशातील न्यायालयीन निर्देशांकामध्ये सर्वाधिक सुधारणा झाली आहे.

# काँग्रेसने सकारात्मक व्हायला हवे!

**काँग्रेसचे राष्ट्रीय अधिवेशन नुकतेच गुजरात मधील अहमदाबाद येथे पार पडले. गेली ३० वर्षे काँग्रेस, गुजरात मध्ये सत्तेच्या बाहेर आहे. गुजरातच्या स्थापने नंतर काँग्रेस बराच काळ राज्यात सत्तेवर होती.त्याला अपवाद होता तो १९७५ ते १९७६ आणि १९७७ ते १९८० या कालावधीत गुजरात मध्ये सत्तेवर असलेल्या बाबूभाई पटेल यांच्या नेतृत्वाखालील बिगर काँग्रेसी सरकारचा. १९९५ नंतर आजतागायत काँग्रेस, गुजरात मध्ये सत्तेच्या आसपास फिरकलेली नाही. एवढेच नव्हे तर २०१४ आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला गुजरात मधील लोकसभेची एकही जागा जिंकता आली नव्हती. त्यातल्या त्यात समाधानाची बाब म्हणजे २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने गुजरातमध्ये आपले खाते उघडले. लोकसभेची एक जागा जिंकून, काँग्रेसने गेल्या खेपेच्या तुलनेत समाधानकारक कामगिरी केली. या पार्श्वभूमीवर अहमदाबादमध्ये झालेल्या अधिवेशनाचा आढावा घेऊया.**

---

■ **अभय गोखले**

---



लोकसभा निवडणुकीनंतर हरयाणा आणि महाराष्ट्र या राज्यांत काँग्रेसचा जो दारूण पराभव झाला, त्यापासून कोणताही बोध काँग्रेसने घेतला नसल्याचे अधिवेशनातील एकंदर कामकाजावरून ठळकपणे दिसून आले. भाजपावर टीकाटिप्पणी आणि आरोपबाजी करताना आपलं कुठं चुकतंय यावर साधकबाधक चर्चा करण्याचे भान फारच कमी वक्त्यांनी राखले.भाजपावर भ्रष्टाचार आणि हुकूमशाही यांचे आरोप लावताना,२०१४ साली आपले सरकार भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळेच निवडणूकीत हरले याचा विसर वक्त्यांना पडला. १९७७ साली काँग्रेसचा झालेला पराभव हा हुकूमशाहीमुळेच ( आणीबाणी ) झाला होता, याचाही विसर भाजपावर आरोपबाजी करणाऱ्या वक्त्यांना पडला.

खरी गोष्ट अशी आहे की काँग्रेस जो पर्यंत नकारात्मक भूमिकेतून बाहेर पडत नाही, तोपर्यंत काँग्रेसला काही भवितव्य आहे असे वाटत नाही.भाजपा ज्या चुका करत आहे, तिकडे जनतेचे लक्ष आहे.तुम्ही जनतेसाठी काय करणार आहात ते जनतेला विस्तृतपणे सांगा, अशी जनतेची काँग्रेसकडून अपेक्षा आहे.

विरोधी पक्ष म्हणून सत्ताधारी पक्षावर विधायक टीका करण्यात गैर असे काहीच नाही, परंतु आपण काय योजना तयार केली आहे, यावर भर न देता केवळ टिकेकरीता टिका करणे देशातील युवा पिढीला तरी मान्य होणार नाही. काँग्रेसने सकारात्मक भूमिका स्विकारायला हवी.

शशी थरूर यांच्या सारख्या वक्त्यांनी काँग्रेसच्या नेमक्या याच कमकुवतपणावर बोट ठेवले. पण ते अल्पमतात असल्याने त्यांच्या सुचनेनुसार कार्यवाही होण्याची शक्यता फारच कमी आहे. मुळात शशी थरूर यांच्या सारखा अध्यक्ष काँग्रेसला लाभला असता तर काँग्रेसला ते नकारात्मक भूमिकेतून बाहेर काढू शकले असते.परंतु त्यांचा स्पष्टवक्तेपणा काँग्रेस नेतृत्वाला मान्य होणार नाही.

महत्वाचे म्हणजे एक पाय काँग्रेसमध्ये आणि दुसरा पाय इतर पक्षात असणाऱ्या काँग्रेस नेत्यांचा शोध घेऊन पक्षनेतृत्वाने, त्यांची ताबडतोब पक्षातून हकालपट्टी करायला हवी. परंतु असे धाडस काँग्रेसचे नेतृत्व दाखवेल काय, हा खरा प्रश्न आहे.

काँग्रेस हा संस्थानिकांचा पक्ष आहे.हे संस्थानिक आपली संस्थाने बरोबर सांभाळतात. निवडणुकीच्या काळात आपल्या संस्थानावर आपले सर्व लक्ष केंद्रित करतात.पक्षाच्या इतर उमेदवारांना मदत करण्यासाठी ते फारसे उत्सुक नसतात. पक्षनेतृत्वाने त्यांची ही मक्तेदारी प्रथम मोडीत काढायला हवी.

भाजपावर टीका करणे सोपे आहे परंतु त्यांच्या सारखी शिस्तबद्ध निवडणूक यंत्रणा जोपर्यंत तुम्ही उभी करत नाही, तोपर्यंत त्यांना टक्कर देणे हे अतिशय अवघड काम आहे, ही वस्तुस्थिती काँग्रेसने लक्षात घ्यायला हवी.

२०१४ आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकीपेक्षा २०२४ मध्ये काँग्रेसची कामगिरी समाधानकारक झाली यात दुमत असण्याचे कारण नाही. परंतु त्यामुळे हुरळून जाण्याचेही कारण नव्हते. त्यानंतर झालेल्या हरयाणा विधानसभा निवडणुकीत काँग्रेस मजबूत स्थितीत असतानाही पक्षाला दारुण पराभव पत्करावा लागला.

महाराष्ट्रात तर काँग्रेसने लोकसभा निवडणुकीत त्यांच्या वाट्याला आलेल्या १७ जागांपैकी १३ जागा जिंकून दैदिप्यमान यश मिळविले होते. परंतु नंतर झालेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचा दारुण पराभव झाला आणि पक्षात नैराश्य पसरले. त्या पराभूत मानसिकतेतून पक्ष अद्याप बाहेर आलेला नाही.

काँग्रेसला गतवैभव प्राप्त करायचे असेल तर नुसते इतिहासाचे दाखले देऊन ते साध्य होणार नाही.त्याकरीता पक्ष संघटनेत मूलभूत बदल करावे लागतील. पक्षामधील निरनिराळ्या पदांवर नियुक्त्या करताना युवकांना प्राधान्य द्यावे लागेल.

आज देशभरातील काँग्रेसची स्थिती पाहता, आशादायक असे वातावरण दिसत नाही. उत्तरप्रदेश सारख्या मोठ्या राज्यात काँग्रेस गेली ३५ वर्षे सत्तेच्या बाहेर आहे. गेल्या काही निवडणुकांतील काँग्रेसची दयनीय कामगिरी पाहता उत्तरप्रदेशमध्ये नजीकच्या भविष्यकाळात काँग्रेस सत्तेवर येण्याची सुतराम शक्यता नाही. तामिळनाडूमध्ये गेली ५८ वर्षे काँग्रेस सत्तेच्या बाहेर आहे. तेथील द्रमुक आणि अण्णा द्रमुक यांच्या भोवती केंद्रीत झालेले सत्ताकारण पाहता, काँग्रेसला तेथे बिलकुल आशा नाही.

पश्चिम बंगाल मध्ये काँग्रेस गेली ४८ वर्षे सत्तेच्या बाहेर आहे.तेथे आता तृणमूल काँग्रेस आणि भाजपा यांच्यातच प्रमुख लढत असल्याने काँग्रेसला तेथेही आशा नाहीच.

बिहारमध्ये काँग्रेस गेली साडेतीन दशके सत्तेच्या बाहेर आहे. इतके दिवस लालूप्रसाद यादव यांच्या कुबड्या घेऊन काँग्रेसने मार्गक्रमण केल्याने पक्षाला आपली संघटना तळागाळापर्यंत पोहोचवता आली नाही.

आंध्रप्रदेशचे विभाजन झाल्यानंतर तेथे काँग्रेस इतकी कमकुवत झाली की तेथे पक्षाचे अस्तित्व नावापुरते उरले आहे.ज्या ओडिशामध्ये काँग्रेस बरीच वर्षे सत्तेवर होती तेथे गेली २५ वर्षे काँग्रेस सत्तेच्या आसपासही फिरकलेली नाही.

काँग्रसची देशभरात अशी दयनीय अवस्था असताना, काँग्रेसच्या अहमदाबादमधील अधिवेशनात त्यावर विस्तृत चिंतन व्हायला हवे होते, परंतु तसे न करता वरवर मलमपट्टी करण्यात काँग्रेस नेतृत्वाने धन्यता मानली. अशा परिस्थितीत भाजपा भरपूर चुका करेल आणि मग भाजपाला वैतागलेली देशातील जनता आपल्याला संधी देईल, तोपर्यंत वाट पाहुया, असे काँग्रेसचे सध्याचे धोरण दिसत आहे.

■ ■ ■

# भाजपा - अण्णा द्रमुक युतीचे स्टॅलिनना आव्हान!

**इंडिया कॉलिंग**
**डॉ. सुकृत खांडेकर**
sukritforyou@gmail.com

तामिळनाडूत एम. के. स्टॅलिन यांच्या नेतृत्वाखाली द्रमुक पक्ष भक्कम पाय रोवून असताना भाजपाने अण्णा द्रमुक पक्षाशी युती केल्याचे जाहीर केले व आगामी विधानसभा निवडणूक अण्णा द्रमुकचे नेते एडप्पादी पलानीस्वामी यांच्या नेतृत्वाखाली युती लढवणार असल्याची भाजपाने घोषणा केली. ही घोषणा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी चेन्नईत जाऊन केली आणि स्टॅलिन सरकारचे आता दिवस भरले असा सज्जड इशारा दिला.

संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन नुकतेच संपले. या अधिवेशनाच्या अखेरीस मोदी सरकारने मांडलेल्या वक्फ सुधारणा विधेयकावर लोकसभा व राज्यसभेत वादळी चर्चा झाली. या विधेयकाला विरोध करण्यासाठी भाजपा विरोधक एकवटले होते. वक्फ सुधारणा विधेयक मुस्लिमांच्या विरोधात आहे, अशी खरमरीत टीका काँग्रेस, सपा, तृणमूल काँग्रेस, द्रमुक आदी विरोधी पक्षांनी केली. अण्णा द्रमुकने याच सुरात सूर मिसळला होता. एवढेच नव्हे तर वक्फ सुधारणा सरकारच्या विरोधात अण्णा द्रमुक पक्षाच्या खासदारांनी राज्यसभेत मतदानही केले. मग असे अचानक काय घडले की भाजपा व अण्णा द्रमुक हे दोन्ही पक्ष एकदम जवळ आले?

अमित शहा मुत्सद्दी राजकारणी आहेत, तसेच राजकीय कुटनीतीमध्ये ते चाणक्य म्हणून ओळखले जातात. जो राजकीय पक्ष संसदेत भाजपाला साथ देत नाही, ज्या राजकीय पक्षाने गेल्या निवडणुकीत भाजपाशी युती तोडली त्या अण्णा द्रमुकशी भाजपाने पुन्हा युती केली, त्या पक्षाला एनडीएमध्ये दाखल करून घेतले, या सर्व घटना एवढ्या झटपट घडल्या की त्याचे देशातील सर्वच राजकीय पक्षांना आश्चर्य वाटले. तामिळनाडू विधानसभा निवडणुकीसाठी अण्णा द्रमुक पक्षाबरोबर घाईघाईने युती का करण्यात आली हे गूढ अनेकांना उलगडलेले नाही.

यापूर्वी भाजपाने आपली ताकद वाढविण्यासाठी सर्व शक्ती पश्चिम बंगालमध्ये पणाला लावली होती, तसेच आता भाजपाने अण्णा द्रमुकची पुन्हा युती करून एम. के. स्टॅलिन यांच्या नेतृत्वाखालील द्रमुक सरकार चेन्नईच्या तख्तावरून खाली खेचण्याचा चंग बांधला आहे. तामिळनाडूत पक्ष विस्तारासाठी भाजपा गेली दहा-बारा वर्षे अटोकाट प्रयत्न करीत आहे. पण द्रमुक विरुद्ध अण्णा द्रमुक अशा लढाईत भाजपाचे काही फावत नाही हे श्रेष्ठींना कळून चुकले आहे. स्टॅलिन हे करारी नेतृत्व आहे. ते मोदी सरकारपुढे झुकत नाहीत, भाजपापुढे नमत नाहीत आणि परंपरागत राजकीय शत्रू असलेल्या अण्णा द्रमुकला वाढू देत नाहीत.

द्रमुकला सत्तेवरून हटवायचे असेल तर आपण दोघांनी एकत्र येणे गरजेचे आहे, याची जाणीव भाजपा व अण्णा द्रमुक या दोन्ही पक्षांना झाली आहे. म्हणूनच राजकीय अरिहार्यतेतून आगामी विधानसभा निवडणूक भाजपा-अण्णा द्रमुक यांची युती लढणार असल्याची घोषणा स्वतः अमित शहा यांनी चेन्नईत येऊन केली.

अण्णा द्रमुकशी युती करण्यात भाजपाचे मावळते प्रदेशाध्यक्ष अन्ना मलाई यांचा मोठा अडथळा होता. त्यांचा अण्णा द्रमुकशी युती करायला कठोर विरोध होता. स्वतः अन्ना मलाई हे लढाऊ नेतृत्व आहे. त्यांनी द्रमुक सरकारच्या विरोधात लढताना पक्षात जान आणली व पक्षाचा पाया भक्कम केला हे मान्य करावेच लागले.

जिथे भाजपाला कोणी विचारत नाही, भाजपाची केडर नाही, अशा राज्यात भाजपाच्या मतांची टक्केवारी ३ वरून ११ टक्क्यांपर्यंत वाढविण्यात अन्ना मलाई यांचे मोठे योगदान आहे. म्हणूनच अन्ना मलाई यांच्या कामगिरीकडे दुर्लक्ष करणे व त्यांना पदावरून दूर करणे हे भाजपाच्या केंद्रीय नेतृत्वाला कठीण होऊन बसले होते. अन्ना मलाई हे निवृत्त आयएएस अधिकारी आहेत. ते तरुण आहेत.

सन २०१९ मध्ये त्यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतली व भाजपात प्रवेश केला. आपल्या दमदार कामाने त्यांनी मोदी-शहांचेही मन जिंकले. त्यांच्या कामाची तडफ पाहूनच त्यांच्यावर तामिळनाडूच्या प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी दिली. प्रदेशाध्यक्ष झाल्यावर त्यांनी सत्तेवरील द्रमुक सरकारच्या विरोधात जोरदार मोहीम सुरू केली. स्टॅलिन सरकारला सतत ते हैराण करू लागले. सन २०२६ मध्ये तामिळनाडूमध्ये होणारी विधानसभा निवडणूक अन्ना मलाई यांच्याच नेतृत्वाखाली भाजपा लढवणार असे सर्वांना वाटले होते. आगामी विधानसभा निवडणुकीत अन्ना मलाई हेच भाजपाचा मुख्यमंत्रीपदाचा चेहरा असतील अशीही चर्चा होत असे. राजकारणात दिसते तसे नसते याची प्रचिती सर्वांनाच आली. भाजपा श्रेष्ठींनी भाकरी फिरवली. अचानक अन्ना मलाई यांची प्रदेशाध्यक्षपदावरून पक्षाने उचलबांगडी केली. त्यांना प्रदेशाध्यक्षपदावरून हटविल्याशिवाय द्रमुकशी युती होणार नाही, याची श्रेष्ठींना खात्री होती. म्हणून त्यांच्या जागी नयनार नागेंद्र यांची पक्षाने नेमणूक केली व लगेचच भाजपा-द्रमुक युती झाल्याची घोषणा केली. ६४ वर्षांच्या नयनार नागेंद्रन यांनी भाजपाचे तामिळनाडू प्रदेशाध्यक्ष म्हणून १२ एप्रिल रोजी सूत्रे हाती घेतली. नागेंद्रन हे मृदुभाषी व्यक्तिमत्त्व आहे. दक्षिणी तिरूनेलवेली मतदारसंघातून ते आमदार आहेत. अन्ना मलाईसारखे ते आक्रमक नाहीत, मग पक्षाचा अजेंडा कसा राबवणार? अण्णा द्रमुकचे नेते जे म्हणतील ते मान्य करून युती भाजपाला युती चालवायची आहे. स्टॅलिन सरकारचा पराभव हा एकमेव अजेंडा भाजपा-अण्णा द्रमुक युतीपुढे आहे.

लोकसभा निवडणुकीच्या दृष्टीने तामिळनाडू हे पाचवे मोठे राज्य आहे. भाजपाने कर्नाटकमध्ये जम बसवला, पण केरळ व तामिळनाडूत भाजपाला फारसा शिरकाव करता आला नाही, आता २०२६ च्या विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने भाजपाने अण्णा द्रमुकला पुन्हा बरोबर घेऊन पक्ष विस्ताराचा अजेंडा तयार केला आहे.

२०२४ ची लोकसभा निवडणूक भाजपाने स्वबळावर तामिळनाडूत लढवली होती. या निवडणुकीत भाजपाला ११ टक्के मते मिळाली. लोकसभा निवडणुकीत भाजपाचा एकही उमेदवार खासदार म्हणून निवडून आला नाही. तत्कालीन प्रदेशाध्यक्ष अन्ना मलाई हे सुद्धा पराभूत झाले. तामिळनाडूत पक्षाला मोठा आधार नाही व स्वबळावर निवडणूक लढणे हे फायद्याचे नाही हे भाजपा श्रेष्ठींच्या लक्षात आले.

पुन्हा जुन्या मित्रपक्षाला बरोबर घेऊन आगामी विधानसभा निवडणूक लढवावी असा विचार पक्षात प्रबळ होऊ लागला, त्यातूनच भाजपाची साथ सोडून गेलेल्या अण्णा द्रमुक पक्षाला भाजपाने पुन्हा पायघड्या अंथरल्या. संसदेचे अधिवेशन संपल्यावर अण्णा द्रमुकच्या नेत्यांनी दिल्लीत जाऊन अमित शहांबरोबर चर्चा केली आणि अमितभाईंनी चेन्नईला जाऊन भाजपा-अण्णा द्रमुक युतीची घोषणा केली.

अण्णा द्रमुक व भाजपापेक्षा द्रमुकचा जनाधार मोठा आहे. पलानीस्वामीपेक्षा स्टॅलिन यांचा जनाधार मोठा आहे. पण त्यांना अँटी इनकबन्सीचा फटका बसण्याचीही शक्यता आहे. तामिळनाडूत भाजपाने अण्णा द्रमुकला महत्त्व देऊ केले आहे. दीड वर्षांच्या फारकतीनंतर भाजपा व अण्णा द्रमुक पुन्हा युती झाली आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत तामिळनाडूतील सर्व ३९ जागांवर द्रमुकचे खासदार विजयी झाले. द्रमुकला ४६.९ टक्के मते मिळाली. भाजपाने तामिळनाडूत लोकसभेच्या ३९ पैकी २३ जागा लढवल्या. पण सर्वत्र भाजपाचा पराभव झाला. २०१९ लोकसभा निवडणुकीत भाजपाला ३.६ टक्के मते मिळाली होती, सन २०२४ मध्ये ५.५ टक्के, २००९ मध्ये २.३ टक्के, २००४ मध्ये ५.१ टक्के मते मिळाली होती.

■ ■ ■

# आंतरराष्ट्रीय आवाज दिन

**उत्तरार्ध**

**कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे**
**गडचिरोली.**
**९४२३७१४८८३.**

मेंथॉलमुळे वेदना तात्पुरत्या थांबतात आणि आराम मिळाल्यासारखे वाटते. त्यामुळे खरेतर आवाज बसलेला असताना देखील तुम्ही बोलू लागता, अशाने आवाजाला अधिक जास्त त्रास होतो. दुसरे म्हणजे चोखून खाण्याच्या गोळ्यांमधील साखर घसा कोरडा करते, त्यामुळे बोलायला अजून सोपे जाते. ४) आवाजाला काही त्रास होत असेल, तर तो दूर होईपर्यंत थांबा. सत्यः आवाजाला काही त्रास होत असेल किंवा आवाज बदलला असेल तर आवाजाला थोडा आराम मिळण्यासाठी एक आठवडाभर वाट पाहणे ठीक आहे. त्यानंतर देखील आवाजात काही सुधारणा होत नसेल तर लॅरीन्गओलॉजिस्ट किंवा ईएनटी सर्जनला दाखवावे. ते तुमच्या स्थितीचे नेमके निदान करतील आणि त्यानुसार उपचार करतील. ४) जर आवाज बसला असेल तर चहामध्ये मध व लिंबू मिसळून किंवा व्हिस्की, गरम पाणी, साखर, लिंबू मिसळून प्यावे. सत्यः स्वर पटांना ओलसर ठेवायचे असेल तर पाणी हा एकमेव उपाय आहे. वर उल्लेख केलेली पेये ?सिडिक आहेत, त्यामुळे आम्लपित्ताचा त्रास होऊ शकतो, जो आवाजासाठी अजून जास्त हानिकारक आहे. त्यामुळे आवाजाचे कायमस्वरूपी नुकसान होऊ शकते. जर आवाज बसला असेल तर पाण्याखेरीज इतर कोणतेही पेय पिणे टाळणे उत्तम. ५) बिटाडाईनने गुळण्या केल्यास आवाज बरा व्हायला मदत होते. सत्यः गुळण्या घशाच्या पोकळीत केल्या जातात. ते स्वरयंत्रात असलेल्या कंठातील पोकळीपर्यंत किंवा स्वर पटापर्यंत पोहोचत नाही, त्यामुळे त्याचा काहीही उपयोग होत नाही. ६) वेपिंग हे तुमच्या आवाजासाठी धुम्रपानाइतके वाईट नाही. सत्यः वेपिंग किंवा ई-सिगारेट या तुमच्या फुफ्फुसांसाठी तितक्याच हानिकारक असतात. जर त्याचा विपरीत परिणाम तुमच्या श्वासावर होत असेल तर आवाज आणि गाण्यावर देखील त्याचा परिणाम होणार हे नक्की. धुम्रपानामुळे व्होकल फोल्ड एडेमा किंवा रेन्के एडेमा होतो, तसेच कर्करोग होण्याची शक्यता असते. ७) कफ असेल तर घसा साफ करणे चांगले असते. सत्यः घसा साफ केल्याने स्वर पटांवर खूप ताण पडतो आणि आवाजाचे नुकसान होते. जर तुम्हाला घसा साफ करावासा वाटत असेल, तर एक घोट पाणी प्या किंवा कफ गिळण्याचा प्रयत्न करा. ८) गाताना डोक्यातून आवाज येतो. सत्यः आवाज आपल्या स्वर पटांमध्ये निर्माण केला जातो, आणि अशी काही चेंबर्स असतात जिथे आवाज प्रतिध्वनीत होतो. त्यामुळे गायकाला असे वाटते की आवाज डोक्यामध्ये घुमत आहे, याला हेड रजिस्टर म्हणतात. ९) आवाजाची काही समस्या असेल तर शस्त्रक्रिया हा त्यावरील एकमेव उपाय आहे. सत्यः आवाजाला काही त्रास होत असेल तर फुल टाईम स्पेशालिटी सिस्टिम असलेल्या रुग्णालयातील लॅरीन्गओलॉजिस्ट किंवा ईएनटी सर्जनला दाखवा, ते तुमच्या समस्येचे नेमके निदान करतील आणि त्यानुसार थेरपी किंवा शस्त्रक्रिया करून उपचार करतील. कंठातील पोकळीमध्ये संसर्ग होण्यासारख्या काही समस्यांवर औषधे दिली जातात आणि सुधारणा होते का ते पाहिले जाते. ■ ■ ■

# खरा आनंद



राजिंदरसिंहजी महाराज

सृष्टीच्या सुरुवातीपासूनच मानवाचा हा प्रयत्न आहे की, त्याने आपल्या जीवनात आनंदाने जगावे म्हणून तो अशीच कृती करण्याचा प्रयत्न करतो कि, ज्यामुळे त्याला असे वाटते कि त्याला आनंद मिळेल.

आपल्या पैकी बरेचसे लोक असा विचार करतात की, जेव्हा आपले शरीर सुदृढ असेल, आपल्याजवळ भरपूर पैसा असेल, आपले नातेसंबंध चांगले असतील, एक मोठे घर असेल आणि एक यशस्वी कारकीर्द असेल, तेव्हा आपल्याला खुशी प्राप्त होईल. याकरिता त्याचा असा प्रयत्न असतो की, संसारात काही तरी व्हावे, आपले शारीरिक स्वास्थ्य चांगले राहावे, आपण नावलौकिक कमवावा, धन-दौलत कमवावी, आपले कुटुंबीय व नातेसंबंध चांगल्या प्रकारे निभवावे, या सर्व भौतिक सुखांना प्राप्त करण्यात आपला अमूल्य वेळ या कार्यात खर्च करतो.

हे बाह्य सुख प्राप्त करण्याकरिता आपण त्याच्या मागे बालपणापासूनच धावपळ करीत असतो. जेव्हा मूल जन्माला येते तेव्हा आपण त्याला जगाच्या बाह्य आकर्षणा मध्ये उदाहरणार्थ - खुळखुळा, मोबाईल, संगीतमय खेळणी आणि चहूबाजूला चमचमणारी एक छोटीशी दुनिया बनवितो, जेणेकरून या सगळ्या गोष्टींना पाहून तो खुश रहावा. जस जसा तो मोठा होतो, तेव्हा आपण त्याला आपली संस्कृती आणि जीवनशैली शिकवितो, कारण की आपल्याला असे वाटते, हे सर्व त्याच्या शारीरिक, बौद्धिक आणि मानसिक विकासा करिता आवश्यक आहे. ज्यामुळे तो प्रसन्नतेचे जीवन जगू शकेल. कालांतराने या सर्वांमध्ये अडकून आपल्या मोठ्या वडीलधाऱ्या माणसांसारखेच तो सुद्धा या दुनियेत मग्न होत जातो आणि आपल्या वास्तव आत्मिक स्वरूपाला विसरून जातो.

आपल्यापैकी बरेचसे लोक स्वतःला शरीर आणि मन समजतात. आपला सर्व वेळ आपले शरीर आणि बौद्धिक गरजा पूर्ण करण्याकरता खर्च करतात. कारण की आपल्याला हेच शिकविले जाते की खुशी केवळ या दोन्ही क्षेत्रात सफल झाल्यानेच प्राप्त होते. ज्यामुळे आपले जीवन एखाद्या वेगवान यंत्राप्रमाणे होत जाते. ज्यामध्ये आपण आपला सर्व वेळ शारीरिक गरजा उदाहरणार्थ अन्न, वस्त्र, निवारा यांच्या पूर्ती करिता आणि त्याला आराम देण्याकरिता विविध प्रकारच्या खुशी इत्यादींमध्ये व्यतीत करतो. याच बरोबर आपण आपल्या बौद्धिक विकासाकरिता आपला बराचसा वेळ एक चांगलं शिक्षण प्राप्त करण्यात घालवितो. ज्याद्वारे, आपण एक सोनेरी उज्वल भविष्य बनवून या जगात नावलौकिक आणि धन-दौलत कमवू शकू.

जर आपण आपल्या जीवनावर एक नजर टाकली तर आपण सर्व आयुष्य आपल्या मनाच्या इच्छा पूर्ण करण्यात व्यतीत करतो. जेणेकरून आपल्या मनाला आनंद होईल. मन खुश राहील. या व्यतिरिक्त आपले नातेवाईकां बरोबरचे भावनिक संबंध दृढ करण्यासाठी, आपला अमूल्य वेळ त्यांच्याशी नातेसंबंध जोडण्यात खर्च करतो. कारण, आपण असा विचार करतो की, जेव्हा आपल्याला कधी शारीरिक अथवा मानसिक यातना होईल, तेव्हा हे नातेवाईक आपल्याला सहाय्यक होतील.

याकडे आपण जर लक्षपूर्वक पाहिले तर आपल्याला लक्षात येईल की, या जगात शारीरिक, मानसिक, बौद्धिक खुशी प्राप्त करीत असताना आपल्याला अशी भीती वाटत असते की आपण ही यांच्यातच कायमचे गुरफटून जाऊ. यांच्यातले कोणतेही सुख कायमस्वरूपी नाही कारण की या जगातील प्रत्येक वस्तू नाशवान आहे.

महापुरुष आपल्याला समजावितात की आपणास खरे सुख प्राप्त करायचे असेल तर, ते बाह्य जगात नसून ते आपल्या अंतरीच आहे. त्याकरिता आपल्याला आपले लक्ष बाह्य दुनियेच्या आकर्षणा पासून हटवून आपल्या आत्म्याकडे लावलं पाहिजे. आपल्याला हे शाश्वत सुख प्राप्त करण्यासाठी कोण्या एखाद्या पूर्ण महापुरुषाच्या चरणकमली जावे लागेल. ध्यान ही एक अशी प्रक्रिया आहे ज्यामध्ये आपण आपले ध्यान बाह्य जगतापासून हटवून आपल्या आत्म स्थानी, दोन डोळ्यांच्या मधोमध भ्रूमध्य शिवनेत्रावर टिकविले पाहिजे.

प्रभू परमात्मा सुख, शांती व प्रेमाचा स्रोत आहे. त्याच्याशी जोडले गेल्याने आपण सुद्धा त्या प्रेम व खुशीचा अनुभव करू शकतो. ज्यामुळे आपला या जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोण बदलला जातो.

■ ■ ■

# सज्जनांची निष्क्रियता कुणाच्या पथ्यावर?

**(कालच्या अंकावरून पुढे)**

---

**उत्तरार्ध**

**मिलिंद गड्डमवार**
**सामाजिक कार्यकर्ते व मुक्त पत्रकार**
**राजुरा, जि. चंद्रपूर.**
**9511215200**

त्यांच्या डोळ्यादेखत पैसे घेऊन कामे केली जातात. तरीही ते अनदेखा करतात.आजच्या तरूणाईला हे दृश्य दिसत नाही कां? खुलेआम चालणारी लूट दिसत असूनही ते यांस विरोध करण्यास तयार नाहीत. पैसे देऊन आप आपली कामे करवून घेतली जात आहेत. मग तो आमदाराचा माणूस असो वा खासदारांचा ! कुणीही सामान्य माणसाला न्याय मिळवून देण्यास तयार नाहीत.

याचे कारणं सरकारी कामांमध्ये हस्तक्षेप करण्याचा फौजदारी कायदा आपल्या संघटनेच्या बळावर कर्मचारी व अधिकारी लोकांनी आपल्या बाजूने पास करवून घेतलेला आहे. आज सामान्य माणसांकडून कुठलेही फौजदारी कायदे हे अस्तित्वात आलेले नाहीत. या कायद्यांमुळे भ्रष्टाचाराला बळकटी प्राप्त झाली आहे. याकडे जनतेचे लक्ष केंद्रित करणे गरजेचे वाटते आहे.

सज्जन शक्ती ही काही आकाशातून पृथ्वीवर पडत नसते.तर ती लोकांमधूनच निर्माण करावी लागत असते. यासाठी वेळप्रसंगी अपमान पणं सहन करावा लागतो. २५-३० वर्षांपुर्वी भ्रष्टाचाराचा एवढा सुकाळ पहायला मिळत नव्हता. अधिकारी लोकांना हाताखालील लोक मानसन्मान देत होते. त्यांचा आपल्या कर्मचाऱ्यांवरील वचक पहायला मिळत होता.ते आपले अधिकार खुलेपणाने वापरत होते.ते कुणाही लोकप्रतिनिधींना, पदाधिकाऱ्यांना घाबरून सरकारी कामे नियमबाह्य पद्धतीने करीत नव्हते. त्यांचा रूबाब पहायला मिळत होता.

आजचे चित्र एकदम बदलून गेल्याचे पहायला मिळते आहे. अधिकारी व कर्मचारी वर्ग हा आमदार-खासदार यांचे हस्तक बनून वागत असल्याचे निदर्शनास येत आहे. यामुळे आमदार-खासदारांना वैयक्तिक कामांसाठी जनतेला हाती धरावे लागते आहे. जनतेचा कुठलाही वचक हा नोकरदारांवर आज राहिलेला नसल्याने जनता दुबळी झाली आहे. याचाच फायदा नोकरशहा वर्ग आज घेतांना आढळून येतो आहे.

स्वातंत्र्यानंतरची जनता ही आज मालक राहिलेली नसून सत्ताधारी व नोकरशाहीची गुलाम बनलेली आहे. यासाठी जनतेला नव्याने व नेटाने या व्यवस्थेविरोधात लढा उभारावा लागणार आहे. यासाठी तरूणाईने पुढे येणे गरजेचे वाटते आहे. पाहू या कोण पुढे येतो ते.

■ ■ ■

# टोमॅटो खाण्याचे जसे फायदे तसे तोटे





अनेकजण वजन कमी करण्यासाठी रात्रीच्या जेवणामध्ये टोमॅटोचं सूप पितात. टोमॅटो तुमच्या आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर ठरते.

टोमॅटो आरोग्यासाठी देखील खूप फायदेशीर मानले जाते. टोमॅटोमध्ये लायकोपिन नावाचा घटक असतो, जो अनेक समस्यांपासून आराम देऊ शकतो. कोलेस्टेरॉलच्या रुग्णांसाठी टोमॅटो फायदेशीर मानले जाते. टोमॅटोचे असंख्य फायदे आहेत, परंतु टोमॅटोचे सेवन सावधगिरीने करावे. जर असे लोक टोमॅटो खाल्ले तर ते अडचणीत येऊ शकतात.

अहवालानुसार, ज्यांचे पोट संवेदनशील आहे आणि ज्यांचे पोट अ‍ॅसिड रिफ्लक्सचा त्रास आहे त्यांनी टोमॅटो खाऊ नये. टोमॅटो नैसर्गिकरित्या आम्लयुक्त असतात आणि त्यामुळे पोटात जळजळ आणि अस्वस्थता निर्माण होऊ शकते. टोमॅटो आम्लयुक्त असतो आणि त्यामुळे छातीत जळजळ होण्याची समस्या उद्भवू शकते. टोमॅटो खाल्ल्यानंतर जर तुम्हाला अपचन आणि पोटात त्रास होत असेल तर टोमॅटो टाळावेत. अशा लोकांनी कच्चे टोमॅटो खाणे टाळावे.

किडनी स्टोनच्या रुग्णांनी टोमॅटो टाळावेत. तथापि, टोमॅटो फक्त ऑक्सलेट स्टोन असलेल्या लोकांसाठी हानिकारक असू शकतात. टोमॅटोमध्ये ऑक्सलेट नावाचा घटक असतो, जो शरीरात कॅल्शियमसोबत एकत्र येऊन खडे तयार करू शकतो. जर एखाद्या व्यक्तीला ऑक्सलेट किडनी स्टोनचा इतिहास असेल तर डॉक्टरांचा सल्ला घेतल्यानंतरच टोमॅटो खावेत.

अनेक लोकांना अन्नाची अ‍ॅलर्जी असते आणि काही पदार्थ खाल्ल्याने त्या होऊ शकतात. काही लोकांना टोमॅटोची अ‍ॅलर्जी असू शकते. ही अ‍ॅलर्जी सौम्य ते गंभीर असू शकते. जर एखाद्याला टोमॅटोची अ‍ॅलर्जी असेल तर टोमॅटो आणि त्याचे पदार्थ जसे की सॉस, केचप किंवा पॅक केलेले पदार्थ टाळावेत.

टोमॅटोमध्ये असलेले संयुगे काही औषधांच्या प्रभावीतेवर परिणाम करू शकतात. विशेषतः रक्त पातळ करणारी औषधे घेणाऱ्या लोकांनी टोमॅटो टाळावेत. संधिवात आणि सांधेदुखीने ग्रस्त असलेल्या लोकांच्या समस्या वाढू शकतात. अशा लोकांनी टोमॅटोपासूनही दूर राहावे. ■ ■ ■

## अशोकायन

**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



### हॅपी ॲनिव्हर्सरी?

**लग्न म्हणजे**
**जन्मजन्मांतराच्या गाठी**
**ही शिकवण देते**
**भारतिय संस्कृती . . !**

**लग्न म्हणजे**
**एक गेम असतं**
**तुमचं आमचं**
**भौ सेम असतं . . !**

**उर्वरीत आयुष्य**
**जगायचं असेल सुखात**
**तर एकमेकांची कदर**
**व तडजोड करावी मनात . !**

# इथे कुंपणच शेत खात आहे : शेतकऱ्यांच्या अनुदानात ५० कोटींचा भ्रष्टाचार, जयंत पाटलांचा सरकारवर हल्लाबोल

**मुंबई, दि. १६ प्रतिनिधी**

अतिवृष्टी, पूर आणि गारपिटीमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसाठी शासनाने जाहीर केलेल्या सानुग्रह अनुदानात मोठा भ्रष्टाचार झाल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. या अनुदानातून तब्बल ५० कोटी रुपये अधिकाऱ्यांनी लंपास केल्याची माहिती थेट उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक यांनी दिली आहे. या प्रकरणावरून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका करत, "इथे कुंपणच शेत खात आहे!" अशी खरमरीत टीका केली आहे.

जयंत पाटील यांनी आपल्या अधिकृत एक्स हँडलवरून सरकारला लक्ष्य करत एक पोस्ट शेअर केली. त्यात ते म्हणाले, "अतिवृष्टी, पूर आणि गारपिटीमुळे मोठे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांसाठी शासनाने सानुग्रह अनुदानाची घोषणा केली होती. पण या मंजूर अनुदानातून जवळपास ५० कोटी रुपये अधिकाऱ्यांनी लंपास केल्याची माहिती उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक यांनीच दिली आहे. तलाठी, ग्रामसेवक आणि कृषी सहाय्यकांनी शेतकऱ्यांच्या या पैशावर डल्ला मारला आहे. या प्रकरणाची सत्यता शासनाने पडताळावी आणि दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी."

**शेतकऱ्यांची लूट, सरकार काय करणार?**

जयंत पाटील यांनी पुढे सवाल उपस्थित करताना म्हटले, "चारही बाजूंनी शेतकऱ्यांना लुटण्याचे काम सुरू आहे. सरकार आत्मचिंतन करणार का? कारण इथे कुंपणच शेत खात आहे." त्यांच्या या वक्तव्याने राज्यातील शेतकऱ्यांच्या प्रश्नावर नव्या चर्चेला तोंड फोडले आहे. शेतकऱ्यांसाठी जाहीर झालेल्या मदतीतच भ्रष्टाचार होत असेल, तर सरकारचा दावा कितपत खरा आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना एका शेतकऱ्याने (संतोष पाटील) एक्सवर लिहिले, "आमच्या तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांची नावेच यादीत नाहीत. अनुदानाचे पैसे कोणी लंपास केले, याची भीती वाटते. धनाढ्य शेतकरी आणि राजकीय दबदबा असलेल्यांनी अधिकाऱ्यांशी हातमिळवणी करून फळबागांचे बनावट दावे केले आहेत, प्रत्यक्षात शेतात काहीच नाही." यावरून भ्रष्टाचाराचा प्रकार किती खोलवर गेला आहे, याची प्रचिती येते.



**उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक यांचे खुलासे**

उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक यांनी या भ्रष्टाचाराची कबुली देताना तलाठी, ग्रामसेवक आणि कृषी सहाय्यक यांच्यावर ठपका ठेवला आहे. महाडिक हे सध्या झारखंड सरकारमध्ये उपजिल्हाधिकारी म्हणून कार्यरत असून, यापूर्वी त्यांनी महाराष्ट्रातही काम केले आहे. त्यांच्या या खुलाशाने प्रशासनातील भ्रष्टाचाराचा मुद्दा पुन्हा एकदा एरणीवर आला आहे.

जयंत पाटील यांच्या पोस्टनंतर अनेकांनी या प्रकरणावर संताप व्यक्त केला आहे. एका यूजरने (फ्रीडम २.०) एक्सवर लिहिले, "शेतकऱ्यांसाठी आलेल्या मदतीवरच अधिकारी डल्ला मारत आहेत, ही अत्यंत गंभीर बाब आहे. सरकार खरंच आत्मपरीक्षण करणार का, की नेहमीप्रमाणे डोळेझाक करणार?" शेतकऱ्यांच्या प्रश्नावरून सरकारला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न विरोधकांनी सुरू केला आहे.

महाराष्ट्रात अतिवृष्टी, पूर आणि गारपिटीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. यापूर्वी २०१८ मध्ये मराठवाडा आणि विदर्भात अशाच प्रकारच्या आपत्तीमुळे २.७२ लाख हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले होते, असे हिंदुस्तान टाइम्सच्या अहवालात नमूद आहे. तेव्हाही सरकारने मदत जाहीर केली होती, पण प्रत्यक्षात शेतकऱ्यांपर्यंत ती पोहोचलीच नाही, असा आरोप होता. आज पुन्हा तीच परिस्थिती निर्माण झाल्याने शेतकऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी आहे.

जयंत पाटील यांनी या प्रकरणाची चौकशी आणि दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली आहे. आता सरकार या आरोपांची दखल घेऊन कारवाई करते का, की हा मुद्दा दाबला जाईल, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी जाहीर झालेल्या अनुदानातच भ्रष्टाचार होत असेल, तर सरकारच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. जयंत पाटील यांच्या या हल्लाबोलानंतर राजकीय वातावरण तापण्याची शक्यता आहे.

# नगराध्यक्षांना हटविण्याचे अधिकार नगरसेवकांना निर्णयाची अधिसूचना काढणार

**मुंबई, दि. १६ प्रतिनिधी**

राज्यातील नगर परिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरींच्या नगराध्यक्षांना पदावरून हटविण्याचे अधिकार नगरसेवकांना देण्याचा निर्णय मंगळवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. राज्यात सध्या कार्यरत असलेल्या १०५ नगर परिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरींसाठी हा निर्णय लागू असणार आहे. अध्यादेश काढून या निर्णयाची तातडीने अंमलबजावणी केली जाणार आहे.

राज्य मंत्रिमंडळाच्या आजच्या बैठकीत महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मध्ये सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली. या सुधारणेनुसार नगराध्यक्षांना पदावरून दूर अधिकार निवडून आलेल्या नगरसेवकांना असणार आहेत. निवडून आलेल्या नगरसेवकांच्या संख्येपैकी दोन तृतीयांश संख्येने नगरसेवकांच्या सह्यांचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांना पाठवता येईल. या प्रस्तावावर जिल्हाधिकाऱ्यांना १० दिवसांच्या आता विशेष सभा आयोजित करून मतदानाद्वारे निर्णय घ्यावा लागेल. अधिनियमातील सुधारणाविषयक विधेयक राज्य विधिमंडळाच्या आगामी पावसाळी अधिवेशनात मांडण्यात येणार आहे.

यापूर्वी नगराध्यक्षांना पदावरुन बाजूला सारण्याचा प्रक्रियेत निवडून आलेल्या नगरसेवकांपैकी ५० टक्के नगरसेवकांच्या सह्यांचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवला जात असे. त्यानंतर राज्य सरकारच्या स्तरावर कार्यवाही करून नगराध्यक्षांना पदावरून दूर करण्याची कारवाई केली जात होती. आता राज्य सरकारने आपले अधिकार सध्या अस्तित्वात असलेल्या १०५ नगरपरिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक नगरीच्या लोकनियुक्त नगरसेवकांना दिले आहेत. या १०५ स्थानिक स्वराज्य संस्थांची मुदत येत्या दोन वर्षात संपत आहे.

**स्थानिक निवडणुका लवकर होण्याचे संकेत !**

राज्य सरकारने नगराध्यक्षांना पदावरून हटविण्याबाबतच्या अधिनियमात सुधारणा केल्याने अनेक वर्ष रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका यंदाच्या वर्षी दिवाळीनंतर होण्याचे संकेत मिळत आहेत. महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुका लवकर घेण्याबाबत महायुती सरकारवर दबाव आहे. तसेच सर्व प्रमुख राजकीय पक्षांनी स्थानिक निवडणुका डोळ्यासमोर ठेवून मोर्चेबांधणी सुरु केली आहे.

# भूसंपादन मोबदला विलंबापोटीचा निर्णयाने शेतकऱ्यांचे नुकसान बँकांसाठीच्या दरापेक्षा एक टक्के अधिक दराने व्याज मिळणार

**मुंबई, दि. १६ प्रतिनिधी**

भूसंपादनाचा मोबदला विलंबाने दिल्या गेल्यास आता त्या रकमेवरील व्याज एकाच दराने दिले जाईल. हा व्याज दर बँकांसाठीच्या व्याज दरापेक्षा (रेपो रेट) फक्त एक टक्क्यांनी अधिक असेल, सा निर्णय मंगळवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. या निर्णयाचा मोठा आर्थिक फटका विविध पायाभूत सुविधांसाठी आपली जमीन देणाऱ्या शेतकऱ्यांना बसणार आहे.

राज्य सरकारने विविध सार्वजनिक, शासकीय, निमशासकीय प्रकल्पांसाठी भूसंपादन करण्यासाठी उचित भरपाईचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ स्वीकारला आहे. या कायद्यातील तरतुदीनुसार होणाऱ्या भूसंपादनामुळे जमीन मालकांना चांगला मोबदला, पुनर्वसन आणि पुनर्स्थापना होत असल्याने विरोधाचे प्रमाण खूप कमी झाले आहे. या अधिनियमात जमीन मालकांना भूसंपादनाचा मोबदला देण्यास विलंब झाल्यास कलम ३०(३) अनुसार १२ टक्के आणि कलम ७२ तसेच कलम ८० नुसार ९ टक्के आणि १५ टक्के व्याज देण्याची तरतूद करण्यात आली आहे. मात्र यामुळे राज्य सरकारच्या तिजोरीवर बोजा पडून प्रकल्पांच्या मूळ खर्चात वाढ होत असे.

मूळ प्रकल्प खर्चातील वाढ रोखण्यासाठी आता या व्याजदरात बदल करुन भूसंपादनाचा मोबदला देण्यास विलंब झाल्यास त्या रकमेवर सरसकट एकाच दराने व्याज देण्यात येईल. हा दर बँकासाठीच्या व्याज दराहून एक टक्के अधिक असेल. थकीत मोबदल्यावर या दराने दरसाल दर शेकडा प्रमाणे व्याज आकारण्याची तरतूद करण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. याबाबत विधेयक विधिमंडळात मांडण्यात आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

**शेतकऱ्यांना आमिष दाखविणारे रॅकेट कार्यरत**

केंद्र सरकारच्या २०१३ च्या कायद्यानुसार भूसंपादन प्रक्रिया पार पडून निवाडा झाल्यानंतर पहिल्या वर्षात ९ टक्के व्याज देण्याची तरतूद आहे. तर विलंब झाल्यास दुसऱ्या वर्षी १५ टक्के व्याज देण्याचे कायद्यात नमूद केले आहे. मात्र, राज्यात शेतकऱ्यांना भूसंपादन मोबदल्याच्या व्याजापोटी अधिक रक्कम मिळवून देण्याचे आमिष देणारे रॅकेट कार्यरत आहेत. हे रॅकेट वकिलांच्या मदतीने न्यायालयात जातात. न्यायालयात अनेक वर्ष खटला चालून निकाल आल्यानंतर सरकारला व्याजापोटी मोठी रक्कम मोजावी लागते. त्यामुळे राज्य सरकारने भूसंपादन विलंबापोटी बँकांसाठीच्या दरापेक्षा एक टक्के अधिक दराने व्याज देण्याचा निर्णय घेतला आहे. असा निर्णय घेण्याचा अधिकार राज्य सरकारला आहे, अशी माहिती मदत आणि पुनर्वसन विभागाच्या अधिकाऱ्याने नाव न छापण्याच्या अटीवर दिली.

# कुरकुंभ औद्योगिक क्षेत्रातील प्रदूषणावर कारवाईचे कामगारमंत्री आकाश फुंडकर यांचे निर्देश

**मुंबई, दि. १६ प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील कुरकुंभ (ता. दौंड) येथील औद्योगिक क्षेत्रात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने संयुक्त मोहीम राबवून कारखान्यांमुळे होणाऱ्या प्रदूषणाचे नमुने गोळा करून आवश्यक कारवाई करावी, असे निर्देश कामगारमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी दिले. यात स्थानिक ग्रामपंचायत प्रतिनिधींचाही समावेश करावा, असे त्यांनी स्पष्ट केले.

कुरकुंभ येथील अल्कली अमाइन्स कंपनीत नुकत्याच झालेल्या स्फोटानंतर निर्माण झालेल्या परिस्थिती आणि अर्थसंकल्पीय अधिवेशनात उपस्थित प्रश्नांच्या पार्श्वभूमीवर कामगारमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. यावेळी आमदार राहुल कुल, एमआयडीसी अधिकारी, रासायनिक उद्योगांचे प्रतिनिधी, पर्यावरण आणि कामगार विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. फुंडकर यांनी रासायनिक उद्योगांच्या संख्येमुळे संभाव्य अपघात टाळण्यासाठी विशेष उपाययोजनांची गरज असल्याचे सांगितले. त्यांनी स्वतंत्र पथक गठित करून औद्योगिक परिसराची सखोल तपासणी करण्याचे आदेश दिले.

आमदार राहुल कुल यांनी कॉमन इफ्लुएंट ट्रीटमेंट प्लांट (सीईटीपी) संदर्भात मुद्दा उपस्थित करत, प्रदूषित पाणी निर्माण करणारे उद्योगच सीईटीपी चालवत असल्याने प्रभावी नियंत्रण होत नसल्याचे नमूद केले. यावर फुंडकर यांनी धोरणात्मक फेरआढावा आणि संयुक्त पाहणीचे निर्देश दिले. तसेच, महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ अंतर्गत फायर ऑडिट नियम तातडीने लागू करण्यासाठी उद्योग विभागाशी समन्वय साधण्याचे आदेश दिले. प्रदूषण नियंत्रणाची जबाबदारी कामगार विभागाकडे नसली, तरी संबंधित विभागांनी तातडीने कारवाई करावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# मुंबईत पावसाळ्यापूर्वी खड्डेमुक्त रस्ते; उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ग्वाही

**मुंबई, दि. १६ प्रतिनिधी**

मुंबईतील रस्त्यांना कायमस्वरूपी खड्डेमुक्त करण्यासाठी सिमेंट काँक्रिट रस्त्यांचा निर्णय घेण्यात आला असून, मे २०२५ अखेरपर्यंत काँक्रीटीकरण पूर्ण करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बृहन्मुंबई महानगरपालिका (बीएमसी) आणि एमएमआरडीएच्या अधिकाऱ्यांना दिले. कामाच्या गुणवत्तेत कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही, असा इशारा देत त्यांनी पावसाळ्यापूर्वी चौक ते चौक रस्ते वाहतूकयोग्य करण्याचे आणि मॅनहोल, सांडपाणी वाहिन्यांची स्वच्छता प्राधान्याने करण्याचे आदेश दिले.

शिंदे यांनी आज मुंबई शहर आणि पूर्व उपनगरातील काँक्रीट रस्त्यांच्या कामांची पाहणी केली. पाहणी बॉम्बे हॉस्पिटलजवळील चौकापासून सुरू होऊन सी विभाग (आर.एस. सप्रे मार्ग), एफ उत्तर विभाग (माटुंगा, जामे जमशेद मार्ग) आणि एम पश्चिम विभाग (चेंबूर, मार्ग क्रमांक २१) येथील कामांचा आढावा घेण्यात आला. यावेळी स्थानिक नागरिकांशी संवाद साधत त्यांनी सुरक्षित आणि सुखकर प्रवासासाठी उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले. बैठकीला मंत्री मंगल प्रभात लोढा, बीएमसी आयुक्त भूषण गगराणी आणि अतिरिक्त आयुक्त अभिजीत बांगर उपस्थित होते.

आतापर्यंत १,३३३ किलोमीटर रस्त्यांचे काँक्रीटीकरण पूर्ण झाले असून, पहिल्या टप्प्यात ३२४ किलोमीटर (६९८ रस्ते) आणि दुसऱ्या टप्प्यात ३७७ किलोमीटर (१,४२० रस्ते) काँक्रीटीकरण प्रस्तावित आहे. एम-४० ग्रेड काँक्रीटचा वापर केला जात असून, हे रस्ते उच्च भारक्षमता सहन करू शकतात. शिंदे यांनी कामात हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही, असे स्पष्ट करत कंत्राटदार आणि अधिकाऱ्यांची नावे, संपर्क क्रमांक असलेले फलक लावण्याचे निर्देश दिले. चांगले काम करणाऱ्या अधिकाऱ्यांचा सन्मान आणि चुकीच्या कामावर कारवाई होईल, असेही ते म्हणाले.

# दहिसर पोलिसांकडून तक्रारदारांना मौल्यवान वस्तू स्वाधीन



**मुंबई, दि. १६ प्रतिनिधी**

दहिसर पोलीस ठाण्यात दाखल गुन्हा आणि सायबर तक्रारीच्या तपासात पोलिसांनी महत्त्वाची कामगिरी केली आहे. गुन्हे प्रकटीकरण अधिकारी सपोनि जे. वाघमारे, सपोनि इर्शाद सय्यद, सायबर अधिकारी अंकुश दांडगे, मपोउनि श्रद्धा पाटील आणि त्यांच्या पथकाने कौशल्यपूर्ण तपास करून आरोपींना अटक केली. या कारवाईत पोलिसांनी एकूण ५४.२०,४६०/- रूपयांची मालमत्ता जप्त केली आहे. ज्यात २९६-८८ ग्रॅम सोने. ५१.०५ ग्रॅम चांदी, रोख रक्कम, ६१ मोबाईल फोन, ८ लॅपटॉप आणि इतर मौल्यवान वस्तूंचा समावेश आहे. सदर मालमत्ता मुख्यमंत्री यांच्या आदेशानुसार राबवण्यात येत असलेल्या '१०० दिवसांची कृती योजना' अंतर्गत तक्रारदार व फिर्यादींना नियोजनबद्ध पद्धतीने परत देण्यात आली आहे. ही कारवाई दहिसर पोलिसांची उल्लेखनीय कामगिरी मानली जात असून नागरिकांच्या विश्वासाला न्याय देणारी ठरली आहे. सदर कामगिरी अभिषेक त्रिमुखे (अप्पर पोलीस आयुक्त - उत्तर प्रादेशिक विभाग), स्मिता पाटील मॅडम (पोलीस उप आयुक्त परिमंडळ १२), किशोर खैरनार (सहायक पोलीस आयुक्त दहिसर विभाग) आणि मा. अशोक होनमाने (वरिष्ठ पोलीस निरीक्षक दहिसर पोलीस ठाणे) यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

या तपासासाठी विशेष टीम तयार करण्यात आली होती. ज्यामध्ये अशोक घुगे (गुन्हे). ए. एम. देसाई (पोलीस निरीक्षक प्रशासन), गुन्हे प्रकटीकरण अधिकारी स.पो.नि. जिनपाल वाघमारे, सपोनि इर्शाद सय्यद, सपोनि अंकुश दांडगे तसेच गुन्हे प्रकटीकरण पथक यांचा समावेश होता. या पथकाने तांत्रिक तपास आणि गोपनीय सूत्रांचा प्रभावी वापर करून गुन्हा उघडकीस आणला. आरोपींना अटक करून एकूण ५४.२०.४६०/- रुपये किमतीची मालमत्ता जप्त करण्यात आली. ही मालमत्ता संबंधित फिर्यादी व तक्रारदारांना परत करण्यात आली आहे. पोलीस विभागाच्या या यशस्वी कारवाईमुळे नागरिकांमध्ये विश्वास वाढला असून पोलिसांच्या कार्यक्षमतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# ई-मेल स्पूफिंग प्रकरणात नायजेरियन नागरिक अटकेत

**मुंबई, दि. १६ प्रतिनिधी**

माटुंगा पोलिसांनी ई-मेल स्पुफिंगच्या गुन्ह्यात नायजेरियन नागरिक अडोल्फस उचे ओनुमा (वय ३५, रा. खारघर, नवी मुंबई) याला अटक केली आहे. २६ जानेवारी २०२५ रोजी एका महिला उद्योजिकेला केमिकल व्यवसायात अधिक नफा देण्याच्या बहाण्याने फसवण्यात आले. तिला यूके येथून मेलद्वारे बनावट व्यवसायाची माहिती पाठवण्यात आली होती. महिलेला प्रस्ताव आवडल्याने तिने सहमती दर्शवत भारतातील राम ट्रेडर्स (अरुणाचल प्रदेश) या कंपनीकडून केमिकल सॅम्पल घेऊन पाठवले आणि त्यासाठी रुपये ३,०५,०००/- भरले. मात्र, केवळ एक लिटर पार्सल आल्यावर त्या कंपन्यांशी संपर्क होईनासा झाला आणि फसवणूक झाल्याचे लक्षात आले.

महिलेच्या तक्रारीवरून माटुंगा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. तपासादरम्यान समजले की, यापूर्वी आंध्र प्रदेश आणि गुजरातमध्ये देखील याच आरोपीवर सायबर तक्रारी दाखल होत्या. तांत्रिक विश्लेषणात खारघर येथून मोबाईल वापरल्याचे निष्पन्न झाल्यानंतर पोलिसांनी सापळा रचन

आरोपीला अटक केली. त्याची चौकशी केल्यानंतर गुन्ह्यात थेट सहभाग असल्याचे सिद्ध झाले असून, न्यायालयाने त्याला ६ दिवसांची

पोलीस कोठडी सुनावली आहे. सदर संपूर्ण कारवाई पोलीस आयुक्त श्री. विवेक फणसळकर, विशेष पोलीस आयुक्त श्री. देवेन भारती, सह पोलीस आयुक्त (अपराध) सुश्री सत्यनारायण, अपर पोलीस आयुक्त (मध्य विभाग) श्री. अनिल पारसकर, मा. पोलीस उप आयुक्त (परिमंडळ ४) श्रीमती रागसुधा आर., सहा. पोलीस आयुक्त श्री. योगेश गावडे आणि वपोनि श्री. राजेंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या प्रकरणाचा तपास पोनि सर्जेराव पाटील यांनी केला असून, माटुंगा सायबर पथकातील पोउपनि प्रविणकुमार पाटील, पोह. संतोष पवार आणि पोशि गोविंद शिरगिरे यांनी ही कारवाई यशस्वीरित्या पर्ण केली

# चेंबुरमध्ये 20 वर्षीय युवकाची हत्या, आरोपी अटकेत

**मुंबई, दि. १६ प्रतिनिधी**

गोवंडी शिवाजी नगरमध्ये राहणाऱ्या एका २० वर्षीय युवकाची हत्या करण्यात आली असून चेंबूर पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपीचं नाव वैभव पांडुरंग भिंगारदिवे (२१) सांगण्यात येत आहे.

चेंबूर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १४ एप्रिल रोजी रात्री १.३० वाजता मोहम्मद फरीद अलीम शेख (२०) वर्ष चेंबूर लालमिट्टी गार्डन जवळ गेला होता. काही कारणामुळे आरोपी वैभव भिंगारदिवे त्याला शिवीगाळ करू लागला. त्यानंतर दोघांमध्ये जोरदार वाचावाची झाली आणि ही वाचावाची गंभीर होऊन आरोपीनी मृत फरीद शेखला बेदम मारहानी केलीआणि आरोपीनी

मयताच्या डोक्यावर बाटली फोडली त्यात तो गंभीर जखमी झाला. त्याला तात्काळ रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले. नंतर त्याचा मृत्यू झाला असे सांगण्यात येत आहे. चेंबूर पोलिसांनी तात्काळ आरोपी विरोधात गु.र.क्र. १७८/२०२५ भा. न्या.सं. कलम १०३(१) अन्वय गुन्हा नोंद करुन आरोपीला अटक केली. मयत फरीद याचा मोठा भाऊ मोहम्मद अरमान मोहम्मद अलीम शेख, वय २८ वर्ष, व्यवसाय रिक्षाचालक, रा.ठी मोहम्मद रफीक नगर, गोवंडी फत्ते जिमच्या विरुद्ध बाजूस, शिवाजीनगर, मुंबई याच्या तक्रारीवरून पोलिसांनी ही कारवाई केली असून पोलीस अधिक तपास पोलिस करत आहेत.

# शिधावाटप दुकानदारांच्या कमिशनमध्ये प्रतिक्विंटल 20 रुपये वाढ करण्याचा निर्णय

**मुंबई, दि. १६ प्रतिनिधी**

राज्याच्या खेडोपाड्यातील ७ कोटी लाभार्थ्यांना धान्यवाटप करणाऱ्या शिधावाटप दुकानदारांच्या कमिशनमध्ये प्रतिक्विंटल २० रुपयांची वाढ करुन ते १५० रुपयांवरुन १७० रुपये करण्याचा निर्णय उपमुख्यमंत्री तथा अन्न व नागरीपुरवठा मंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रालयात झालेल्या बैठकीत घेण्यात आला. केंद्राची मान्यता असलेल्या आणि नाफेडमार्फत उपलब्ध होणाऱ्या दहा जीवनावश्यक वस्तूंची विक्री शिधावाटप दूकानातून करण्यास परवानगी देण्याचा निर्णयही आजच्या बैठकीत झाला.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत झालेल्या या निर्णयांमुळे शिधावाटप दुकानदारांची अनेक वर्षांची प्रलंबित मागणी पूर्ण झाली असून त्याबद्दल दुकानदारांच्या संघटनांनी आनंद व्यक्त करीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आभार मानले आहेत. देशातील ८० कोटी आणि राज्यातील ७ कोटी लाभार्थांना शिधावाटप दुकानांच्या माध्यमातून स्वस्त अन्नधान्याचे वितरण करण्यात येते. केंद्रसरकारच्या अखत्यारीतील भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामांपासून राज्याच्या शहरात, गावखेड्यातील शिधावाटप दुकानांपर्यंत अन्नधान्य पुरवण्यासाठी एक प्रभावी यंत्रणा कार्यरत आहे. ही यंत्रणा अधिक जलद, सक्षम, पारदर्शक, विश्वासार्ह बनविण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राज्याचा नागरी पुरवठा विभाग प्रयत्नशील आहे. त्यासाठी स्मार्ट रेशनकार्ड, इलेक्ट्रॉनिक वजनकाटे, जीपीएस



ट्रॅकिंग, लाईव्ह मॉनिटरींगसारख्या तंत्रज्ञानाचा वापर करुन महाराष्ट्रासाठी उपयुक्त ठरेल अशी खरेदी, वितरण, नियंत्रण, देखभाल यंत्रणा उभारण्याचा निर्णय आज बैठकीत घेण्यात आला. यासाठी सध्या गुजरातमध्ये उपयोगात असलेल्या यंत्रणेचाही अभ्यास करण्यात येणार आहे.

राज्यातील शिधावाटप यंत्रणेसंदर्भातील प्रलंबित प्रकरणांवर तातडीने सुनावणी घेऊन ती निकाली काढण्यात येतील, अशी माहितीही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बैठकीत दिली. गावखेड्यातल्या प्रत्येक शिधापत्रिकाधारकाला नियोजनानुसार धान्यवाटप झाले पाहिजे, या कार्यवाहीत हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, असे निर्देशही अजित पवार यांनी बैठकीत दिले.

**प्रत्येक विधानसभा मतदारसंघात शिधावाटप कार्यालय**

मुंबई आणि ठाणे क्षेत्रातील शिधावाटप कार्यालयांची पुनर्रचना करुन प्रत्येक विधानसभा मतदारसंघात किमान एक कार्यालय असेल अशा पद्धतीने पुनर्रचना करण्याचा महत्वपूर्ण निर्णयही आजच्या बैठकीत घेण्यात आला. यापूर्वी १९८० मध्ये शिधावाटप कार्यालयांची पुनर्रचना करण्यात आली होती. नव्या पुनर्रचनेनंतर मुंबई व ठाण्यात एक परिमंडल कार्यालय आणि ५ नवीन शिधावाटप कार्यालये तयार होतील. यातून मुंबई आणि ठाणे परिसरातील नागरी पुरवठा यंत्रणा अधिक सक्षम होण्यास मदत होईल, असा विश्वास उपमुख्यमंत्री तथा अन्न व नागरी पुरवठामंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मंत्रालयातील कार्यालयात झालेल्या या बैठकीत अन्न व नागरी पुरवठा विभागाची सद्यस्थिती, भविष्यातील वाटचालीबाबतचे सादरीकरण करण्यात आले. बैठकीला अन्न व औषध प्रशासनमंत्री नरहरी झिरवाळ, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, उपमुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव डॉ. राजेश देशमुख, अन्न व नागरी पुरवठा तसेच ग्राहक संरक्षण विभागाच्या सचिव जयश्री भोज, शिधावाटप नियंत्रक सुधाकर तेलंग आदींसह संबंधिक विभागाचे वरिष्ठ अधिकारी आणि शिधावाटप दुकानदारांच्या संघटनांचे पदाधिकारी, प्रतिनिधी उपस्थित होते.

## महत्त्वाच्या बातम्या

### आस्तिककुमार पांडे एमएमआरडीए सहआयुक्तपदी

**मुंबई, दि.१६ प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाने पाच सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या जाहीर केल्या असून, आस्तिककुमार पांडे यांची मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) सहआयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. यासह अन्य अधिकाऱ्यांना महत्त्वाच्या जबाबदाऱ्या देण्यात आल्या आहेत.

रमेश चव्हाण यांची राज्य कामगार विमा योजनेचे आयुक्त म्हणून नियुक्ती झाली आहे. राहुल गुप्ता यांच्याकडे हिंगोलीच्या जिल्हाधिकारीपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. सत्यम गांधी यांना सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिकेचे आयुक्त म्हणून नेमण्यात आले आहे. तसेच, विशाल खत्री यांना एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प (आयटीडीपी) डहाणू येथे प्रकल्प अधिकारी आणि डहाणू उपविभागाचे सहायक जिल्हाधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

या बदल्यांमुळे प्रशासकीय यंत्रणेत कार्यक्षमता वाढण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. नव्या नियुक्त्यांमुळे संबंधित विभाग आणि क्षेत्रांमध्ये विकासकामांना गती मिळेल, असा विश्वास प्रशासकीय वर्तुळातून व्यक्त होत आहे.

### ईस्टर्न फ्रीवेवर कारची डिवायडरला धडक महिलेसह दोघांचा जागीच मृत्यू

**मुंबई, दि.१६ प्रतिनिधी**

ईस्टर्न फ्रिवेवर सोमवारी पहाटे कारची डिवायडरला भीषण धडक लागून झालेल्या अपघातात दोघांचा जागीच मृत्यू झाला तर चारजण जखमी झाले. जखमींवर जे. जे रुग्णालयात उपचार सुरु आहे. याप्रकरणी शिवडी पोलिसांनी अपघाताची नोंद करुन तपास सुरु केला आहे. खुशबू रामनयन राजभर ही तरुणी कळवा परिसरात राहत असून एका शाळेत शिक्षिका म्हणून काम करते. सोमवारी पहाटे चार वाजता खुशबू ही तिची आई गीता राजभर, विनोद वायडे, अनिता जयस्वार, सुलेखा वायडे, आणि कारालक चेतन चंदू पाटील यांच्यासोबत मासे घेण्यासाठी भाऊचा धक्का येथे जात होते. ही कार सकाळी पाच वाजता ईस्टर्न फ्रिवेवरुन जात होती. यावेळी कारचालकाचे कारवरील नियंत्रण सुटले आणि त्याने डिवायडरला जोरात धडक दिली. ही कार भरवेगात जात असल्याने कारचे प्रचंड नुकसान झाले होते. त्यात सर्वजण गंभीररीत्या जखमी झाले होते. अपघाताची माहिती मिळताच शिवडी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली होती. जखमींना तातडीने जवळच्या जे, जे रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तिथे विनोद वायडे आणि अनिता जयस्वार या दोघांना डॉक्टरांनी मृत घोषित केले तर इतर चौघांवर उपचार सुरु आहेत.

### ड्रग्ज पार्सलची भीती दाखवून पावणेदोन कोटींची फसवणूक

**मुंबई, दि.१६ प्रतिनिधी**

ड्रग्ज पार्सलची भीती दाखवून एका वयोवृद्ध महिलेची सुमारे पावणेदोन कोटीची फसवणूक झाली आहे. याप्रकरणी मध्य सायबर सेल पोलिसांनी अज्ञात सायबर ठगाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. निवृत्त शिक्षिका असलेल्या ६१ वर्षीय तक्रारदार माहीम परिसरात राहतात. जानेवारी महिन्यात तिला गुन्हे शाखेचा अधिकारी असल्याची बतावणी करुन एका व्यक्तीने कॉल केला. त्याने तिला ड्रग्ज पार्सलच्या गुन्ह्यात अटकेची भीती दाखवली. याच दरम्यान तिला अन्य एका व्यक्तीने कॉल करुन तो ईडीचा अधिकारी असल्याचे सांगितले. त्याने तिला विविध बँक खात्यात १ कोटी ७२ लाख रुपये ट्रान्स्फर करण्यास प्रवृत्त केले. ही रक्कम ट्रान्स्फर केल्यानंतर त्याने तिच्याकडे आणखी पैशांची मागणी केली. तिच्या गावची जमीन विक्री करण्याचाही त्याने तिला सल्ला दिला. हा प्रकार संशयास्पद वाटताच तिने सायबर सेल पोलिसांत तक्रार केली.

### फॉरेन्सिक लॅबच्या निवृत्त महिला अधिकाऱ्याला १३ लाखांचा गंडा

**मुंबई, दि.१६ प्रतिनिधी**

फॉरेन्सिक लॅबच्या एका ६२ वर्षीय महिला अधिकाऱ्याला एका अज्ञात सायबर ठगाने बँकेचे ॲप ॲक्टिव्ह करण्याचा बहाणा करुन १३ लाखांचा गंडा घातला. याप्रकरणी गुन्हा नोंदवून मध्य सायबर सेलने तपास सुरु केला आहे. तक्रारदार महिला सायन परिसरात राहते. तिचे तिच्या बहिणीसोबत एक संयुक्त खाते आहे. मार्च महिन्यात तिने बँकेच्या टोल फ्री क्रमांकावर फोन करुन रविवारी बँक सुरु असते का याबाबत विचारणा केली. मात्र तिला समोरुन कोणीही प्रतिसाद दिला नाही. त्यानंतर तिला अज्ञात व्यक्तीने कॉल करुन ऑनलाईन ॲपवरुन पेमेंट करता येईल असे सांगितले. त्यानंतर त्याने तिला एक ॲप पाठवून ते ॲक्टिव्ह करुन देतो असे सांगितले. दुसऱ्या दिवशी तिच्या खात्यातून १३ लाख ४१ हजार रुपये डेबीट झाले. हा प्रकार उघडकीस येताच तिने सायबर सेल पोलिसांत तक्रार केली.

### पंचवटी एक्सप्रेसमध्ये एटीएम

**मुंबई, दि.१६ प्रतिनिधी**

मुंबई-मनमाड पंचवटी एक्सप्रेसने प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी एक खुषखबर आहे. पंचवटी एक्सप्रेसच्या एसी चेअर कार कोचमध्ये बँक ऑफ महाराष्ट्राचे एटीएम बसविण्यात आले आहे. यामुळे प्रवाशांना आता प्रवासादरम्यानच एटीएम मधून पैसे काढता येणार आहे. सीएसएमटी ते मनमाड दरम्यान धावणारी पंचवटी एक्सप्रेस प्रवाशांच्या पसंतीची आहे. या गाडीला नेहमीच प्रवाशांची गर्दी असते. प्रवाशांच्या सोयीसाठी रेल्वेतर्फे विविध सोयी-सुविधा पुरविण्यात येतात. मनमाड रेल्वे वर्कशॉपमध्ये पंचवटी एक्सप्रेसच्या एसी चेअर कार कोचमध्ये एटीएम बसविण्यात आले आहे. कोचच्या मागील बाजूस क्यूबिकलमध्ये बसविला आहे. गाडी धावत असताना सुरक्षितता आणि सुलभ प्रवेश सुनिश्चित करण्यासाठी मशीनला शटर दरवाजाने संरक्षित केले आहे.

### महिलेला ब्लॅकमेल करणाऱ्यास अटक

**मुंबई, दि.१६ प्रतिनिधी**

खार पोलिसांनी ३२ वर्षीय महिलेला ब्लॅकमेल करणाऱ्या एका व्यक्तीला अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी रोहितने महिलेचे काही खाजगी व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी दिली होती आणि तसे न करण्यासाठी तिच्याकडून २ लाख रुपयांची मागणी केली होती. त्यानंतर पीडितेने पोलिसांशी संपर्क साधला आणि एफआयआर दाखल केला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही महिला तिच्या कुटुंबासह अंधेरी येथे राहते. रोहित त्याच परिसरात काम करायचा. त्या काळात दोघांमध्ये मैत्री निर्माण झाली जी हळूहळू प्रेमात रूपांतरित झाली. काही दिवसांपूर्वी, रोहितने त्या महिलेला खार येथे भेटण्यासाठी बोलावले आणि तिला एका हॉटेलमध्ये घेऊन गेला. तिथे त्यांच्यात एक घनिष्ठ संबंध प्रस्थापित झाला. दोघेही सतत भेटू लागले आणि याचा फायदा घेत रोहितने त्या महिलेचे काही आक्षेपार्ह व्हिडिओ त्याच्या मोबाईलवर बनवले. तेच व्हिडिओ दाखवून रोहितने महिलेला ब्लॅकमेल करायला सुरुवात केली आणि ते व्हिडिओ सोशल मीडियावर अपलोड न करण्याच्या बदल्यात दोन लाख रुपयांची मागणी करत होता. या धमक्यांना कंटाळून महिलेने अखेर खार पोलिस स्टेशन गाठले आणि रोहितविरुद्ध लैंगिक छळ, खंडणी आणि माहिती तंत्रज्ञान कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला. पोलिसांनी तात्काळ कारवाई करत आरोपी रोहितला विलेपार्ले येथून अटक केली आणि पुढील कारवाई सुरू आहे.

### पीओपी की शाडूच्या गणेशमूर्ती तिढा कायम, मूर्तिकारांपुढे मोठा पेच

**मुंबई, दि.१६ प्रतिनिधी**

प्लास्टर ऑफ पॅरिसच्या (पीओपी) की शाडूच्या गणेशमूर्ती याबाबतचा तिढा कायम असल्याने मूर्तिकरांपुढे मोठा पेच निर्माण झाला आहे. त्यामुळे एप्रिलच्या तिसऱ्या आठवड्यातही मूर्ती कार्यशाळा सुरू झालेल्या नाहीत. त्यामुळे मुंबई शहर, उपनगरांत आवश्यक गणेशमूर्तींचा पुरवठा कसा होणार, असा प्रश्न मूर्तिकारांसमोर उभा राहिला आहे. शासनाने पीओपी गणेशमुर्तीवरील बंदी हटवावी अशी मूर्तीकारांची मागणी आहे. यावर अजुनही संभ्रम कायम असल्याने लवकरात लवकर तोडगा निघाला नाही तर गणेशमूर्तींचा तुटवडा भासणार आहे. मुंबई शहर व उपनगरांत सरासरी १ लाख ९६ हजारांपेक्षा जास्त घरगुती गणपती आहेत, तर सार्वजनिक गणेश उत्सवाची संख्या सुमारे १५ हजार इतकी आहे. एवढी मोठी मूर्तीची मागणी पूर्ण करण्यासाठी मूर्तिकार एप्रिलमध्ये आपल्या मूर्तीकार्यशाळा सुरू करतात. सुमारे सहा ते साडेसहा हजार कारखाने (पालिकेकडे नोंद होणाऱ्या कारखान्यांची संख्या सुमारे ४ हजारांच्या घरात आहे) मूर्तीकार मोठ्या मेहनतीने मूर्ती घडवत असतात. मात्र आता पीओपी की शाडूची गणेशमूर्ती घडवायची असा पेच निर्माण झाला आहे.

# कॅलिडोस्कोप

## रेल्वेचा मालक शेतकरी?



टाटा, बिर्ला, अंबानी, अदानी यांच्या मालकीची विमाने, जहाजे आणि मेट्रो असली तरी रेल्वे मात्र त्यांच्या मालकीची होऊ शकली नाही. मात्र ही किमया काही काळासाठी का होईना, एका शेतकऱ्याने करून दाखवली आहे. रेल्वेच्या चुकीमुळे चक्क शेतकरी संपूर्ण ट्रेनचा मालक झाला.

तसेही भारतात अनेकदा विचित्र घटना पाहायला मिळतात. कधी कुणाचा फोटो दुसऱ्याच्या नावाने पेस्ट केला जातो तर कधी नावातच घोळ होतो. पण रेल्वेच्या चुकीमुळे एका शेतकऱ्याला चक्क स्वतःची ट्रेन मिळाली. रेल्वे ही तुमची संपत्ती असल्याची अशी घोषणा अनेकदा केली जात असली तरी प्रत्यक्षात तुम्ही तिचे मालक होत नाहीत कारण रेल्वे भारत सरकारच्या मालकीची आहे. मात्र संपूर्णनाम सिंग या शेतकऱ्याने काही काळ हा होईना, रेल्वेची मालकी मिळवली होती. पंजाबमधील लुधियाना येथील कटाना गावातील तो एक साधा शेतकरी होता. तोच दिल्लीहून अमृतसरला जाणाऱ्या स्वर्ण शताब्दी एक्सप्रेस ट्रेनचा मालक बनला होता.

कसे घडले?

२००७ मध्ये लुधियाना-चंदीगड मार्ग टाकण्यासाठी रेल्वेने शेतकऱ्यांकडून जमीन खरेदी केली होती. तेव्हा रेल्वेने संपूर्णनाम सिंह यांची जमीन २५ लाख रुपये प्रति एकर या दराने संपादित केली. पण काही दिवसांनी रेल्वेने जवळच्या गावात एवढ्या मोठ्या जमिनीसाठी ७१ लाख रुपये प्रति एकर दिल्याचे संपूर्ण सिंह यांना कळले. मग या दुटप्पीपणाविरोधात ते कोर्टात पोहोचले. सुनावणीत न्यायालयाने नुकसानभरपाईची रक्कम २५ लाखांवरून ५० लाख रुपये करण्याचे आदेश दिले; मात्र नंतर ती वाढवून १.४७ कोटी इतकी करण्यात आली. न्यायालयाने रेल्वेला २०१५ पर्यंत संपूर्णनाम सिंगला संपूर्ण पैसे देण्याचे आदेश दिले. परंतु रेल्वेने त्यांना केवळ ४२ लाख रुपयेच दिले. उरलेली रक्कम देण्यात रेल्वे अपयशी ठरली होती. त्यानंतर जिल्हा आणि सत्र न्यायाधीश जसपाल वर्मा यांनी लुधियाना रेल्वे स्थानकावरच ट्रेन थांबवून तिचा ताबा सिंग यांना देण्याचा आदेश दिला. न्यायालयाच्या आदेशानंतर सिंग स्टेशनवर पोहोचले आणि अमृतसर स्वर्ण शताब्दी एक्स्प्रेस ताब्यात घेऊन तिचे मालक झाले. मात्र नंतर रेल्वे अभियंत्याने न्यायालयाच्या आदेशाने ट्रेन सोडवली आणि पुन्हा तिचा ताबा मिळवला.

## समोसा, जिलेबी, दाळभात आणि बिर्याणीही नाही आपली...

समोसा ते जिलेबी हे पदार्थ मुळात भारतीय नाहीत. ते अन्य देशांमधून इथे आले आणि इथलेच होऊन गेले. शाकाहारींचा एकमेव आधार असणारे पनीरदेखील आपले नाही. गुलाबजामपासून जिलेबीपर्यंतचे सगळे पदार्थ आपण आवडीने स्वीकारले आहेत. मात्र खरेतर हे परकीयांचे देणे आहे. गुलाबजाम हा गोड पदार्थ पर्शिया आणि भूमध्य समुद्रातून भारतात आला. तुर्की शासकांद्वारे तो येथे आणल्याचे म्हटले जाते. आणखी एक आख्यायिका अशी आहे की तो भारतात मोगलांमुळे आला. परंतु त्यावर पर्शियन प्रभाव होता. 'गुलाब' हा मूळचा पर्शियन शब्द आहे. लुकमत अल कादी नावाची एक पर्शियन मिठाई आहे, जी अगदी गुलाबजाम सारखीच असते.





**चहासुद्धा परदेशी**

चहादेखील भारताचा नाही. चहाची उत्पत्ती चीनमध्ये झाली आहे. भारतात ब्रिटिशांनी चहा आणला आणि आसाम, दार्जिलिंग तसेच इतरत्र त्याची व्यावसायिक लागवड सुरू केली. भारतात, विशेषतः ईशान्येकडील भागात जंगली चहा प्यायला जात असे. कदाचित यालाच वैदिक काळात सोम म्हटले जात असावे.

**जिलेबीचे मूळ मध्य पूर्वेत** आहे. ती भारतात बरीच उशिरा आली. विशेष म्हणजे हे नावही पर्शियन-अरबी शब्द 'झलाबिया'वरून आले आहे. तेथे हे सर्वसामान्यांच्या आवडते खाद्य आहे. उत्तर आफ्रिका, युरोपचे काही भाग, मध्य पूर्व आणि आशियात या पदार्थाला वेगवेगळी नावे आहेत. उदा. जिलबीला फनेल केक, चेबाकिया, झलेबिया, झुल्बिया, ग्वारामरी, पिटुलित्सी, झोलबिया, पिट्ठुले, जिलापी अशी अनेक नावे आहेत.

**इडलीचे मूळ इंडोनेशियात**

इडलीच्या शोधाचे दोन सिद्धांत प्रचलित आहेत. काही इतिहासकारांच्या मते, कन्नड ग्रंथांमध्ये इडलीचे संदर्भ मिळतात. शिवकोटियाचार्य यांचे इसवी. ९२० मधील 'वड्डारधने' किंवा चावुंदराय दुसरा यांचे १०२५ इसवी सनातील 'लोकोपकार' मध्ये याचे संदर्भ आहेत. काहींच्या मते, इडली ८०० ते १२०० च्या दरम्यान भारतात प्रवास करणाऱ्या हिंदू इंडोनेशियन राजांसाठी बनवली जायची. इथे लक्षात घ्यायला हवे की, दक्षिण भारत आणि मलेशिया, इंडोनेशिया, श्रीलंका या देशांमध्ये नैसर्गिकरित्या अनेक खाद्यपदार्थांमध्ये म्हणून समानता आहे.

**कॉफी येमेनची**

चहाप्रमाणेच कॉफीदेखील भारतीय वंशाची नाही. असे म्हटले जाते, की बाबा बुदान या सुफी संताने मक्केची तीर्थयात्रा केल्यानंतर येमेनहून येताना भारतात कॉफी बीन्स आणले होते. अखेर कर्नाटकातील चिक्कमंगलुरू येथे ते स्थायिक झाले आणि तिथे कॉफीची लागवड सुरू केली. अशा प्रकारे कॉफीदेखील आपली झाली.

**दाळभातही नाही हो आपला!**

दाळ-भात आपल्यातील अनेकांचा आवडता पदार्थ आहे. प्रत्यक्षात याचा जन्म आपल्याकडे नव्हे तर शेजारच्या नेपाळमध्ये झाला. तेथेही त्याला 'दाल भात'च म्हणतात. दालभाताच्या एका प्लेटमध्ये सामान्यतः त्याच्यासह भाजीपाल्याचे काही पदार्थ आणि लोणचे असते. 'दाल भात पॉवर २४ तास' ही एक लोकप्रिय नेपाळी म्हण या संतुलित जेवणावरुनच तयार झाली आहे. गिर्यारोहणा दरम्यान शक्ती टिकून ठेवण्यास दाल भात मदत करतो.



बिर्याणी हा झोमॅटोवर सर्वाधिक ऑर्डर होणारा भारतातील पदार्थ आहे. मात्र पिझ्झा, पास्ता आणि नूडल्सला मागे टाकत 'बिर्याणी' हा ऑनलाईन ऑर्डर होणारा पदार्थदेखील प्रत्यक्षात पर्शियातून आला आहे. पर्शियन भाषेत बिर्याणी म्हणजे 'भात' असा अर्थ आहे.



**पनीरही मूळचे पर्शियन**

पनीरला भारतीय शाकाहारींचा निर्विवाद राजा म्हटलं जातं. मात्र ते देखील इराण किंवा अफगाणिस्तानातून भारतात आले आहे. दक्षिण भारतात त्याची लोकप्रियता कमी असल्यावरूनही हे स्पष्ट होते. भगवान कृष्ण आणि लोणी, ताक यांच्याबद्दलच्या अनेक कथा आहेत. पण पनीरची एकही कहाणी नाही. मुळात पनीर हा शब्द पर्शियन शब्द 'पेनीर' पासून तयार झाला आहे. पेनीर नावाचे चीज संपूर्ण पश्चिम आशियामध्ये खाल्ले जाते.

**समोसाही पर्शियाचाच**

भारतीयांचा आवडता समोसादेखील मूळचा पर्शियाचा आहे. पर्शिया म्हणजे आताचा इराण. समोसा हे नाव पर्शियन शब्द 'साम्बुसक' पासून आले आहे. तेथे समोशात मांस, काजू आणि मसाले भरलेले असायचे. भारतात मात्र त्यात बटाट्याची भाजी भरली गेली आणि हा पदार्थ लोकप्रिय झाला.

**राजम्याचे मूळ मेक्सिकन**

राजमा-राईस ही उत्तर भारतीय घरांमधील आवडती डीश असली तरी राजमा किंवा लोबिया वा लाल राजमा याची मुळात भारतात कधीच लागवड होत नव्हती. याचे कारण राजमा मेक्सिकन वंशाचा आहे. प्रथम तो पेरूमध्ये पिकवला गेला. पुढे उत्तर अमेरिका आणि दक्षिण अमेरिकेत मोठ्या प्रमाणात प्रवास करणाऱ्या पोर्तुगीजांनी तो भारतात आणला असे मानले जाते.

## विमानावरील हिरव्या-लाल दिव्यांविषयी...

रात्रीच्या वेळी आकाशातून विमान उडताना सर्वांनीच पाहिले आहे. यावेळी त्यावरील काही रंगांचे दिवे लुकलुकत असल्याचेही दिसते. यामध्ये हिरवे आणि लाल दिवे आपल्याला दुरूनच दिसतात. मात्र विमानाच्या दोन्ही बाजूंना लाल आणि हिरव्या रंगांचे दिवे स्वतंत्रपणे का लावले जातात, याचा तुम्ही कधी विचार केला आहे का?

हिरव्या आणि लाल रंगाचे दिवे विमानाच्या दोन्ही पंखांवर लावण्यात येतात. म्हणजेच एका बाजूला हिरवा आणि दुसरीकडे लाल दिवा असतो. हे दोन्ही दिवे नेव्हिगेशनमध्ये मदत करतात. ते आकाशातील इतर वैमानिकांना तसेच जमिनीवरील हवाई वाहतूक नियंत्रकाला विमानाची दिशा सांगण्याचे काम करतात. त्यामुळे विमानाची स्थिती अचूकपणे कळू शकते. लाल दिवा नेहमी विमानाच्या डाव्या पंखाच्या टोकाला असतो. म्हणजेच तो विमानाच्या डाव्या बाजूबद्दल सांगतो तर हिरवा दिवा उजव्या पंखाच्या टोकाला असतो. स्वाभाविकच तो विमानाच्या उजव्या बाजूस सूचित करतो.

अर्थात कोणत्याही विमानात फक्त हिरवे आणि लाल दिवेच नसतात तर यात टॅक्सी लाइट, टेक ऑफ लाईट, रनवे लाईट, अँटी कोलिजन बीकन, लँडिंग लाईट, लोगो लाईट असे अनेक दिवे असतात. ते वेगवेगळ्या वेळी प्रकाशित होतात. त्यांचे अर्थही वेगवेगळे आहेत.




## 'एआय' मुळे रुग्णाचा पुनर्जन्म



ही गंभीर आजार असणाऱ्या एका व्यक्तीची कहाणी आहे. पण 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स'च्या मदतीने उपचार केल्याने त्याचा जीव वाचला. वर्षभरापूर्वी अमेरिकेतील जोसेफ कोट्स यांची अवस्था इतकी वाईट झाली होती, की डॉक्टरांनी त्यांना एकच प्रश्न विचारला. तो होता, तुम्हाला घरी मरायला आवडेल की रुग्णालयात? परंतु एका 'एआय' मॉडिलने थेरपी आणि औषधांचे सूत्र तयार केले आणि त्यामुळे कोट्स यांना नवीन जीवन मिळाले.

३७ वर्षीय कोट्स वॉशिंग्टनमधील रेंटनमध्ये राहतात. अनेक महिन्यांपासून ते 'एचआयव्ही सिंड्रोम' नावाच्या रक्ताच्या विकाराशी झुंज देत होते. या आजारामुळे त्यांचे मूत्रपिंड जवळजवळ बंद झाले. दर काही दिवसांनी पोटातून लिटरभर पाणी निघत असे. त्यामुळे प्रकृती इतकी खालावली होती की, स्टेम सेल प्रत्यारोपणासारखे उपचारही अशक्य होते.

हार नाही मानली

कोट्स म्हणतात, इतका त्रास असला तरी मी हार मानली होती. मला वाटले की, मृत्यू जवळ आला आहे. परंतु मैत्रीण तारा थिओबाल्डने फिलाडेल्फियाचे डॉक्टर डेव्हिड फेगेनबॉम यांना एक ई-मेल पाठवला. त्यानुसार ताराची भेट डॉ. फेजेनबॉम यांच्याशी झाली. दुसऱ्याच दिवशी डॉ. फेगेनबॉम यांनी कोट्स यांना केमोथेरपी, इम्यूनोथेरपी आणि स्टिरॉइड्सचे अनोखे संयोजन वापरण्याचा सल्ला दिला. हे सूत्र यापूर्वी कधीही एचआयव्ही सिंड्रोमच्या उपचारांसाठी वापरले गेले नव्हते. मात्र त्याच्या वापराने अवघ्या एका आठवड्यात त्यांच्या प्रकृतीत सुधारणा होऊ लागली. चार महिन्यांनंतर ते स्टेम सेल प्रत्यारोपणासाठी तयार झाले आणि आता ते पूर्णपणे बरे होत आहेत. हा चमत्कारिक उपचार डॉक्टरांचा नव्हता तर 'एआय' मॉडेलने शोधून काढलेले ते संयोजन होते.

फॉर्म्युला कसा तयार झाला?

डॉ. फेजेनबॉम स्वत: कॅसलमॅन नामक रोगाने (रोगप्रतिकारक शक्तीशी संबंधित एक दुर्मिळ विकार) ग्रस्त होते. मात्र 'सिरोलिमस' नावाच्या जुन्या औषधाने त्यांनी आपले प्राण वाचवले. या अनुभवानंतरच त्यांनी 'एव्हरी क्योर' नावाचा प्रकल्प सुरू केला. त्यात 'एआय' च्या मदतीने ४,००० औषधे आणि १८,५०० रोगांमधील संबंध शोधले गेले. वैद्यकशास्त्राला ड्रग रिप्युरिंग नवीन नाही, परंतु 'एआय' ने ते अधिक वेगवान आणि अधिक प्रभावी उपचार केले जातात असे या तज्ज्ञांचे म्हणणे आहे. त्यामुळेच याच तंत्राने त्यांनी जोसेफ कोट्स यांच्यासाठी औषध तयार केले.

नवी उमेद

'एआय'च्या या यशामुळे एका रुग्णाचे प्राण वाचलेच खेरीज तंत्रज्ञान आणि विज्ञान यांनी मिळून अशक्य मानल्या जाणाऱ्या आजारांवरही उपचार शोधू शकतात हे सिद्ध झाले. हा आशेचा किरण असून नजिकच्या भविष्यात तो वैद्यकीय क्षेत्रात मोठे आणि महत्त्वपूर्ण बदल घडवून आणू शकतो.

## लग्नाच्या गाठी ट्रेनमध्ये जुळतात?

चीनमध्ये बऱ्याच लोकांची लग्नं होत नाहीत. त्यामुळेच एकटे जीव ही चीनमधली मोठी समस्या बनली आहे. अशा या एकट्या जीवांना दुकटं करण्यासाठी चीनमध्ये बऱ्याच कल्पना लढवल्या जातात. अशीच एक कल्पना अलिकडे चर्चेचा विषय ठरत आहे. तरुणांचं लग्न ठरावं यासाठी एका विशेष रेल्वेची सुरूवात करण्यात आली आहे. 'लव्ह स्पेशल' या नावाने ही रेल्वेगाडी चालवली जाते. ही रेल्वेसेवा सुरू होऊन काही अवधी लोटला असून यातून आजवर एक हजारपेक्षा जास्त लग्नाळू मुलामुलींनी प्रवास केला आहे. चीनमध्ये जवळपास २० कोटी लोक एकटे आहेत. अशा एकट्या लोकांची भेट घडवून आणण्यासाठी आणि त्यातून काही जोड्या जुळतील या अपेक्षेने ही रेल्वेसेवा सुरू करण्यात आली होती. चीनमधल्या चोंगकिंग नॉर्थ ते कियांगजियांग दरम्यान ही ट्रेन चालते. ती आठवड्यातून फक्त एकदाच चालवली जाते. पण ती खूप लोकप्रिय ठरली आहे. त्यामुळे आठवड्यातून दोन वेळा चालवण्याची मागणी होते आहे. या प्रवासादरम्यान जोडीदार मिळाला नाही तरी मित्रमैत्रिणी मिळत असल्याचं समाधान चीनी युवक-युवती व्यक्त करताना दिसतात.






## कुवारोंका गाँव

एखाद्या तरुणाचे लग्न न ठरण्यामागे अनेक कारणे असू शकतात. परंतु एखाद्या गावात कोणी आपली मुलगी नांदायला पाठवत नसेल तर याला काय म्हणायचे? लग्नाचे छत्तीस गुण जुळले तरी या गावात आपली मुलगी द्यायला कुठलाही बाप तयार होत नाही. त्यामुळे या गावाचे नावच 'कुंवारों का गाव' असे पडले आहे.

केरळातील जोंदालगट्टी गावात मुलगा लग्नाला आला की आई-बापाला ताण येतो कारण या गावात कुणाचे लग्नच जमत नाही. मुली या गावाशी नाते जोडण्यासाठी तयार होत नाहीत. थेट नकार देऊन टाकतात. अर्थातच या मागे गावाची आर्थिक स्थिती आणि दुर्दशा हे कारण आहे.


दुर्लक्षित खेड्याचा तरुणांना ताप

केरळला प्रगत राज्य मानले जात असले तरी आरोग्य सेवा, रस्ते आणि दळणवळणाच्या सुविधा तसेच आवश्यक यंत्रणा नसल्याने हे गाव दुलर्क्षित खेडे बनले आहे. त्यामुळे वधू येथील वर पसंद करायला तयारच होत नाहीत. सुमारे २०० लोकसंख्येच्या या गावात २० पेक्षा अधिक तरुण लग्न ठरण्याची अपेक्षा बाळगून आहेत. परंतु त्यांना कोणी मुलगी द्यायला तयार नाही. बरीच वर्षे तरुणांचे लग्न न झाल्याने गावातील तरुणांचे वैवाहिक जीवन सुरूच झालेले नाही. यामुळे येथील शाळेवरही परिणाम झाला आहे. येथील शाळेत मुलांची संख्या रोडावली आहे. या वर्षी कोणताही नवीन प्रवेश झालेला नाही. शाळेत केवळ पाच विद्यार्थी आहेत. अंगणवाडी रिकामी आहे. या गावात केवळ ४१ कुटुंबे राहतात.

## हिरवा रंग कशासाठी?

शस्त्रक्रिया करताना डॉक्टर निळ्या किंवा हिरव्या रंगाचे कपडे घालतात. तसंच त्यांच्या तोंडावर बांधायचा मास्कही हिरव्या रंगाचा असतो. असं का बरं होत असावं? जगभर डॉक्टरांनी एकाच रंगाचे कपडे घालण्यामागचं कारण काय असावं?

सुरूवातीच्या काळात डॉक्टरांपासून रुग्णालयातले सर्व कर्मचारी सरसकट पांढऱ्या रंगाचा पेहराव करायचे. पण १९१४ मध्ये एका मोठ्या डॉक्टरने एक ड्रेसकोड तयार केला. त्या अंतर्गत डॉक्टर हिरवे कपडे घालू लागले. मग हीच प्रथा पडली. काही डॉक्टर निळ्या रंगाचेही कपडे घालतात. रुग्णालयांमध्ये पडदेही हिरव्या किंवा निळ्या रंगाचे असतात. शस्त्रक्रियेदरम्यान हिरव्या रंगाचे कपडे घातल्याने डोळ्यांना थंडावा मिळत असल्यामुळे डॉक्टरांनी या रंगाचे कपडे घालायला सुरूवात केल्याचं एका जर्नलचं म्हणणं आहे. हिरवा रंग थंडावा देतो. इतर रंग असा थंडावा देत नाहीत. शस्त्रक्रिया करताना डॉक्टरांना मन एकाग्र करावं लागतं. त्यांचे डोळेही थकून जातात. त्यामुळे हिरव्या रंगाकडे पाहिल्यानंतर त्यांना आराम मिळतो. डोळ्यांना लाल किंवा पिवळ्या रंगाचा त्रास होतो. पण हिरव्या किंवा निळ्या रंगाचा तितकासा त्रास होत नाही. त्यामुळे रुग्णांच्या दृष्टीने डॉक्टर हिरव्या रंगाचे कपडे घालण्याला प्राधान्य देतात.



## फ्रान्समधले आगळे वेगळे

फ्रान्स हा युरोपमधल्या प्रमुख देशांपैकी एक. प्रत्येक देशाचे काही कायदे असतात. इथल्या काही प्रथा आपल्याला विचित्र वाटू शकतात. फ्रान्समधल्या अशाच काही अजब गजब गोष्टींविषयी आज जाणून घेऊ या. फ्रान्समधले लोक अन्नाला खूप महत्त्व देतात. या देशात अन्नाची नासाडी बेकायदेशीर ठरते. 'एप्रिलफूल' या संकल्पनेची सुरूवात फ्रान्समध्ये झाल्याचं म्हटलं जातं. इथल्या महिलांचं आयुष्यमान जगभरातल्या महिलांच्या तुलनेत अधिक असतं. फ्रान्समध्ये स्थूल लोकांची संख्या बरीच जास्त आहे. संपूर्ण युरोपमधल्या देशांच्या तुलनेत फ्रान्समध्ये सर्वाधिक स्थूल लोक आहेत. फ्रान्समध्ये गेल्या ५०० वर्षांपासून लग्नप्रसंगी नववधूने पांढरा पोशाख घालण्याची परंपरा आहे. जगाच्या सर्वाधिक भागावर राज्य करणारा इंग्लंड हा पहिला तर फ्रान्स हा दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे. एके काळी जगाच्या ८.६ टक्के भागावर फ्रान्सचं राज्य होतं. या देशात चक्क मृत व्यक्तीसोबत लग्न करता येतं. अर्थात यासाठी राष्ट्रपतींची परवानगी घ्यावी लागते. अपवादात्मक परिस्थितीत राष्ट्रपती मृत व्यक्तीसोबत लग्नाची परवानगी देतात.





# सेन्सेक्स पुन्हा 77000 च्या वर
## गुंतवणूकदारांनी कमावले 2.76 लाख कोटी


**मुंबई, दि. १६ प्रतिनिधी**

भारतीय शेअर बाजार आज १६ एप्रिल रोजी सलग तिसऱ्या दिवशी वाढला. सेन्सेक्स ३०९ अंकांनी वाढला आणि पुन्हा एकदा ७७,००० चा टप्पा ओलांडला. त्याच वेळी निफ्टी देखील २३,४०० च्या वर बंद झाला. शेवटच्या तासात झालेल्या जोरदार खरेदीमुळे दोन्ही निर्देशांक वधारून बंद झाले. यासोबतच, बीएसईवर सूचीबद्ध कंपन्यांचे बाजार मूल्य २.७६ लाख कोटी रुपयांनी वाढले.

आजच्या व्यवहारादरम्यान, बँकिंग, टेलिकॉम आणि तेल आणि वायू शेअर्समध्ये सर्वाधिक वाढ दिसून आली. बीएसई मिडकॅप आणि स्मॉलकॅप निर्देशांक देखील सुमारे १ टक्क्यांनी वधारून बंद झाले. सेन्सेक्स ३०९.४० अंकांनी वधारून ७७,०४४.२९ वर बंद झाला. दुसरीकडे निफ्टी १०८.६५ अंकांनी वाढून २३,४३७.२० वर बंद झाला.

आज १६ एप्रिल रोजी बीएसईवर सूचीबद्ध कंपन्यांचे एकूण बाजार भांडवल ४१५ लाख कोटी रुपयांवर पोहोचले, जे मागील दिवशी म्हणजेच मंगळवार १५ एप्रिल रोजी ४१२.२४ लाख कोटी रुपये होते. सूचीबद्ध कंपन्यांचे बाजार भांडवल आज सुमारे २.७६ लाख कोटी रुपयांनी वाढले आहे. दुसऱ्या शब्दांत गुंतवणूकदारांच्या संपत्तीत २.७६ लाख कोटी रुपयांची वाढ झाली आहे.

सेन्सेक्समधील ३० पैकी १८ शेअर्स वाढीसह बंद झाले. यामध्ये इंडसइंड बँकेच्या शेअर्समध्ये सर्वाधिक ७.१२ टक्के वाढ झाली. यानंतर, ॲक्सिस बँक, अदानी पोर्ट्स, एशियन पेंट आणि भारती एअरटेलचे शेअर्स १.३५ टक्क्यांपासून ते ४.२६ टक्क्यांपर्यंत वाढून बंद झाले.



**सेन्सेक्स 77,044**

**निफ्टी 23,437**

सेन्सेक्समधील उर्वरित १२ शेअर्स आज घसरणीसह बंद झाले. यामध्येही मारुती सुझुकीच्या शेअर्समध्ये सर्वाधिक १.५१ टक्क्यांची घसरण झाली. दुसरीकडे, इन्फोसिस, टाटा मोटर्स, लार्सन अँड टुब्रो (एल अँड टी) आणि एनटीपीसीचे शेअर्सही घसरले.

अमेरिका आणि चीनमधील व्यापार युद्धाचे संकट सतत वाढत आहे. डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाने चीनमधून येणाऱ्या वस्तूंवर २४५% पर्यंत शुल्क लावण्याची घोषणा केली आहे. यामुळे अमेरिका आणि चीनमधील व्यापार आणि राजनैतिक तणाव आणखी वाढण्याची अपेक्षा आहे. चीनच्या प्रत्युत्तराच्या कारवाईमुळे त्यांनी शुल्क वाढवले असल्याचे अमेरिकेचे म्हणणे आहे.

नवीन टॅरिफ अंतर्गत ट्रम्प प्रशासनाने चीनमधून अमेरिकेत येणाऱ्या सिरिंज आणि सुयांवर सर्वाधिक २४५% कर लादला आहे. कारच्या दाराच्या कुंडी (६७%) आणि लॅपटॉप (२०%) सारख्या लहान घरगुती उत्पादनांवर देखील कर आकारला जातो.

## हैदराबादमध्ये जंगल तोडल्यावरुन सुप्रीम कोर्टाचा संताप
# 'सरकारी अधिकाऱ्यांना तिकडेच जेल बांधून डांबले पाहिजे'

**नवी दिल्ली, दि. १६ वृत्तसंस्था**

हैदराबादमधील कंचागची बाहुली परिसरात १०० एकर जंगल नष्ट करण्यात आला प्रकरणी सुप्रीम कोर्टाने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. कोर्टाने तेलंगणा राज्य सरकारला हे जंगल पूर्ववत स्थितीत आणण्यासाठी कृती आराखडा सादर करण्यास सांगितले आहे. कोर्टाने राज्यातील अधिकाऱ्यांना विकास प्रकल्प किंवा इतर कोणतही कारण देत झाडे लावण्यास विरोध केला तर सरकारी अधिकाऱ्यांना तिकडेच जेल बांधून डांबलं पाहिजे असं म्हणत सर्वोच्च न्यायालयाने अधिकाऱ्यांना चांगलंच सुनावलं आहे.

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती बी. आर.गवई आणि ऑगस्टन जॉर्ज मसीह यांच्या खंडपीठाने या प्रकरणात तीव्र नाराजी व्यक्त करत जंगल नष्ट झाल्यामुळे बेघर झालेल्या हरीण आणि मोरांना आता भटक्या कुत्र्यांकडून त्रास सहन करावा लागत आहे त्यामुळे



वन्यजीव अधिकाऱ्यांना तातडीने या प्राण्यांच्या सुरक्षेसाठी उपाययोजना करण्याचे निर्देश सुप्रीम कोर्टाने दिले आहेत .

गेल्या काही दिवसांपूर्वी सोशल मीडियावर जंगलतोडीचे अनेक छायाचित्रे व्हायरल झाली होती .या छायाचित्रांमध्ये जंगलतोडीमुळे प्राणी पक्षी आपापल्या अधिवासातून बाहेर निघत असल्याचे दिसून आल्याने मोठी खळबळ उडाली होती. ३ एप्रिलला सर्वोच्च न्यायालयाने तेलंगणा सरकारला ताबडतोब कांचा गचीबौली वनक्षेत्रातील जंगलतोड थांबवण्याचा निर्देश दिले होते. हैदराबाद विद्यापीठाजवळ असलेल्या ४०० एकर जंगल क्षेत्राचा वापर विकास प्रकल्पासाठी करण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न आहे. मात्र, या जंगल बचावासाठी विद्यापीठातील विद्यार्थी आणि पर्यावरण प्रेमी गेल्या काही वर्षांपासून संघर्ष करत आहेत. याच महिन्याच्या सुरुवातीला, सुट्यांचा फायदा घेत अचानक बुलडोझर पाठवण्यात आले. लोक प्रतिकार करण्यासाठी काही करतील, तोपर्यंत सुमारे १०० एकर जंगलावर बुलडोझर चालवले गेले. ३ एप्रिल रोजी सुप्रीम कोर्टाने स्वतःहून या प्रकरणाची दखल घेत सर्व कामकाज थांबवण्याचे आदेश दिले.

**सरकारी युक्तीवादावर कोर्टाची चपराक**

या आधीच्या सुनावणीतही कोर्टाने सांगितले होते की, १९९६ मधील वनसंरक्षणाशी संबंधित सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाचे उल्लंघन केल्याबद्दल राज्याच्या मुख्य सचिवांना जेलमध्ये पाठवण्यात येईल. १६ एप्रिल रोजी राज्य सरकारची बाजू मांडण्यासाठी ज्येष्ठ वकील अभिषेक मनु सिंघवी कोर्टात उपस्थित होते. त्यांनी सांगितले की, या प्रकरणात गोष्टी अतिशयोक्तीने मांडल्या जात आहेत. मात्र, न्यायमूर्ती सिंघवी यांच्या युक्तिवादाने समाधानी नव्हते. त्यांनी स्पष्ट सांगितले की, अधिकाऱ्यांकडून स्वतःच्या बचावासाठी दिले जाणारे हे मुद्दे कोर्ट एकून घेणार नाही. खाजगी झाडं तोडण्यासाठीदेखील परवानगी लागते, आणि येथे केवळ कागदोपत्री मंजुरी दाखवून तब्बल १०० एकर जंगल उद्ध्वस्त करण्यात आलं. कोणतीही कायदेशीर प्रक्रिया पाळलेली नाही. त्यामुळे प्रथम अधिकाऱ्यांनी हे स्पष्ट करावं की ही जमीन पूर्ववत कशी आणली जाईल.

# मुर्शिदाबाद हिंसाचार पूर्वनियोजित कट
## ममता बॅनर्जींचा भाजपवर गंभीर आरोप

**कोलकाता, दि. १६ वृत्तसंस्था**

भारताच्या प्रगतीत सर्व धर्माच्या लोकांनी महत्वाची भूमिका बजावली आहे. परंतु सध्या संविधान कमकुवत करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. भाजप समाजात फूट पाडण्याचे काम करत आहे. मुर्शिदाबादमधील हिंसाचार पूर्वनियोजित कट होता, असा गंभीर आरोप करत पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी केंद्र सरकारवर जोरदार टीका केली. बुधवारी वक्फ सुधारणा कायद्याच्या संदर्भात कोलकाता येथे मुस्लिम धर्मगुरूंसोबतच्या बैठकीदरम्यान त्या बोलत होत्या. यावेळी ममता बॅनर्जी यांनी केंद्र सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. केंद्र सरकारने इतक्या घाईघाईत वक्फ कायदा का मंजूर केला? त्यांना बांगलादेशातील परिस्थिती माहित नाही का? बंगालमध्ये दंगली घडवण्यासाठी तुम्ही केंद्रीय एजन्सींचा वापर करून बाहेरून लोकांना बोलावले नाही का?



बीएसएफने मुर्शिदाबादमधील हिंसाचार का थांबवला नाही? असा सवाल त्यांनी केंद्र सरकारला केला.

बॅनर्जी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यावरही जोरदार निशाणा साधला. त्या म्हणाल्या की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमित शहांवर नियंत्रण ठेवावे. ते आमच्याविरुद्ध एजन्सींचा वापर करत आहेत. मोदींनी कोणत्याही अत्याचारी कायद्यांना परवानगी देऊ नये. मुर्शिदाबाद हिंसाचारात बांगलादेशचा सहभाग असेल तर त्यासाठी केंद्र सरकार जबाबदार आहे. बीएसएफ सीमेची काळजी घेते, राज्य सरकार नाही. भाजपने रामनवमी दरम्यान दंगल घडवण्याची योजना आखली होती, पण ती अयशस्वी झाली, असा आरोप बॅनर्जी यांनी केला आहे. मी लोकांना फूट पडू देणार नाही. आम्ही सर्व धर्म समभावावर विश्वास ठेवतो. मला एकता हवी आहे. केंद्रातील भाजपला सत्तेवरून हाकलून लावल्यानंतर, आम्ही त्यांनी आणलेली सर्व जनविरोधी विधेयके मागे घेऊ. सर्व धार्मिक नेत्यांनी लोकांमध्ये एकतेचा संदेश द्यावा. सर्वांनी एकत्र राहणे खूप महत्वाचे आहे, असे आवाहन त्यांनी केले. केंद्राने किती तरुणांना नोकऱ्या मिळाल्या आहेत याचे उत्तर द्यावे? औषधे, पेट्रोल आणि डिझेलच्या किमती वाढल्या आहेत, पण फक्त बंगालविरुद्धच बोललं जातं. बंगालचे खोटे व्हिडिओ दाखवले जातत. कर्नाटक, उत्तर प्रदेश, बिहार आणि राजस्थानमधील ८ व्हिडिओ बंगालमधील म्हणून दाखवले गेले. यामुळे बंगालला बदनाम करण्याचा प्रयत्न केला जातो, असा दावा बॅनर्जी यांनी केला.

## ५५ हजारांवर येण्याचे स्वप्न भंगले
# एका दिवसात सोन्याच्या दरात १३०० रुपयांपेक्षा अधिक वाढ

**मुंबई, दि. १६ प्रतिनिधी**

लग्नसराईच्या काळात सोने खरेदी करणाऱ्यांसाठी एक वाईट बातमी आहे. ट्रम्प यांच्या टॅरिफ वॉरदरम्यान १६ एप्रिल रोजी सराफा बाजारात सोन्याचा भाव ९४,४८९ रुपये प्रति १० ग्रॅमवर पोहोचला होता. एका झटक्यात सोन्याच्या दरात १३८७ रुपयांची वाढ झाली. तर चांदी ३७३ रुपयांनी महाग होऊन ९५,४०३ रुपये झाली आहे. जीएसटीमुळे २४ कॅरेट सोन्याचा भाव आता ९७,३२३ रुपये आणि चांदीचा भाव ९८,२६५ रुपये झाला आहे.

या वर्षी आतापर्यंत सोन्याच्या दरात प्रति १० ग्रॅम १८,७४९ रुपयांची वाढ झाली आहे. तर चांदी ९३८६ रुपये प्रति किलोनं महागली आहे. ३१ डिसेंबर २०२४ रोजी सोन्याचा भाव ७६,०४५ रुपये प्रति १० ग्रॅम आणि चांदीचा दर ८५,६८० रुपये प्रति किलो होता. या दिवशी सोनं ७५७४० रुपयांवर बंद झालं. चांदीही ८६,०१७ रुपये प्रति किलोग्रॅमवर बंद झाली. ३१ जानेवारी २०२५ रोजी सोन्याचा भाव ८२,१६५ रुपये प्रति १० ग्रॅम होता.



आयबीजेएने जाहीर केलेल्या दरानुसार २३ कॅरेट सोन्याचा भाव आता १३८२ रुपयांनी महागला असून तो ९४,१११ रुपये प्रति १० ग्रॅमवर पोहोचला. तर २२ कॅरेट सोन्याचा भाव १२७१ रुपयांनी वाढून ८६,५५२ रुपये प्रति १० ग्रॅम झाला आहे. आज १८ कॅरेट सोन्याचा भाव १०४० रुपयांनी वाढून ७०,८६७ रुपये झाला आहे.

इंडिया बुलियन अँड ज्वेलर्स असोसिएशननं (आयबीजेए) सराफा बाजाराचे दर जाहीर केले आहेत. यामध्ये जीएसटीचा समावेश नाही. कदाचित तुमच्या शहरात १००० ते २००० रुपयांचा फरक असू शकतो. आयबीजेए दिवसातून दोनदा दर जारी करते. एकदा दुपारी १२ च्या सुमारास, तर दुसऱ्याला सायंकाळी ५ च्या सुमारास दर जारी केले जातात.

कमकुवत डॉलर आणि जागतिक व्यापार युद्धाच्या चिंतेमुळे बुधवारी आंतरराष्ट्रीय सोन्याच्या किंमतींनी हा विक्रमी उच्चांक गाठला. कॉमेक्स सोन्याचा भाव २ टक्क्यांनी वधारून ३,२९४.६० डॉलर प्रति औंस झाला. आर्थिक अनिश्चितता आणि गुंतवणूकदारांमध्ये सुरक्षित गुंतवणुकीची वाढती मागणी यामुळे सोन्याच्या दरात वाढ होत आहे. भारतातील महागाईत मोठी घसरण झाल्यानंतर व्याजदर कपातीच्या वाढत्या अपेक्षा आणि अमेरिकेतील सोन्याच्या किमतींनाही आधार मिळत आहे.

# मुलीने मारला वडिलांच्याच घरावर डल्ला, नवऱ्याच्या मदतीने चोरले 90 लाख

**हरिद्वार, दि. १६ वृत्तसंस्था**

उत्तराखंडमधील हरिद्वारमध्ये एक धक्कादायक घटना समोर आली आहे. एका मुलीने तिच्या नवऱ्यासोबत मिळून वडिलांच्या घरातून तब्बल ९० लाख रुपये चोरले आहेत. मुलगी आणि जावयाने मिळून सुनियोजित पद्धतीने चोरी केली आणि जेव्हा सत्य बाहेर आलं तेव्हा संपूर्ण कुटुंबाला मोठा धक्का बसला. हरिद्वार पोलिसांनी या प्रकरणाचा खुलासा केला आहे आणि जोडप्यासह तिघांना अटक केली आहे आणि त्यांच्याकडून ५९ लाख ६० हजार रुपये जप्त केले आहेत.

हरिद्वारच्या गंगनहर कोतवाली भागात राहणारे कापड व्यावसायिक मोहम्मद सरवर यांनी नुकतच त्यांचं गोडाऊन विकलं होतं. ज्यातून त्यांना ९० लाखांची मोठी रक्कम मिळाली. त्यांनी ही रक्कम त्यांच्या जुन्या घराच्या वरच्या मजल्यावरील एका खोलीत पिशवीत ठेवली होती. १० एप्रिल रोजी रात्री ते दुकानातून घरी परतले तेव्हा एका शेजाऱ्याने त्यांच्या जुन्या घराचं कुलूप तुटलेलं असल्याचं सांगितलं.

**मुलगी आणि जावयाने रचला चोरीचा कट**

मोहम्मद सरवर खोलीत पोहोचले तेव्हा तिथे ठेवलेले ९० लाख रुपये आणि काही मौल्यवान दागिने गायब होते. त्यानंतर त्यांनी ताबडतोब पोलिसांना कळवलं आणि संशयही व्यक्त केला. त्यांनी सांगितलं की, १० एप्रिल रोजी दुपारी त्यांची मुलगी शीबा घरी आली आणि ती वारंवार तिचा नवरा अझीमशी फोनवर बोलत होती. याशिवाय ती काही काळ बाहेरही गेली. सरवर यांना संशय होता की, शीबाने घराच्या चाव्या चोरल्या होत्या आणि त्या अझीमला दिल्या होत्या आणि त्यांनीच चोरीचा कट रचला होता.

प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी घटनास्थळाभोवती बसवलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासलं. शीबा आणि अझीम यांची चौकशी सुरू केली. पोलिसांनी त्यांची कडक चौकशी केली असता, दोघांनीही आपला गुन्हा कबूल केला. चौकशीदरम्यान असं उघड झालं की, अझीमवर खूप कर्ज होतं आणि त्याची आर्थिक परिस्थिती वाईट होती. बीएसएम चौकाजवळ त्याची एक जिम आहे, जी चालवताना त्याला आर्थिक अडचणी येत होत्या.

अझीम दिलेल्या माहितीनुसार, शीबाने त्याला सांगितलं होतं की त्यांच्या घरात खूप मोठी रक्कम आहे. यानंतर दोघांनी मिळून चोरीचा प्लॅन केला. त्याने आधी जुन्या घराच्या चाव्या चोरल्या आणि नंतर संधी साधून बॅगेत ठेवलेले पैसे चोरले. अझीमने चोरीचे पैसे त्याच्या आय-२० कारमध्ये ठेवले होते, जी त्याने सती मोहल्ला येथील स्मशानभूमीजवळ पार्क केली होती. अझीमने दिलेल्या माहितीवरून पोलिसांनी गाडीची झडती घेतली आणि लाखो रुपये जप्त केले.

# पीडित महिलांसाठी हक्काचे माहेर

माहेर या संस्थेची स्थापना पुण्याजवळ असणाऱ्या वढू बुद्रुक येथे सिस्टर लुसी कुरियन यांनी १९९७ साली त्याची स्थापना केली. त्याचा अनेक संस्था आहेत रांची, रत्नागिरी, एर्नाकुलम येथील दुर्गम भागामध्ये काम करतात. एक आंतरधर्मीय आणि जाती-मुक्त भारतीय गैर-सरकारी संस्था आहे. या संस्थेचे उद्दीष्ट निराधार महिला व बालकांसाठी आश्रय व मदत देणे हा आहे.१९९१ मध्ये, जेव्हा सिस्टर लुसी एच.ओ.पी.ई. संस्थेसाठी काम करत होत्या तेव्हा एक गर्भवती महिला त्यांना भेटायला व मदत मागायला आली. तिच्या पतीने दुसरी महिला घरी आणण्यासाठी तिला जिवे मारण्याचा प्रयत्न केला होता. सिस्टर लुसी तिला काही मदत करू शकली नाही, परंतु पुढील दिवसासाठी तिच्यासाठी काही प्रयत्न करून काहीतरी करण्याचे आश्वासन दिले. सिस्टर लुसी म्हणतात कि, मला एका सुरक्षित वातावरणात वाढवलं गेलं आणि मला माहित नव्हतं की एका रात्री एक स्त्रीच्या जीवनात इतका फरक पडू शकतो. मी खरोखरच एक तेजस्वी स्त्री पाहिली आणि तिच्या वेदना एकवल्या. आम्ही तिला हॉस्पिटलमध्ये नेले पण ती मरण पावली. आणि सात महिन्यांच्या गर्भस्रावधीचा मृत्यू झाला. या अनुषंगाने सिस्टर लुसी यांनी माहेरचा शोध लावण्याचा निर्णय घेतला, स्त्रियांना अशी दयनीय स्थितीत मदत करण्यासाठी आवश्यक पाठिंबा मिळण्यासाठी सात वर्षे लागली, परंतु २ फेब्रुवारी १९९७ रोजी पुण्याच्या बाहेरील वढू बुद्रुक गावात प्रथम माहेर घराचे दरवाजे उघडले.



माहेर संस्थेची संथापक सिस्टर लुसी कुरियन ह्या आहेत. सिस्टर लुसी यांनी १ घर, ३ रहिवासी अशी अनिश्चित विषमतेपासून सुरुवात केली. आज माहेरचे डॉक्टर / सामाजिक कार्यकर्ते / शिक्षक / ट्रस्टीज / व्यवसायिक लोक / स्वयंसेवक इ.च्या प्रेमळ सैन्याने ४३ घरे संचालित केली आहेत. माहेर संस्थेमध्ये सध्या १२०० रहिवाशी आहेत. त्यातील ८६० मुले, ३०० महिलांसह १२० मानसिक आजार असलेल्या महिला आणि ७१ मानसिकरित्या वयस्कर पुरुष आहेत. तसेच स्वयं-मदत गट, ग्रंथालय वाचनालय इत्यादीसारखे समुदाय कार्यक्रमाद्वारे हजारो जण पोहोचले आहेत. धर्म, लिंग, जात, रंग, पंथ किंवा सामाजिक प्रतिष्ठा याकडे दुर्लक्ष करून माहेर संस्थेमध्ये सर्वांचे स्वागत आहे. माहेरमधील मुले रस्त्यावरून आणि झोपडपट्ट्यांतून येतात, समाजामध्ये भीक मागू नयेत, आईवडील त्यांना काळजी घेण्यास असमर्थ असतात, इतर संस्थांनी त्यांना नाकारले आहे. अशी मुले माहेर मध्ये अल्प किंवा दीर्घकालावधी साठी राहतात, आणि जोपर्यंत ते माहेरमध्ये राहतात तोपर्यंत त्यांचे शालेय शिक्षण, शिकवणी, उत्कृष्ट पोषण, ध्यान, कलात्मक प्रोग्रामिंग ई. सर्व गोष्टी त्यांना शिकवल्या जातात. ते शोकांतिकातून येतात आणि कुटुंब, प्रेम आणि उज्ज्वल भवितव्य दर्शवितात.येथे आलेल्या स्त्रियांचा गोष्टी मुलांप्रमाणेच आहेत. कौटुंबिक हिंसाचार, अविवाहित गर्भधारणे, विधवा, हुंडा देय रक्कम आणि महिलांच्या समस्येचा सामना करण्यासाठी ग्रामीण भारताचे अपमानास्पद स्थान आहे आणि ही यादी पुढे चालू आहे. त्यावेळी अशा स्त्रिया बऱ्याचदा या परिस्थितीमध्ये स्त्रियांना वेश्याव्यवसाय किंवा आत्महत्येच्या पलीकडे कोणतेही पर्याय दिसत नाहीत. अशावेळी ह्या स्त्रिया माहेर मध्ये आश्रय घेण्यास येतात, माहेर मध्ये अशा सर्वांचे स्वागत आहे, माहेर मध्ये त्यांची काळजी घेतली जाते. प्रत्येक स्त्रीला वैयक्तिकरित्या समर्थन देण्यात येते, मग ते कुटुंबाबरोबर सलोख्याचे आणि पुनर्मंचन करून, नोकरी-प्रशिक्षण किंवा शालेय शिक्षण माध्यमातून स्वतःचा व्यवसाय असो किंवा माहेरच्या आत नोकरी. तथापि, काही जणांच्या भूतकाळातील मानसिक आजारामुळे फारच छान झाले आहे. अशा पुरुष आणि स्त्रियांना मानसिक आजाराने ग्रस्त असलेल्या माहेरमध्ये दोन घरे आहेत, वैद्यकीय व मनोरंजक अशा लोकांची काळजी घेतात.समाजातील अत्याचाराने पिडीत,अबला महिलांना आधार देणाऱ्या माहेर संस्थेचे हे कार्य नक्कीच प्रेरणादाइ आहे.

**लोकसेवार्थ**

**लोकजागर**

# सजावटीचा नवा ब्रंड



परिस्थिती काहीही असो, वय कितीही असो, मात्र एखादी गोष्ट ठरवली की, आपण सर्व अडचणींवर मात करून यश प्राप्त करू शकतो. यातच जर कुटुंब आणि घर सांभाळणाऱ्या महिला असतील आणि त्यांनी काहीतरी करण्याचं ठरवलं, तर त्या आपल्या जिद्दीच्या बळावर सगळ्या अडथळ्यांचे डोंगर पार करून यश मिळवतात.“नारी समाजस्य कुशलवास्तुकारा” या उक्तीप्रमाणे नारी ही समाजाची कुशल वास्तुकार आहे आणि आपली संस्कृती स्त्रीला देवी मानणारी आहे, आपल्या महिला आज कोणत्याही क्षेत्रात मागे नाहीत. यातीलच एक क्षेत्र आहे व्यवसाय क्षेत्र.याच व्यवसाय क्षेत्रात जिद्दीने उभ्या राहून आभाळा एवढ यश मिळवणाऱ्या चंद्रप्रभा यांची हि यशोगाथा.

**शून्यातून विश्व**

वयाच्या अशा टप्प्यावर, जेव्हा बहुतांश लोक निवृत्तीचा विचार करतात, 70 वर्षीय चंद्रप्रभा परिहार आज आपल्या व्यवसायात यशस्वीपणे पुढे वाटचाल करत आहेत. चंद्रप्रभा यांना प्रेमाने ‘आबा’ म्हटलं जातं. मुंबईत राहणाऱ्या आबांनी दीड वर्षांपूर्वी क्रोशिया कलेचा वापर करून बॅग्स, टोप्या, घरातील सजावटीच्या वस्तू आणि राख्या बनवायला सुरुवात केली आणि ‘नेहर’ या नावाने आपल्या ब्रँडची ओळख निर्माण केली.आबांनी आपल्या आयुष्यातील 70 वर्षे कुटुंबाची जबाबदारी पार पाडण्यात घालवली. त्यांना लहानपणापासूनच विणकामाची आवड होती, पण त्या कलेला व्यवसायात रूपांतर करण्याचा विचार त्यांनी कधीच केला नव्हता. त्यांनी 20 वर्षांपूर्वी या कलेत डिप्लोमा घेतला होता, पण कुटुंबाच्या गरजांमध्ये स्वतःचे स्वप्न साकार करण्याची संधी त्यांना कधी मिळाली नाही. मात्र, त्यांच्या सून स्वाती यांनी पाठिंबा दिल्यामुळे हे स्वप्न प्रत्यक्षात आणता आले.सुरुवातीला, सासु-सुनेच्या जोडीने हे फक्त छंद म्हणून हे सगळं सुरु सुरू केलं. स्वाती नवीन डिझाइन्स शोधून आबांना द्यायची आणि आबा त्या डिझाइन्स बनवून ओळखीच्या लोकांमध्ये वाटायच्या. व्यवसायाचा विचार तेव्हा सुरू झाला जेव्हा आबांच्या भाचीने त्यांच्या बनवलेल्या बॅग्स ऑफिसमध्ये नेल्या आणि सहकाऱ्यांनी अशाच बॅग्स बनवण्याची मागणी केली.या मागणीने त्यांचा आत्मविश्वास वाढला आणि लवकरच त्यांना ऑस्ट्रेलियातून मोठं ऑर्डर मिळाली. यानंतर स्वातीने कंपनीची अधिकृत नोंदणी केली आणि वेबसाइट व इंस्टाग्राम पेज सुरू केले.आज आबा स्वतः प्रत्येक ऑर्डरवर काम करतात आणि एक यशस्वी उद्योजक म्हणून पुढे येत आहेत. तुम्हाला देखील आबांच्या या वस्तू खरेदी करायच्या असतील , तर त्यांच्या वेबसाइट www.nayher.com वर जाऊन त्यांच्या हातांनी बनवलेल्या वस्तू खरेदी करू शकता.

**शब्दार्थ**

### NCC

NCC या शब्दाचा इंग्रजी भाषेत Full Form हा National Cadet Corps हा आहे. NCC चा मराठी भाषेत Full Form हा नॅशनल कॅडेट कॉर्पस आहे. NCC ला मराठी भाषेत राष्ट्रीय विद्यार्थी सैनिक दल असे म्हणतात. आपल्याकडे NCC शब्दाला हिंदी भाषेत किंवा त्यांच्या पत्रव्यवहार भाषेत राष्ट्रीय सैनिक छात्र दल म्हणून ओळखले जाते.NCC महाविद्यालयात असताना आपल्याला सतत शिस्त आणि ध्येयाकडे लक्ष केंद्रित असणारे आर्मी सारखे राहणारे काही युवक दिसत असतात. महाविद्यालयात असताना देशसेवेसाठी एक प्रेरणा निर्माण करण्यासाठी आणि मुलांना आर्मीच्या शिस्तीसाठी तयार करायला NCC ला सुरुवात झाली.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# औरंगजेबाच्या कबरीला कायदेशीर संरक्षण द्या, कथित मुघल वंशजाचे संयुक्त राष्ट्राला पत्र


**नवी दिल्ली, दि. १६ वृत्तसंस्था**

छत्रपती संभाजी नगर येथे असलेल्या मुघल शासक औरंगजेबाच्या कबरीवरून गेले काही दिवस वाद सुरू आहे. ही कबर उखडून टाकावी, अशी मागणी काही संघटनांनी केली होती. यावरून महाराष्ट्रात काही काळ वादंग निर्माण झाले. नागपूरमध्ये या कारणावरून दंगलही उसळली. आता या कबरीला कायदेशीर संरक्षण मिळावे अशी मागणी शेवटचा मुघल बादशाह बहुदर शाह जफर यांचा वंशज असल्याचा दावा करणाऱ्या याकुब हबीबुद्दीन तुसी यांनी केली आहे. संयुक्त राष्ट्राचे सरचिटणीस अँटोनियो गुट्रेस यांना पत्र लिहून औरंगजेबाच्या कबरीला संरक्षण द्यावे, अशी मागणी त्यांनी केली.

औरंगजेबाची कबर हटविण्याच्या मागणीवरून नागपूरमध्ये उसळलेल्या हिंसाचाराच्या एका महिन्यानंतर याकुब तुसी यांनी ही मागणी केली आहे. छावा चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील खुलताबाद येथे असलेल्या औरंगजेबाच्या कबरीचा विषय चांगलाच तापला. त्यानंतर याठिकाणी महाराष्ट्र सरकारने संरक्षण पुरविले आहे.

तसेच औरंगजेबाची कबर असलेली जागा ही वक्फची मालमत्ता असल्याचा दावाही त्यांनी केला. तसेच या कबरीला राष्ट्रीय स्मारकाचा दर्जा दिला असून ‘प्राचीन स्मारके आणि पुरातत्व स्थळे आणि अवशेष कायदा, १९५८’ या कायद्यानुसार संरक्षण प्रदान करण्यात आलेले आहे, असेही तुसी यांनी म्हटले.

संयुक्त राष्ट्राच्या सचिवांना लिहिलेल्या पत्रात त्यांनी दावा केला की, सदर कायद्यातील तरतुदींनुसार,




संरक्षित केलेल्या स्मारकाजवळ कोणतेही अनधिकृत बांधकाम, बदल किंवा उत्खनन करता येणार नाही. अशा प्रकारची कोणतीही कृती केल्यास ती बेकायदेशीर किंवा दंडनीय मानली जाईल.

ऐतिहासिक चित्रपट आणि सोशल मीडिया द्वारे एतिहासिक प्रसंगाचे चुकीचे वर्णन केल्यामुळे लोकांच्या भावनांना हात घातला जात आहे. ज्यामुळे समाजात द्वेष पसरवला जात असून, पुतळे जाळण्यासारखे प्रतिकात्मक आंदोलने केली जात आहेत, असेही या पत्रात तुसी यांनी म्हटले. भावी पिढ्यांना त्यापासून शिकता यावे यासाठी सांस्कृतिक वारशाचे जतन करणे आवश्यक आहे, यासाठी आंतरराष्ट्रीय कायद्याची अंमलबजावणी व्हावी, अशीही मागणी त्यांनी केली.

भारताने १९७२ साली युनेस्को परिषदेत केलेल्या कराराचाही यात उल्लेख करण्यात आला आहे. भारताने सांस्कृतिक आणि नैसर्गिक वारसा स्थळांच्या संरक्षणासंबंधीच्या करारावर स्वाक्षरी केली आहे. त्यामुळे अशा वास्तूंचा नाश करणे, त्याकडे दुर्लक्ष करणे किंवा त्यात बदल करणे हे आंतरराष्ट्रीय दायित्वांचे उल्लंघन ठरेल, असाही उल्लेख पत्रात करण्यात आला आहे.

# अभिनेत्री सागरिका घाटगे-झहीर खानच्या घरी पाळणा हलला



**मुंबई, दि. १६ प्रतिनिधी**

दिग्गज क्रिकेटर झहीर खान आणि त्याची पत्नी, अभिनेत्री सागरिका घाटगे यांच्या घरी पाळणा हलला आहे. त्यांनी बाळाचे स्वागत केले असून मुलाचे नावदेखील ठेवले आहे. बुधवारी सकाळी सागरिका आणि झहीर यांनी सोशल मीडियावर एक सुंदर ब्लॅक अँड व्हाईट फोटो शेअर करत ही गुड न्यूज दिलीय.

या कपलने बुधवारी एक पोस्ट शेअर करून ही गुड न्यूज दिली. कपलने फोटो शेअर केले असून त्यामध्ये जहीरने बाळाला कुशीत घेतलं आहे. तर सागरिकाने जहीरच्या खांद्यावर हात ठेवला आहे. आणखी एका फोटोमध्ये जहीरने बाळाचा हात धरला आहे. त्यांनी मुलाचे नाव 'फतेहसिंह खान' ठेवले आहे.

काही वर्षांच्या रिलेशननंतर दोघांनी २०१७ मध्ये लग्न केले. हा खासगी विवाह सोहळा होता. पण नंतर त्यांनी मुंबईमध्ये ग्रँड रिसेप्शन देखील दिलं होतं. सागरिका आणि झहीरची ओळख अंगद बेदी आणि इतर काही मित्रांमुळे झाली होती. त्यानंतर दोघांनी जवळपास दीड वर्ष एकमेकांना डेट केले. त्यानंतर २०१७ मध्ये लग्न केले. सागरिकाने पहिल्यांदा मॉडेल म्हणूनही काम केले. 'चक दे इंडिया'मध्ये तिने प्रीती सबरवालची भूमिका साकरली. या चित्रपटातील भूमिकेसाठी सागरिकाला स्क्रीनचा सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्रीचा पुरस्कार मिळाला होता. बॉलिवूड अभिनेता शाहरुख खानसोबत सागरिकाने बॉलिवूडमध्ये पदार्पण केले. यानंतर तिने 'फॉक्स', 'मिले ना मिले हम', 'रश' या गाजलेल्या चित्रपटांमध्ये काम केले. याशिवाय सागरिकाने अतुल कुलकर्णीसोबत 'प्रेमाची गोष्ट' या मराठी चित्रपटातही काम केले.





**उपासक दिक्षा** १८ एप्रिल २०२५ **साधक दिक्षा** १९ एप्रिल २०२५

**प.पू.जगद्गुरुश्रींचे उपपीठ मुंबई येथे**

**समस्या मार्गदर्शन**

जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थानाच्या अंधश्रध्दा निर्मुलन उपक्रमांतर्गत, जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज, दक्षिण पीठ-नाणीजधाम यांचा समस्या मार्गदर्शन व दर्शन सोहळा दि. १८ व १९ एप्रिल २०२५ सकाळी ९ वा. स्थळ : उपपीठ मुंबई-मौजे शिरसाड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथे संपन्न होणार आहे.

कार्यक्रमाच्या अनुषंगाने संस्थानच्या वतीने अनेक सामाजिक उपक्रम राबविले जातात, जसे कि, ग्राम स्वच्छता अभियान, शैक्षणिक उपक्रम, वैद्यकिय उपक्रम, आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांचे पुनर्वसन, महिला सक्षमीकरण, आपतकालीन मदत उपक्रम, कायदेविषयक साक्षरता शिबिरे आयोजित केली जातात. कार्यक्रमाचे आयोजक: जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थान-उपपीठ मुंबई.


महासागर MUMBAI
RNI No.: MAHAMAR/2016/79101
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at S. R. publication, Mohan - Arjun Compund, Godown No. 8, 9 & 10, Near Ghartan Pada, Vaishali Nagar Last Bus Stop, Dahisar (E),Mumbai - 400068 and Published From Bora Bazar Street,Fort, Mumbai -400001. Editor - SHRIKRISHNA TANSUKHDAS CHANDAK

महासागर मुंबई
हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी एस. आर. प्रिंटर्स, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडावून नं. ८,९,१०, घरटन पाडा, वैशाली नगर, दहिसर ईस्ट, मुंबई येथे छापून बोरा बाजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई- ४०० ००१ येथे प्रसिद्ध केले. संपादक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (मो. ९९२२९७००२३) Email : mumbaimahasagar@gmail.com
RNI No.: MAHAMAR/2016/79101